# एम. ए. (मराठी)

## सत्र - IV (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. १४:३

# फुले आंबेडकरवादी साहित्य

## विषय कोड : PAMAR401.3

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. अजय भामरे**
प्रभारी प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल आर. बनकर**
कला व मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. डॉ. गिरीश मोरे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
राजश्री शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

: **डॉ. संदीप कदम**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
साठे महाविद्यालय, विलेपार्ले, (पूर्व), मुंबई - ४१६६०१.

: **डॉ. विजया सोमपूरकर गुडेकर**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
१४०२/ब, वेंताना हिरानंदानी इस्टेट, पाटीलपाडा, ठाणे - ४००६०७.



**जानेवारी २०२२, प्रथम मुद्रण, ISBN: 978-93-95130-43-1**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **घटक १** | | |
| १. | अ) फुले तत्त्व आणि विचार प्रेरणा<br>आ) आंबेडकर तत्त्व आणि विचार प्रेरणा | १ |
| **घटक २** | | |
| २. | फुले-आंबेडकरवादी साहित्य: प्रेरणा व स्वरूप | ३८ |
| **घटक ३** | | |
| ३. | कादंबरी : 'विषवृक्षाच्या मुळ्या' - वासुदेव मुलाटे | ५४ |
| ४. | दीर्घ कविता : आरपार लयीत प्राणांतिक - प्रज्ञा दया पवार | ६८ |


*****

**सत्र : ४**

**अभ्यासपत्रिका क्रमांक १४ : ३ – फुले-आंबेडकरवादी साहित्य**

उद्दिष्ट : १९९० नंतर वर्ण, जात, वर्ग, लिंगभाव अधिष्ठित शोषकव्यवस्थेच्या अंतासाठीचे तत्त्वज्ञान म्हणून फुले-आंबेडकरांच्या विचारप्रवाहाचा उदय झालेला दिसतो. जागतिकीकरणाच्या गुंतागुंतीपूर्ण वास्तवात विशेषत: भारतीय समाज, साहित्य आणि संस्कृती संदर्भात सदर विचारप्रणालीचे महत्त्व अनन्य आहे. त्याचा परिचय व्हावा आणि योगदान स्पष्ट व्हावे हा सदर अभ्यासपत्रिका सुरू करण्यामागील प्रमुख उद्देश आहे.

घटक १) व्याख्याने–२०, श्रेयांकन–०२

अ) फुलेवाद तत्त्व आणि विचारप्रणाली.

आ) आंबेडकरवाद तत्त्व आणि विचारप्रणाली.

घटक २) व्याख्याने–२०, श्रेयांकन–०२

फुले-आंबेडकवादी साहित्यप्रेरणा आणि स्वरूप.

घटक ३) व्याख्याने–२०, श्रेयांकन–०२

कादंबरी–'विषवृक्षाच्या मुळ्या', वासुदेव मुलाटे.

दीर्घकविता–'आरपार लयीत प्राणांतिक', प्रज्ञा दया पवार.

अंतर्गत परीक्षा–एकूण गुण ४०

१. लेखी परीक्षा  २० गुण

२. प्रकल्प लेखन  २० गुण (पैकी – प्रकल्प लेखन : १० गुण व प्रकल्पावर आधारित तोंडी परीक्षा : १० गुण)

सत्रान्त परीक्षा–एकूण गुण ६०

वरील अभ्यासक्रमावर १५-१५ गुणांचे चार प्रश्न पर्यायांसह विचारण्यात येतील.

संदर्भ :

कसबे, रावसाहेब; *आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार*, सुगावा प्रकाशन, पुणे.

पाटील, शरद; *मार्क्स-फुले-आंबेडकरवाद*, सुगावा प्रकाशन, पुणे.

गायकवाड, सुधाकर; *माणूस त्याचा समाज आणि बदल : डॉ० आंबेडकरांचे सिद्धान्तन*, सृजन प्रकाशन, मुंबई.

शेरे, नीळकंठ; *आंबेडकरवाद*, सुविद्या प्रकाशन, पुणे.

पानतावणे, गंगाधर; *पत्रकार डॉ० बाबासाहेब आंबेडकर*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

# १

# फुले तत्त्व आणि विचार प्रेरणा
# आंबेडकर तत्त्व आणि विचार प्रेरणा

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ तत्त्व : संकल्पना व स्वरूप

१.३ विचार : संकल्पना व स्वरूप

**अ) जोतीराव फुले : तत्त्व आणि विचार प्रेरणा**

१.४ जोतीराव गोविंदराव फुले

- १.४.१ जोतीराव फुल्यांचे शिक्षणविषयक विचार
- १.४.२ जोतीराव फुल्यांचे धार्मिक विचार
- १.४.३ जोतीराव फुल्यांचे सामाजिक विचार
- १.४.४ जोतीराव फुल्यांचे कृषीविषयक विचार
- १.४.५ जोतीराव फुल्यांचे विज्ञाननिष्ठ विचार

१.५ समारोप

**ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : तत्त्व आणि विचार प्रेरणा**

१.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

- १.६.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
- १.६.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार
- १.६.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार
- १.६.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार
- १.६.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक विचार
- १.६.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार
- १.६.७ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक विचार

१.७ समारोप

१.८ नमुना प्रश्न

१.९ संदर्भ


## १.० उद्दिष्टे

१. जोतीराव फुले यांच्या साहित्यातील तत्त्वे समजून येतील.

२. जोतीराव फुले यांचे विचार समजून येतील .

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यातील तत्त्वे समजून येतील.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून येतील .

## १.१ प्रस्तावना

एकोणिसावे आणि विसावे ही दोन शतके अनेकार्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. ब्रिटिशांचा एकछत्री अंमल पहिल्या शतकात सुरू झाला तर दुसऱ्या शतकात स्वातंत्र्य मिळाले. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज लोक सत्ताधारी बनले होते. लोकांच्या अज्ञानाचा ते पुरेपूर फायदा घेत होते. त्यांना आपला राज्यकारभार चालविण्यासाठी मनुष्यबळ हवे होते. त्यासाठी त्यांनी इथल्या लोकांना शिक्षण दिले, सैन्यभरती केली, भारतात अनेक सुविधा आणल्या.

मुस्लिम राजवट परकीय असली तरी इथल्या प्रदेशाशी ती एकरूप झाली होती. इंग्रज लोक मात्र स्वार्थी हेतूने भारतीयांबरोबर वर्तन करीत होते. काही अधिकारी मात्र मिशनरी वृत्तीने ख्रिश्चन धर्माचा प्रसार करीत होते. अस्पृश्यता, जातीयता, अंधश्रद्धा, सती प्रथा, रोटी-बेटी व्यवहारावर बंदी, शिक्षणबंदी, पुनर्विवाहबंदी आणि पारतंत्र्य अशा दुष्ट चक्रात लोक अडकले होते. यातून बाहेर पडण्यासाठी पहिल्या पिढीतील अनेक शिक्षित तरुण प्रयत्न करीत होते. काही जण राजकीय तर काही जण सामाजिक स्वातंत्र्याचा आग्रह धरीत होते. जोतीराव फुले हे ब्रिटिशांचे दोष दाखवत स्वकियांचेही दोष दाखवत कार्य करीत होते.

विसाव्या शतकात भारत स्वतंत्र झाला असला तरी भारतीय माणूस पारंपरिक मानसिकतेत आडकला होता. स्वकियांना आपले हक्क तो देत नव्हता. या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरला. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार-कार्यातून वेगळे तत्त्वज्ञान आणि विचारसरणी निर्माण झाली. या दोन्ही महामानवांनी जी तत्त्वे आणि विचार जोपासली आहेत, त्याचा परामर्श घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय फुले आंबेडकरवादी साहित्य समजून घेता येणार नाही. त्यापूर्वी तत्त्व आणि विचार म्हणजे काय हे पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

## १.२ तत्त्व : संकल्पना व स्वरूप

तत्त्व आणि विचार ह्या दोन्ही संकल्पना परस्परांशी निगडित आहेत. असे असले तरी दोन्हीत काही साम्यभेदही आढळतात. जिथे सद्सद्विवेक असतो त्याठिकाणी काही तत्त्वे आणि विचार असतात. विशिष्ट उद्दिष्टांचा साररूप अंश म्हणजे तत्त्व. त + त्त्व = तत्त्व. यातील ' त ' म्हणजे सत्य आणि ' त्त्व ' म्हणजे सार किंवा अर्क. एखाद्या धोरणाचे वास्तविक स्वरूप म्हणजेही तत्त्व. तत्त्व हे एक तात्पर्य असते, ते एक सत्य असते. काही वेळा तत्त्व हे मूल्ये बनून येते. तत्त्व हा शब्द सत्य वा वास्तवाला समांतर जाणारा शब्द आहे.

तत्त्व या शब्दासाठी इंग्रजीत Principle हा पर्यायी शब्द आढळतो. त्यास मूलभूत तत्त्व असेही म्हणतात. तत्त्व म्हणजे सर्वसाधारण पायाभूत नियम किंवा सिध्दांत. नियम आणि

तत्त्वात फरक करता येतो. नियम हे बदलू शकतात मात्र तत्त्वे ही बदलत नसतात. नियमांपेक्षा तत्त्वे ही कधीही चांगली असतात कारण तत्त्वे ही सुस्पष्ट उद्दिष्टांनी युक्त असतात. तत्त्वे ही वर्तनासाठी मार्गदर्शक ठरतात. नियम हे बंधनकारक असतात तर तत्त्वे ही खुली असतात.

एखादे तत्त्व निर्माण होण्यासाठी शहाणपण येण्याची किंवा ते संपादन करण्याची खूप गरज असते. शहाणपण हे केवळ अक्षरज्ञानातून येत नाही. त्यासाठी निरीक्षण, अवलोकन, परीक्षण आणि सत्यशोधन करावे लागते. चिंतन आणि सत्यशोधन यातून तत्त्व जन्मास येत असते. काही तत्वे नैसर्गिक असतात तर काही मनुष्यनिर्मित असतात.

नैसर्गिक तत्त्वांमध्ये पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांचा समावेश केला जातो. यातील पृथ्वी म्हणजे भूमी, आप म्हणजे पाणी, तेज म्हणजे अग्नी (उष्णता, प्रकाश), वायू म्हणजे हवा आणि आकाश म्हणजे आभाळ किंवा शून्य जागा. माणसाचे वा जीवाचे अस्तित्व या पाच घटकांतून सिध्द होते असे मानले जाते. गौतम बुद्धाने मात्र आकाश हा घटक अमान्य केला आणि पहिल्या चार घटकांना मान्यता दिली. हे घटक किंवा तत्त्वे ही नैसर्गिक आहेत, कोणा विचारवंताची ती निर्मिती नाही. त्यांना वास्तवाचा आधार असतो. ती सत्य वा भौतिक स्वरूपात असतात, ती इंद्रियांना कळतात. यापेक्षा मनुष्यनिर्मित तत्त्वे वेगळी असतात.

मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात विविध तत्त्वे आढळतात. काही तत्त्वे निसर्गातील असतात, ती संशोधनांती समोर येतात. उदा. गुरुत्वाकर्षणाचे तत्त्व, पृथ्वीचे परिभ्रमण वा परिवलन. काही तत्त्वे मात्र समाज आणि मनुष्यप्राणी गृहीत धरून तयार झालेली असतात. उदा. सहकाराची तत्त्वे, लोकशाहीची तत्त्वे, आनंदी जीवनाची तत्त्वे, वैश्विक तत्त्वे, आध्यात्मिक तत्त्वे, नैतिक तत्त्वे वगैरे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही सामाजिक लोकशाहीची तत्त्वे आहेत. प्रामाणिकपणा हे नैतिक तत्त्व आहे. श्रध्दा, भक्ती, उपासना ही आध्यात्मिक तत्त्वे आहेत. प्रबोधन, व्यक्तिवाद, विवेकवाद, इहवाद, विज्ञाननिष्ठा ही वैचारिक साहित्याची तत्त्वे आहेत. मानवता, सामाजिकता, वास्तवता, बुद्धिप्रामाण्य, तर्कनिष्ठता, विज्ञाननिष्ठा, प्रबोधन, अशा किती तरी तत्त्वांना अनेकांनी आपल्या विचार-वर्तनात स्थान दिले आहे. त्यातील काही तत्त्वांचा आढावा घेता येतो.

'प्रबोधन' हे एक तत्त्व आहे. प्रबोधन म्हणजे जागृती किंवा यथार्थ ज्ञान होणे. कोणत्याही घडामोडीमागे कार्यकारण असते, याची समज येण्यासाठी प्रबोधन आवश्यक असते. 'विवेकवाद' या तत्त्वात सारासार विचार येतो. सत्य- असत्य बाजू तपासून घेतली जाते. सत्याच्या आधारे मनुष्यहिताचा विचार केला जातो. विवेकवाद हे तत्त्व तर्कशुद्ध आणि बुध्दिवादावर आधारलेले आहे. 'इहवाद' या तत्त्वात प्रत्यक्ष असण्याला, दिसण्याला, जाणवण्याला महत्त्व मिळते. त्यामुळे परलोक, स्वर्गलोक, पाताळ अशा समजुती नाकारल्या जातात. 'विज्ञाननिष्ठता' या तत्त्वात प्रयोगांती मिळालेली माहिती आणि विशेष ज्ञानाला महत्त्व मिळते. विज्ञानास प्रमाण मानून विचार-वर्तन करणे म्हणजे विज्ञाननिष्ठता जोपासणे. 'समूहनिष्ठता' या तत्त्वात समूहाचा विचार केला जातो. एकेका व्यक्तीच्या सुख-दुःखाऐवजी समूहाचे प्रश्न आणि समस्या लक्षात घेतल्या जातात. 'मानवता' या तत्त्वात माणूस हे मूल्य केंद्रस्थानी मानले जाते. आपण निसर्गसृष्टीतील एक जीव असलो तरी माणूस आहोत,

प्राण्यांप्रमाणे केवळ नैसर्गिक गरजा पूर्ण करायच्या नाहीत, अखिल जगतातील मानवाच्या अस्तित्वाचा विचार करायचा, याचा विचार करून व्यवहार केला जातो. 'नैतिकता' या तत्त्वात व्यक्तीच्या न्याय वर्तनाचा, सदाचाराचा, शिष्टाचाराचा विचार केला जातो. सहजीवन आणि परस्पर हितसंबंध जोपासले जातात. गौतम बुद्ध आणि जोतीराव फुले यांनी 'नैतिकता' या तत्त्वाला महत्त्व दिले आहे . 'बुद्धिप्रामाण्यवाद' या तत्त्वात बुद्धीला महत्त्व मिळते. इतर अनेक ग्रंथात काय सांगितले आहे, त्यापेक्षा स्वतःच्या बुद्धीला कोणती प्रचीती येते याचा विचार केला जातो. त्यामुळे ग्रंथप्रामाण्य गळून पडते आणि सत्याला प्रमाण मानले जाते.

अशी अनेक तत्त्वे मनुष्यहिताला समोर ठेवून निर्माण झाली आहेत. अनेक लेखक, समाजसुधारक आणि विचारवंतांनी आपल्या वाटचालीत यातील कित्येक तत्त्वे अंगिकारली आहेत. या तत्त्वांचा प्रसार होणे गरजेचे आहे त्याप्रमाणेच ती वर्तनात येणेही गरजेचे आहे. मानव आणि त्या भोवतीने असलेली सजीव- निर्जीव सृष्टी अबाधित राहण्यासाठी ही तत्त्वे फार आवश्यक आहेत.

एकूणच तत्त्व या संकल्पनेत सत्यावर आधारित काही मूलभूत सिद्धांत असतात. विचार-वर्तनाचा तो एक दृष्टिकोन असतो. सत्य-असत्याच्या कसोटीवर पारखलेले तात्पर्य असते. तत्त्व ही अपरिवर्तनीय असतात. व्यक्ती आणि समाजाच्या विकास-वाटचालीस दिशा दाखविणारा तो बिंदू असतो. मानवाच्या वर्तनावरील तो एक अंकुश असतो. या आधारे जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्या तत्त्वांचा अंगीकार केला याचा शोध घेता येतो.

## १.३ विचार : संकल्पना व स्वरूप

विचार ही एक प्रक्रिया असते; ती मानवी मनात सतत चाललेली असते. विचार ही एक चर्चा असते; ती सारासार पाहून केली जाते. विचार हा एक तर्क असतो; तो वास्तवाच्या आधारे मांडला जात असतो. विचार ही एक कल्पना असते; जिला वैज्ञानिकतेचा आधार असतो. विचार हे एक चिंतन असते: ज्याच्या मूळाशी पध्दतशीरपणा असतो. इंग्रजीत त्यास थॉट (Thought) असे म्हणतात.

Thought means the act of process of thinking. थिंक म्हणजे विचार करणे. थिंकर म्हणजे विचार करणारा. त्यामुळे विचार हा एक मनोव्यापार असतो. विचारात युक्तायुक्तता पाहिली जाते. विचार ही बौध्दिक प्रक्रिया असते. याचा अर्थ विचारात भावना नसते असे म्हणता येत नाही. विचारप्रक्रियेच्या दृष्टीने भावना आणि बुद्धी यांची तुलना केली तर विचाराचे केंद्र बुध्दी असते आणि भावनेचे केंद्र हे मन असते.

वि + चार = विचार. यातील ' वि ' म्हणजे विशिष्ट पध्दत वा नियमांनी युक्त तर चार हे 'चर' चे रूप आहे. चर म्हणजे चालणे. बुध्दी किंवा मनाला विशिष्ट पध्दतीने, विशिष्ट शिस्तीत वा विशिष्ट दृष्टीने चालविणे म्हणजे विचार करणे. विचारप्रक्रियेतून विचार निष्पन्न होतात. त्यामुळे विचार निर्माण होण्यासाठी मन आणि बुद्धी हे दोन्ही कार्यरत असणे गरजेचे असते.

डोकं, मस्तक आणि मेंदू हे शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. प्रत्येक जीवासाठी मेंदू आवश्यक असतो. मेंदू मंदावला की विचार करण्याची प्रक्रिया मंदावते. जोतीराव फुल्यांनी मेंदूसाठी 'मती' हा शब्द वापरला आहे. "विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली..." (फुले:२००६,२६३) मती गेली याचा अर्थ विचार करणे बंद झाले. विचार करणे बंद झाले की माणूस हा स्वतंत्र राहात नाही. मती कार्यरत राहण्यासाठी विद्वेची गरज असते, त्याशिवाय विचार करता येत नाही असे त्यांना वाटत होते.

विचार करून विचार मांडणाऱ्या व्यक्तीला विचारवंत म्हणतात. त्या त्या व्यक्तीने घेतलेले अनुभव, केलेले निरीक्षण आणि चिंतन यातून विचार प्रसृत होत असतात. परिसर, सहवास, संस्कार आणि वृत्ती ही प्रत्येक व्यक्तीची सारखीच असते असे नाही. परिसर आणि प्रश्नभिन्नतेमुळे विचारांमध्ये वेगळेपणा येऊ शकतो. एकाच घटनेकडे दोन भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्तींनी पाहिले तर त्यांची प्रतिक्रिया भिन्न स्वरूपाची येते. यातून वैचारिक भिन्नता समोर येते.

विचार या संकल्पनेच्या विरोधी अविचार हा शब्द आहे. अविचारी व्यक्ती विचार न करता कृती करू शकते किंवा मत मांडू शकते. अविचारात विचार नसतात हे अर्धसत्य आहे, मात्र ते विचार पारंपरिकतेने आलेले असतात. त्यात मनुष्यहिताच्या बाबी नसतात. 'अविचार' या शब्दातच 'विचार' हा शब्द येतो त्यापूर्वी आलेला 'अ' हा पूर्वप्रत्यय मात्र नकारार्थी आहे. यावरून विचाराचे विविध प्रकार संभवतात.

व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती असतात. प्रत्येकाचे कार्यक्षेत्र वेगवेगळे असू शकते. वय, लिंग, धर्म, जात, स्तर, प्रदेश आणि व्यवसाय याचा विचारावर प्रभाव झालेला असतो. काही व्यक्ती या प्रभावातून मुक्त होऊन विचार करणाऱ्या असतात. प्रत्येक व्यक्ती विचार करीत असली तरी प्रत्येकाची विचार करण्याची दिशा वेगवेगळी असते. त्यातील लिंगपरत्वे विचार समजून घेतला पाहिजे.

स्त्री ही कुटुंबात रमणारी, गृहकर्तव्यदक्ष असेल, ती शिक्षित आणि नोकरी करणारी असेल, ती स्त्रीवादी असेल, ती घटस्फोटित-विधवा-परित्यक्ता असेल तर ती वेगळा विचार करू शकते. पुरुष हा पितृसत्ताक व्यवस्थाशरण असेल तर तो वेगळा विचार करतो. अशावेळी तो पारंपरिक चौकट न सोडता विचार करतो. त्याच्या विचारात अधिकारशाही असते. यापेक्षा प्रवृत्तीनिहाय विचार वेगळा असतो.

आत्मकेंद्री व्यक्ती स्वतःपुरते विचार करतो. भ्रष्ट व्यक्तीचे विचारही वेगळे असतात. स्वार्थी व्यक्ती दुसऱ्याचा विचार करू शकत नाही. मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू सांगितले आहेत. उदा. शोषक, शोषित, रागीट, प्रेमळ, प्रामाणिक, तुसडे, संशयखोर, विश्वासू, तिरकस, विनोदी, भांडकुदळ, निरागस, परोपकारी, क्षमाशील. आपापल्या स्वभावधर्मानुसार त्या त्या व्यक्ती विचार करतात. यापेक्षा क्षेत्रनिहाय विचार वेगवेगळे असतात.

शिक्षणप्रक्रियेच्या अनुषंगाने शैक्षणिक विचार मांडले जातात. भांडवल, उत्पादन, नफा-तोट या अनुषंगाने आर्थिक विचार मांडले जातात. राज्यकारभार आणि प्रशासनाच्या अनुषंगाने राजकीय विचार मांडले जातात. शेतीच्या अनुषंगाने कृषीविचार येतात. धर्माच्या माध्यमातून

धार्मिक विचार येतात. अशा प्रकारे त्या त्या क्षेत्राला समोर ठेवून विचार केला जातो. उदा. क्रीडा, वैद्यकीय, साहित्य, संस्कृती, राजकारण, उद्योग, सेवा, वाहतूक, पाणी. यापेक्षा विचारसरणी, वाद किंवा इझम समोर ठेवून विचार मांडले जातात.

इझम, वाद किंवा विचारसरणी ही एखाद्या विचारवंतांच्या विचार-वर्तनाचा परिपाक असतो. जागतिक पातळीवर कार्ल मार्क्सने मांडलेले विचार आणि त्याने घेतलेली भूमिका यावरून मार्क्सवाद समोर आला. जोतीराव फुल्यांनी स्त्री, शूद्रातिशूद्र आणि शेतकऱ्यांच्या अनुषंगाने घेतलेल्या भूमिकेतून फुलेवाद पुढे आला. चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या नकारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली भूमिका आंबेडकरवादाला जन्म देते. महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या संदर्भाने घेतलेल्या भूमिकेत गांधीवाद आढळतो. स्त्री-पुरुषांना माणूस म्हणून पाहण्याच्या भूमिकेत स्त्रीवाद आढळतो. त्याचबरोबर परिवर्तनवादी, विज्ञाननिष्ठ, इहवादी, विवेकवादी, पुरोगामी, लोकशाहीवादी, हिंदुत्ववादी अशा किती तरी भूमिका घेऊन विचार मांडणारे विचारवंत आहेत.

विविध समस्या आणि प्रश्न समोर ठेवूनही विचार मांडले जातात. उदा. जातियता, स्त्रीभृणहत्या, लैंगिक शोषण, व्यसन, प्रदूषण, पर्यावरण, वाढती लोकसंख्या, वाढते तापमान, आतंकवाद, पूर, रोगराई, बेकिरी, भिकारी, अस्वस्थता, गुन्हेगारी, बलात्कार, अन्याय, दंगल, संरक्षण, न्याय, अपघात, गुंडगिरी, फसवणूक, हुंडा, घटस्फोट, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, भेसळ, महागाई, हिंसा, स्थलांतर, धर्मांतर अशा अगणित समस्यांना समोरे जावे लागते. त्यावरील उपाययोजनांसंदर्भात विचार मांडले जातात.

एकूणच तत्त्व आणि विचार या दोन्ही संकल्पना परस्परपूरक असल्या तरी त्यात काही एक फरक आढळतो. तत्त्वे ही बदलली जात नसतात. विचारात बदल होऊ शकतो. समाज आणि व्यक्तीच्या विकास वाटचालीसाठी तत्त्व आणि विचाराची गरज असते. त्यानुषंगाने जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्या तत्त्वांचा आणि विचारांचा अंगिकार केला आहे, याचा शोध घेता येतो.

# अ) जोतीराव फुले : तत्त्व आणि विचार प्रेरणा

## १.४ जोतीराव गोविंदराव फुले

११ एप्रिल १८२७ रोजी जोतीराव फुले यांचा जन्म झाला. एकविसाव्या वर्षी उच्चवर्णीय मित्राच्या लग्नात अपमान झाला. त्याच वर्षी त्यांनी शूद्रातिशूद्र मुलींसाठी शाळा सुरू केली. बाविसाव्या वर्षी पत्नीसह घर सोडले आणि सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. १८५५ मध्ये त्यांनी 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले. १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. १८६९ मध्ये 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा' 'विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी' (पोवाडा) आणि 'ब्राह्मणांचे कसब' ही पुस्तके लिहिली. १८७३ मध्ये 'गुलामगिरी', १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा असूड', १८९० मध्ये 'सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके लिहिली. त्यांच्या पद्यस्वरूपातील रचना 'अखंड' या नावाने प्रसिद्ध आहेत. १८९१ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. आपल्या ह्यातीत जोतीराव फुले यांनी कोणत्या तत्त्वांचा आणि विचारांचा अंगिकार केला, याचा शोध घेता येतो.

### १.४.१ जोतीराव फुल्यांचे शिक्षणविषयक विचार:

जोतीराव फुले यांच्या चिंतनात शिक्षणविषयक विचाराला अनन्यसाधारण महत्त्व मिळाले आहे. शिक्षणाविषयी लोकांमध्ये प्रबोधन झाले पाहिजे, लोकांमध्ये जागृती आली पाहिजे असे त्यांना वाटत होते. लोक धार्मिक गुलामगिरीत लोक अडकले होते. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अनेक कर्मकांडांचे पालन करीत होते. त्यांच्यात शहाणपणा यावा यासाठी त्यांनी आपल्या गद्य-पद्यरचनेतून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ शिक्षणाचे महत्त्व सांगितले नाही तर शिक्षणाची सोय केली. १८४८ मध्ये पुणे येथील बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. १८५५ मध्ये रात्रशाळा सुरू केली. शिक्षणविषयक कार्य करताना शिक्षणाचे महत्त्व पटवून लोकांचे प्रबोधन करणारे जोतीराव फुले हे खरे शिक्षणतज्ज्ञ होते.

१८५५ मध्ये जोतीराव फुल्यांनी 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले. या नाटकात त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. आईच्या उदरात मूल वाढू लागते इथपासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत आणि मृत्यूनंतरही ब्राह्मण जोशी हा अनेकांना कसा लुटत जातो, याचे चित्रण केले आहे. त्यातील स्त्रीचा पती हा विदूषक आणि पाद्री यांच्या मार्गदर्शनामुळे प्रबोधित होतो. अज्ञानामुळे आपण लुबाडलो जात आहोत हे त्याला कळते. तो आपल्या पत्नीला म्हणतो , "आपण लौकर जेवण आटोपून आपल्या घरापलीकडील त्या रा.रा. जोतीराव गोविंदराव फुले यांच्या वाड्यात त्यांची स्त्री सौ. सावित्रीबाई फुले यांनी उपवर स्त्रियांसाठी रात्रीची जी शाळा घातलेली आहे त्या शाळेत तू आजपासून जावें व तेथें रा.रा. जोतीराव फुले यांनी वयस्कर पुरुषांकरिता रात्रीची जी दुसरी शाळा घातलेली आहे तीत आजपासून मी जाणें सुरू करितों." (फुले : २००६,३३) शिक्षणाची सोय करूनही लोक शिकायला येत नसत. शिक्षणाविषयी अनास्था असलेल्या लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटले पाहिजे, या भूमिकेतून ते लेखन करीत होते. शिक्षण हेच सर्व प्रश्नांवरील उत्तर आहे असे त्यांना वाटत होते.

'ब्राह्मणाचे कसब' (१८६९) या पद्यपुस्तकातही जोतीराव फुले यांनी शिक्षणाचा आग्रह धरला आहे. पुराणातील दाखले देऊन, देव-धर्माची भीती घालून लोक अज्ञानी कसे राहतील याची व्यवस्था केली. शुद्रातिशुद्राचे शोषण करणाऱ्या भटाचे कसब ते उघड करतात. सत्तेवरच्या राणीला ते म्हणतात, "शिकिव शुद्राला ॥ पंगु बंधुला ॥ दास ब्रह्म्याने ॥ मुळी केले ॥ ज्ञान देण्याचे बंद ठेवलें ॥" (तत्रैव,पृ.११६) इथला शुद्रातिशूद्र हा शिक्षणापासून दूर ठेवला आहे, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळेच आपल्या सरकारने लोकांच्या शिक्षणाची सोय करावी अशी भूमिका ते या पद्यरचनेत मांडतात.

'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) या पुस्तकाच्या उपोद्घातात जोतीराव फुले यांनी मांडलेल्या ओळीत शिक्षणविषयक विचाराचा सार आढळतो. "विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली ! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले." ( तत्रैव, पृ.२६३) या ओळी लयदार आहेत मात्र त्यात मांडलेले कार्यकारण अभूतपूर्व असे आहे. यापूर्वी शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाचा इतका गंभीर विचार कुणी केला नव्हता. अज्ञानामुळे शुद्र गुलामीत जगतात, त्यांची मती गुंग होते, आपली झालेली फसवणूक कळत नाही, याचा खोलवर विचार जोतीराव फुले करीत होते.

'विद्येविना' आणि 'अविद्या' या दोन शब्दांतून जोतीराव फुले भारतीय समाजव्यवस्थेचे वास्तव मांडतात. शुद्रातिशूद्र आणि स्त्रियांना शिक्षण देणे सहेतूक टाळले. प्राचीनकाळी स्त्रियांना शिक्षण मिळत होते हे मैत्रेय, गार्गी या स्त्रियांवरून वाटते. पुढे ही शिक्षणाची परंपरा बंद ठेवली. स्त्री शिकली तर कुटुंब सुधारते, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळेच ते शिक्षणाचा गंभीरपूर्वक विचार करीत होते.

१८८२ मध्ये जोतीराव फुले यांनी हंटर शिक्षण आयोगापुढे निवेदन सादर केले होते. लॉर्ड रिपनच्या काळात विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली 'हंटर कमिशन' नेमले होते. भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांची चौकशी होणार होती. या निवेदनात फुल्यांनी प्रथम स्वतः शिक्षणविषयक कोणकोणते कार्य केले आहे, याचा आढावा घेतला आहे. त्यापुढे त्यांनी शिक्षणविषयक अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यात “I think primary education of the masses should be made compulsory up to a certain age, say at least 12 years.” (तत्रैव, पृ.२४७) म्हणजेच किमान १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, असे त्यांनी सुचविले होते.

प्राथमिक शिक्षणाची होणारी हेळसांड, शिक्षणविषयक कराचा अयोग्य वापर, शहरातूनच शिक्षणाचा लाभ मोठ्या प्रमाणात होतो आहे, शेतकरी वर्गास शिक्षण मिळत नाही, प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रामुख्याने ब्राह्मण असतात, त्यांची पूर्वग्रहदूषित भूमिका कनिष्ठ वर्गास हितावह नसते, याकडे जोतीराव फुले लक्ष वेधतात. ते म्हणतात, "शेतकरी वर्गातले शिक्षक त्या वर्गात अधिक सहजपणे मिसळतील, त्यांच्या गरजांशी, आशाआकांक्षांशी अधिक चांगल्या रीतीने समरस होतील. प्रसंगी नांगराची लुमणी किंवा सुताराची तासणी हाती घेण्यात त्यांना कमीपणा वाटणार नाही. समाजातील कनिष्ठ थरांशी ते तत्परतेने एक होतील." ( तत्रैव, पृ.७६८ व ७६९) त्यामुळे शिक्षक हे त्या त्या वर्गातील असावे हा जोतीरावांचा दृष्टिकोन होता. माउंट एल्फिन्स्टन याने आपल्या शैक्षणिक धोरणात वरच्या वर्गातील लोकांचा विचार केला होता. त्याला इंग्रजी शिक्षण घेतलेले लोक कारभारासाठी हवे होते. जोतीराव फुले यांना नोकरी करण्यासाठी शिक्षण नको होते. लोकांमधले अज्ञान दूर होऊन समाजपरिवर्तन व्हावे असे त्यांना वाटत होते.

१८३३ मध्ये लॉर्ड मेकॉले याने शिक्षणविषयक 'झिरपण्याचा सिध्दांत' मांडला. जोतीराव फुल्यांच्या काळातही तो प्रचलित होता. त्यानुसार वरच्या वर्गाला शिक्षण दिले तर ते खालच्या वर्गाला शिकवतील, म्हणेजच शिक्षण हे वरून खाली झिरपत जाईल. या सिध्दांताला जोतीराव फुल्यांनी विरोध केला. शिक्षण हे विशिष्ट वर्गापुरते मर्यादित ठेवणे हितावह नाही, ते कनिष्ठ वर्गासही मिळाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळेच धनंजय कीर म्हणतात, "सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली आहे, असे सरकारला स्पष्टपणे सांगणारे जोतीराव फुले यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणी प्रभावी प्रवक्ते नव्हते." (कीर : २०१८,१३८)

प्राथमिक शिक्षणाविषयी जोतीराव फुले अतिशय गंभीरपूर्वक विचार मांडतात. सरकारी शाळांमधून मोडी-बालबोध लेखनवाचन, हिशेब, इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान द्यावे तसेच शेती, नीती आणि आरोग्य हे विषय शिकवावेत, व्यवहारोपयोगी शिक्षणावर भर द्यावा आणि स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे, असे यांचे मत होते. पूर्वसूचना न देता शाळांची तपासणी झाली पाहिजे असेही ते सूचवितात.

जोतीराव फुले यांनी उच्च शिक्षणाविषयी घेतलेली भूमिकाही समजून घेतली पाहिजे. प्राथमिक असो वा उच्च शिक्षण, त्याची जबाबदारी ही सरकारने घेतली पाहिजे. "कोणत्याही पातळीवरची शिक्षणव्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे इष्ट नाही." (फुले:२००६,७७३) असे ते म्हणतात. महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण हे कारकून आणि शिक्षक होण्यासाठी उपयुक्त ठरते. त्याऐवजी उच्च शिक्षण हे जीवनांतील गरजा भागविण्यासाठी उपयोगी ठरले पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

एकंदरीत जोतीराव फुले यांचे शिक्षणविषयक विचार हे निव्वळ शिक्षित होणे किंवा अक्षरज्ञानी होणे इथपर्यंत मर्यादित नव्हते. शिक्षण हे सर्वांना मिळाले पाहिजे, वरच्या वर्गाला शिक्षण  मिळाले तर ते झिरपत खालच्या वर्गाला मिळत नाही. शिक्षणाची जबाबदारी पूर्णतः सरकारने उचलली पाहिजे. शिक्षणातून कारकून आणि शिक्षक होण्यापेक्षा जीवनांतील गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. उपयुक्त व्यवसाय आणि रोजगारधंदे यासाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे, शिक्षणामुळे मती म्हणजे बुद्धी संपादन करता आली पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

### १.४.२ जोतीराव फुल्यांचे धार्मिक विचार:

धर्म हा शब्द व्यापक अर्थाचा आहे. धर्म म्हणजे विशिष्ट एक बाब असे स्पष्ट करता येत नाही. धर्म हा संस्कृत शब्द आहे. त्यानुसार धर्म म्हणजे विशिष्ट शास्त्रानुसार विचार-वर्तन करण्यासाठीची संहिता. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत माणसाने कसे वागावे याची व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामूहिक आचारपध्दती म्हणजे धर्म. इंग्रजीत त्यासाठी रिलिजन (religion) असा शब्द आढळतो. विश्वास, श्रध्दा आणि भक्ती यांसाठी निर्माण झालेली आचारपध्दती म्हणजे धर्म. धर्म हा त्या त्या समूहासाठी प्रचलित झालेला असतो. ख्रिश्चन (बायबल), बौद्ध (त्रिपिटक), इस्लाम (कुराण) आणि हिंदू (वेद, उपनिषदे आणि भगवद्गीता) हे जागतिक पातळीवरील प्रमुख धर्म आहेत. भारतात या धर्माशिवाय जैन, शीख, पारसी, बहाई असे अनेक धर्म आहेत. प्रत्येक धर्माची स्वतःची एक शिकवण आहे, आचारपध्दती आहे, काही श्रध्दा आणि तत्त्वे आहेत. जोतीराव फुले यांनी धर्माच्या संदर्भाने आपले विचार व्यक्त केले आहेत.

जोतीराव फुल्यांनी १८९० मध्ये आजारी अवस्थेत 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहिले. बळवंतराव आणि जोतीराव यांच्या चर्चेतून 'सार्वजनिक सत्यधर्म' उलगडत जातो. पुढे गोविंदराव आणि जोतीराव, यशवंतराव फुले आणि जोतीराव फुले यांच्यात विविध मुद्यांवर चर्चा होते. उदा. पूजा, नामस्मरण, नैवेद्य, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्रीपुरुष, पाप, पुण्य, जातिभेद, धर्म, नीति, तर्क, दैव, सत्य, ग्रह, जन्म, लग्न, दुष्टाचरण, मृत्यू, प्रेताची गति, श्राध्द आणि प्रार्थना. 'धर्म' या मुद्यावर चर्चा करताना धर्म कशाला म्हणता येत नाही, याचे सर्वप्रथम ते विवेचन करतात. उदा. रयतेपासून कर घेणे हा धर्म नव्हे तर राजाचे कर्तव्यकर्म आहे. मजुरी घेऊन एखादे कर्म केले तर तो धंदा किंवा उद्योग होतो, धर्म होत नाही, असे ते स्पष्ट करतात. धर्म कशास म्हणावे हे स्पष्ट करताना जोतीराव फुले म्हणतात, " एकंदर सर्व पुरुषांनी सत्यास स्मरून एकमेकांनी एकमेकांशी निर्मळ व पवित्र अंतःकरणानें वागल्याशिवाय त्या सर्वांमध्ये निर्मळ भाऊपणा जागृत होणार नाहीं." (फुले:२००६, पृ.४८७) या विवेचनात त्यांनी 'सत्य' या संकल्पनेला महत्त्व दिले आहे. याच पुस्तकाच्या

उत्तरार्धात दिलेल्या प्रार्थनेत ते म्हणतात, "मानवाचा धर्म एकच असावा ॥ सत्यानें वर्तावा ॥ जोती म्हणे॥" ( तत्रैव, पृ.५५८) म्हणजे धर्माबाबत, सत्यानुसार वर्तन करण्यावर ते भर देतात.

जोतीराव फुल्यांनी 'निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक' अशी धर्माची सुटसुटीत व्याख्या केली आहे. यात 'निर्मिक', 'सत्य' आणि 'एक' या तीन संकल्पना आढळतात. "सत्याने वर्तावें मानवाचा धर्म" (तत्रैव, पृ.५७१) या ओळीतही 'सत्य' ही संकल्पना आली आहे. आपलाच धर्म श्रेष्ठ मानणाऱ्या प्रत्येकाला ते 'सत्य' हे मूल्य जपण्यास सांगतात. यावरून जोतीराव फुल्यांच्या धर्मात सत्याला किती महत्त्व दिले आहे, हे समजून येते.

निर्मिक म्हणजे निर्माण करणारा. ज्याच्याकडून निर्माण केले जाते तो निर्मिक. यातील निर्मिक म्हणजे देव नव्हे. त्यामुळे धर्म हा ईश्वराने निर्माण केला, या श्रध्देवर आपोआप आघात होतो. अवतार ही संकल्पना जोतीराव फुल्यांनी नाकारली. त्यांनी अवतार या संकल्पनेला डार्विनचा उत्क्रांतवाद लावून पाहिला. मत्स्य, शंखासूर, कच्छ, वराह, हिरण्याक्ष, नरसिंह यांचा उदय म्हणजे अवतार नसून उत्क्रांत होत गेलेले एक सत्य आहे, असा विचार मांडला. त्यामुळे धर्मात ज्या म्हणून अलौकिक, काल्पनिक आणि अशक्य बाबी होत्या त्यांचे महत्त्व कमी केले.

जोतीराव फुले यांनी आपल्या धर्मविचारात सत्याला केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या धर्मास 'सार्वजनिक सत्यधर्म' असे नाव दिले. सत्य म्हणजे खरे, वास्तव अथवा जसे आहे तसे, असे जरी म्हटले तरी प्रत्येकाला आपलेच खरे वाटू शकते. त्यामुळे ते सत्य या शब्दापूर्वी 'सार्वजनिक' हे विशेषण लावतात. असेच सत्य की जे सार्वत्रिक स्वरूपाचे आहे, जे सर्व प्राणीमात्रांना लागू पडते आणि ज्याची अनुभूती प्रत्येकाला घेता येते. "सत्यास स्मरून एकंदर सर्व सार्वजनिक सत्य मग तें क्षुल्लक कां असेना, पण त्याचें आचरण केल्यानें कोणताहि मानव प्राणी दुःखी होणार नाही..." (तत्रैव,पृ.४५८) त्यामुळे वैयक्तिक सत्य मागे पडते. सार्वजनिक सत्य मानल्यामुळे स्त्री-पुरुष समान आहेत, हे समजून येते.

'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक धर्मविचार प्रतिपादन करते. हे करताना जोतीराव फुले इतर धर्मांच्या पुस्तकात काय नाही, याकडेही लक्ष वेधतात. ते म्हणतात, "या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनीं धर्म पुस्तकें केलीं आहेत, त्यांपैकी एकही ग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाहीं." (तत्रैव,पृ.४५९) त्यामुळे कोणत्याही धर्मग्रंथाचा आधार न घेता सत्यवर्तन करण्याला त्यांनी धर्मात प्राधान्य दिले.

जोतीराव फुल्यांनी सत्यवर्तनास धर्मात महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यासाठी एकूण ३३ नियम सांगितले आहेत. त्यात त्यांनी स्त्री-पुरुष समतेला अग्रक्रमांकावर ठेवले आहे. निर्मिकाऐवजी दगडी मूर्तीला मान देऊ नये. निर्मिकास काहीही अर्पण करू नये. प्राणीमात्रांना त्रास देऊ नये. त्यांना सर्व उपभोग घेण्याची संधी द्यावी. कोणावरही जबरदस्ती करू नये, इतरांना पीडा देऊ नये. पती-पत्नी सोडून इतरांबरोबर बहीण भावाप्रमाणे वर्तन करावे. आपल्या विचार-मतामुळे इतरांचे नुकसान होऊ नये. धार्मिक वा राजकीय मतावरून इतरांचा छळ करू नये. सर्वांना धर्मासंबंधी गावकी वा मुलकी अधिकाराच्या जागा मिळाव्यात. स्वातंत्र्य, मालमत्ता आणि संरक्षणासाठी कार्य करावे. आई-वडील आणि

वृध्दांना बहुमान द्यावा. अफू, भांग, मद्य अशा अमली पदार्थांचे सेवन करू नये. हत्या करू नये. लबाड बोलू नये. व्यभिचार करू नये. चोरी करू नये. द्वेषाने इतरांच्या घर वा वस्तूस आग लावू नये. न्यायी प्रतिनिधीविरुध्द बंड करू नये. जगहितपर धर्मपुस्तक इतरांनाही दाखवावे. कोणी कोणास नीच मानू नये. कोणासही दास मानू नये. शिक्षकांनी शिकविताना दूजाभाव करू नये. न्यायाधिशांने पक्षपाती असू नये. शेतकी वा कलाकौशल्य करणाऱ्यांचा आदर करावा. कष्ट करून निर्वाह करणाऱ्यास तुच्छ मानू नये. धर्माच्या नावाखाली शोषण करू नये. ब्रह्मर्षीचे सोंग घेऊन अंगाराधुपारा देऊ नये. कल्पित देवाचे अनुष्ठान करू नये. अज्ञानी जनात कलह लावू नये. मानवांमध्ये भेदभाव करू नये. महारोगी, पंगू आणि अनाथांना मदत करावी. या नियमांनी वर्तन करणारा हा सत्यवर्तनी असतो, असे जोतीराव फुले यांना वाटते.

कोणताही धर्म असो, त्यात पूजेला महत्त्व दिले जाते. पूजा म्हणजे काय ? ती कशी करावी ? याचाही विचार जोतीराव फुले करतात. निर्मिकावर फुले वाहून पूजा करण्यास त्यांनी नकार दिला आहे. "या अफाट पोकळींतील अनंत सूर्यमंडळांसह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित पृथ्वीवरील पुष्पें वगैरे सर्व सुवासिक पदार्थ जर निर्माणकर्त्यांनी दयादृष्टीनें आपल्या मानवाच्या उपभोगासाठी उत्पन्न केलीं आहेत, तर त्यांपैकी कोणता पदार्थ उलटा आपण निर्मीकावर वाहून त्याची पूजा करावी ?" (तत्रैव, पृ.४६१) असा प्रश्न उपस्थित करून, कोणाच्या गळ्यात फुलांची माळ घालावी, याविषयी ते सांगतात. त्यांना वाटते, स्वतःच्या कष्टाने आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करणारा, अज्ञानी लोकांची स्वार्थी लोकांच्या जाळ्यातून मुक्तता करणारा जो कोणी सत्पुरुष असेल, त्याच्या गळ्यात फुलांची माळा अर्पण करावी. त्यामुळे जोतीराव फुले यांचा धर्म हा सत्यावर आणि सत्यवर्तनावर आधारलेला आहे, हे सहज लक्षात येते.

जोतीराव फुले यांच्या धार्मिक विचारात कर्मकांड येत नाही. चमत्कार आणि अंधश्रद्धा येत नाही. देव, परमात्मा, नैवेद्य, अनुष्ठान, स्वर्ग, जातिभेद आणि अवतार कल्पना यांना स्थान नाही. त्यांनी सार्वजनिक सत्याला सर्वोच्च स्थान दिले आहे. धर्म हा मानवाचे कल्याण करणारा आणि स्त्री-पुरुषांना समान मानणारा असला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. धर्म आणि विज्ञान यांचा एकत्र विचार करून मानवापुढे आचार आणि विचारांची संहिता मांडणारे जोतीराव फुले आधुनिक धर्मपंडित होते.

### १.४.३ जोतीराव फुल्यांचे सामाजिक विचार:

जोतीराव फुले यांनी मानवी समाज कसा असावा, याविषयी विचार मांडले आहेत. त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. याविषयीची हकिकत तुकाराम हनमंत पिंजन यांनी दिली आहे. ते म्हणतात, "सत = खरे, शोधक = तपास करणारा, मंडळ = समाज, म्हणजे सत्याचा तपास करणारा समाज असे नाव देण्याचे ठरून तारीख २४ माहे ससंबर सन १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन झाला." (तत्रैव, पृ.७१८) सत्यशोधक समाजात राजकीय विषयांवर बोलण्यावर बंदी होती. '...समुपदेश व विद्याद्वारे त्यांस (शूद्र लोकांस) त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शूद्र मंडळींनी हा

समाज स्थापन केला.' (तत्रैव, पृ.२०५) असा उल्लेख सत्यशोधक समाजाच्या रिपोर्टमध्ये आढळतो. यावरून 'सत्यशोधक समाजा' ची ध्येय-उद्दिष्टे समजून येतात.

लनविधीत शूद्र लोकांची लुबाडणूक होत होती, हे जोतीराव फुल्यांना कळले होते. लग्नातील वाईट चाली बंद होणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी विधी' तयार केली. त्यात वर आणि वधू 'एकमेकांना अंतर न ठेवण्याची' शपथ घेतात. जी दक्षिणा पूर्वी भटब्राह्मणास दिली जात होती ती सत्यशोधक समाज फंडाला दिली जात असे. त्यातून मुलामुलींना शिक्षण दिले जात असे. गरिबीमुळे मुलांचे शिक्षण बंद पडू नये, यासाठी शिष्यवृत्ती दिली पाहिजे, हा विचारही सत्यशोधक सदस्य अमलात आणत होते. ज्यांना दिवसा अभ्यास करता येत नाही, अशांसाठी रात्रीची शाळा सुरू केली होती. एकूणच शूद्र लोकांत विद्येची गोडी वाढली पाहिजे आणि समाज हा वाईट चाली-रीतिंपासून मुक्त झाला पाहिजे असे जोतीराव फुल्यांना वाटत होते.

भारतातील लोक इंग्रज काळत ब्राह्मणशाही, अज्ञानशाही आणि इंग्रजशाही या तिन्हींमुळे त्रस्त होती, याकडे जोतीराव फुले आपले लक्ष वेधतात. 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा' या पोवाड्यात शेवटी त्यांनी एक अभंग दिला आहे. त्यात त्यांनी इंग्रज काळातही ब्राह्मणशाही सर्वसामान्य माणसांना त्रस्त करीत होती, याविषयी विचार मांडले आहेत. ते म्हणतात, "सत्ता तुझी राणीबाई । हिंदुस्थानी जागृत नाही ॥ / जिकडे तिकडे ब्राह्मणशाही । डोळे उघडून पाहीं ॥ / खेडेगावी कुलकर्णी । आहे लेखणीचा धणी ॥ / माहालामध्यें महालकरी । जसा अष्ट अधिकारी ॥ / यमवत मामलेदार । शुद्रा शिक्षा अनिवार ॥" (तत्रैव, पृ.८१) शिवाय जेजुरी, पंढरपूर अशा ठिकाणी शेतकरी, शुद्रातिशूद्र गेल्यानंतर अंघोळ करतेवेळी सर्वांकडून दक्षिणा घेतली जात होती. विविध सण, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण अशा प्रसंगीही पैसे आणि सिधा घेतला जात होता. यावरून समाजव्यवस्थेचे स्वरूप लक्षात येते. शिक्षणाचा अभाव, जुनाट प्रथा आणि इंग्रजांचे स्वार्थी धोरण यांमुळे समाज कुंठित झाला होता. त्यामुळे समाजपरिवर्तन होणे आवश्यक असल्याचे विचार जोतीराव फुले मांडत होते.

आपला समाज हा चार वर्णांत विभागला आहे. अनेक जाती आहेत. अज्ञानामुळे मतलबी ग्रंथकारांनी समाजाची विभागणी केली. जर ज्ञान मिळाले असते तर ही विभागणी झाली नसती. जोतीराव फुले म्हणतात, "तू बुध्द, तू ख्रिस्ती, तूं मुसलमान, तूं महार म्हणून नीच व आम्ही ब्राह्मण म्हणून उंच आहोंत, असे म्हणण्याची जुरत तरी झाली असती काय ?" (तत्रैव, पृ.२९१) ही उच्च-नीच विभागणी जोतीराव फुल्यांना मान्य नव्हती.

समाजातील स्त्रीपुरुषांनी कसे वागावे याचाही जोतीराव फुले विचार करीत होते. त्यांच्या 'अखंड' रचनांमधून मानवी स्त्रीपुरुष, आत्मपरीक्षण, नीति, धीर, समाधान, सहिष्णुता, सद्विवेक, उद्योग, स्वच्छता आणि गृहकार्यदक्षता याविषयी विचार आढळतात. खरी माता कशी असते, याविषयी ते म्हणतात, "धर्म-देश-जाती-भेद नाहीं तिला ॥ शोभे मनुजाला ॥ खरी माता" (तत्रैव, पृ. ५७०) आपला समाज हा सत्याने वर्तन करणारा असला पाहिजे असे त्यांना वाटत होते.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने आत्मपरीक्षण केले पाहिजे. सत्याने वर्तन केले पाहिजे. कोणासही त्रास देता कामा नये. आपली योग्यता पाहात असताना दुसऱ्याची योग्यताही लक्षात घेतली पाहिजे. स्वार्थ बाजूला ठेवून दुसऱ्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, हा विचार

मांडताना जोतीराव फुले म्हणतात, "जगामाजीं सर्व मजला असावें ॥ शेजाऱ्या नसावें ॥ हेवा मुळ / स्वतः हितासाठी तळमळ करी ॥ झटे सर्वोपरी ॥ किर्तीसाठी ॥" ( तत्रैव,पृ.५७५) समाज असा निकोपतेने बांधला जावा अशी तळमळ त्यांच्या विचारात आढळते.

समाजामध्ये नैतिकता वाढली पाहिजे असे जोतीराव फुल्यांना वाटत होते. त्यासाठी लोकांनी नीतितत्त्वाचे पालन केले पाहिजे. एकमेकांना त्रास न देता सर्वजण सुखी होतील असे मानव धर्माचे वर्तन करणे म्हणजे नीती आहे. सत्य ही नीतिची निशाणी आहे. त्यासाठी खोटे बोलू नये, विश्वासघात करू नये, सहिष्णुता बाळगावी आणि धीर धरावा असे ते सांगतात.

समाज हा सुखी होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने काही आचारधर्म पाळला पाहिजे असे जोतीराव फुले आपल्या अखंडात सांगतात. प्रत्येकाने आपले मन समाधानी ठेवले पाहिजे. धर्मभेद मानू नये. सर्वजण एकोप्याने राहावे. सत्याचा आधार नाही असा कोणताही धर्म मानू नये. सद्विवेक बाळगून वर्तन करावे. व्यसनाच्या आहारी जाऊ नये, त्याऐवजी ग्रंथासाठी पैसे खर्च करावे, हा विचार मांडताना ते म्हणतात, "थोडे दिन तरी मद्य वर्ज करा ॥ तोच पैसा भरा ॥ ग्रंथासाठीं / ग्रंथ वाचीताना मनीं शोध करा ॥ देऊं नका थारा वैरभावा ॥" (तत्रैव,पृ.५८३) यावरून जोतीराव फुले हे निरोगी समाज सत्यात उतरावा यासाठी विचार मांडत होते, हे लक्षात येते.

समाजातील अज्ञान दूर व्हावे, खोट्या आणि काल्पनिक कथांमधून लोकांची सुटका व्हावी यासाठी जोतीराव फुले पुराणातील अनेक कथांवर टीका करीत होते. गणपती ही देवता सर्वसामान्य माणसाच्या मनातले श्रध्दास्थान. या श्रध्दास्थानावर ते हल्ला करतात. "पशुशिरीं सोंड पोर मानवाचें ॥ सोंग गणोबाचें ॥ नोंद ग्रंथी ॥ / बैसे उंदरावरी ठेवूनिया बूड ॥ फुकितो शेंबूड ॥ सोंडेंतून ॥" (तत्रैव, पृ.५८९) पुराणग्रंथांच्या आधारे कोणाचेही शोषण होऊ नये असे जोतीराव फुल्यांना वाटत होते. त्यामुळे अशाप्रकारच्या टीका ते इतर लेखनातूनही करतात.

माणसा-माणसांमधील भेद नाहीसा झाला पाहिजे, हे जोतीराव फुल्यांच्या विचारातील मध्यवर्ती सूत्र आहे. आर्यांनी धर्मग्रंथांची भीती दाखवून शुद्रांना दास केले. शुद्रातिशुद्रांचे शिक्षण बंद केले. जातिभेद निर्माण करून स्वार्थ साधला. स्त्रीचे अधिकार संपुष्टात आणले. चार वर्णांत समाज विभागून टाकला. श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेद निर्माण केला. जप अनुष्ठान, व्रत वैकल्ये यांमध्ये लोकांना अडकवून टाकले. स्त्रियांना पुनर्विवाह करण्यावर बंदी केली. अशा अनिष्ट प्रथा परंपरांपासून समाज मुक्त झाला पाहिजे असे जोतीराव फुल्यांना वाटत होते. त्यासाठी 'मनु धिःकारुनी एकीकडे फेका' असे आवाहन ते आपल्या अखंडात करतात. स्पर्शबंदी, विवाहबंदी, विद्याबंदी आणि रोटीबंदी करणारे पुराणग्रंथ संपवले पाहिजे असे त्यांना वाटत होते. मनुस्मृतीचे समर्थन करणाऱ्या लोकांना ते म्हणतात, "बंधु आर्य राया दयावान व्हावा ॥ जाळून टाकावा ॥ मनुग्रंथ ॥" (तत्रैव, पृ.५८४) त्यांची ही विनवणी मान्य होईल यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्यामुळे शुद्रातिशुद्र आणि स्त्रियांना ते सजग करतात. आर्यभटांचे कसब ओळखून सत्य शोधण्याचा आणि प्रगती करण्याचा सल्ला देतात.

एकंदरीत जोतीराव फुल्यांनी आपल्या लेखनात सामाजिक समतेचा विचार मांडला. व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी समता या तत्त्वांची जोपासना त्यांच्या विचारात आढळते.

अज्ञानशाही, इंग्रजशाही आणि भटशाही यांच्यामुळे इथले शूद्रातिशूद्र नाडले जात आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. एकोणिसाव्या शतकात सामाजिक समतेचा विचार मांडून प्रत्यक्ष कृती करणाऱ्या महामानवात जोतीराव फुले हे अग्रस्थानी होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

### १.४.४ जोतीराव फुल्यांचे कृषीविषयक विचार:

जोतीराव फुल्यांनी आपल्या विचार-कार्यात शेती आणि शेतकरी बांधवांच्या प्रगतीला अतिशय महत्त्व दिले आहे. 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) या पुस्तकाच्या पहिल्याच पृष्ठावर लिहिले आहे 'शूद्र शेतकऱ्यांचे बचावाकरिता केले आहे.' एकूण पाच प्रकरणात विभागलेले हे पुस्तक म्हणजे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांच्या स्थिती-गतीचा आरसा आहे. उपोद्घातात 'विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतीविना गती गेली ! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' हे जगप्रसिद्ध वचन आढळते. यावरून शेतकऱ्यांच्या अधोगतीचे कारण कळते.

जोतीराव फुल्यांनी प्रथम स्वार्थी भटब्राह्मण हा अज्ञानी शेतकऱ्यांचा गैरफायदा कसा घेतो, याचे विवेचन आले आहे. त्यानंतर इंग्रज अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सरकारी खात्यातील ब्राह्मण कामगार हे शेतकऱ्यांना कसे लुटतात, यावर प्रकाश टाकला आहे. पुढे शेतकऱ्यांच्या डोक्यावर नित्य नवीन कर बसवल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी कसा झाला आहे, हे विशद केले आहे. शेतकऱ्यांची तत्कालीन स्थिती मांडून शेवटी शेतकऱ्यांसंबंधी भटब्राह्मणास सूचना दिल्या आहेत. शेवटी सरकारने शेती व शेतकऱ्यांविषयी कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयी विचार मांडला आहे. यावरून जोतीराव फुले हे शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी किती जागरूक होते हे समजून येते.

जगाच्या तुलनेत भारतीय शेतकरी हा अक्षरशून्य असल्यामुळे त्याची सतत फसवणूक होत आली आहे, असे निरीक्षण जोतीराव फुले यांनी मांडले आहे. जन्मपूर्व, जन्म, मृत्यू आणि मृत्यूपश्चातही विविध प्रसंगी भटब्राह्मण हा शेतकऱ्यांना लुटतो. पुराणग्रंथ आणि पंचांगातील कल्पित कथा सांगून विविध विधी करून घेतला जातो. चैत्रमास, आषाढ एकादशी, श्रावणमास, वद्यप्रतिपदा, भाद्रपदमास, गणेश चतुर्थी, अनंत चतुर्दशी, अमावस्या, विजयादशमी, कार्तिकमास बलिप्रतिपदा, वद्य द्वादशी, पौषमास, माघ-फाल्गुनीमास, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण अशा विविध प्रसंगी वर्षभर शेतकऱ्याकडे जाऊन दक्षिणा घेतली जाते, हे कथन करून जोतीराव फुले म्हणतात, "पिढीजात अज्ञानी शेतकऱ्यांचे द्रव्याची व वेळेची भटब्राह्मणांकडून इतकी हानि होते कीं, त्यांजला आपलीं लहान मुलेंसुध्दां शाळेंत पाठविण्याचे त्राण उरत नाही..." (तत्रैव,पृ.२७७) जोतीराव फुल्यांचे हे निरीक्षण आजच्या काळातही लागू पडते. यातून बाहेर पडण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे, असा विचार ते मांडत होते.

शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेला केवळ भटब्राह्मण हेच जबाबदार नव्हते तर इंग्रज अधिकारीही कारणीभूत होते, याकडे जोतीराव फुले लक्ष वेधतात. अल्प शेतीवर शेतकरी उदरनिर्वाह करू शकत नव्हता, त्यामुळे जंगलातील नैसर्गिक बाबींवर तो अवलंबून असे. इंग्रज सरकारने जंगलखाते निर्माण करून त्यावर बंदी आणली आणि शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले. अज्ञानामुळे शेतकरी भाऊबंदात भांडणे होतात, ते सोडवण्यासाठी पैसे

घेतले जातात. वेगवेगळे कर लादले जातात. खोटे गुन्हे दाखल करून शिक्षा केली जाते. यातून बाहेर पडण्यासाठी शेतकरी शहाणा झाला पाहिजे असे जोतीराव फुल्यांना वाटते.

अज्ञान, भटब्राह्मण आणि इंग्रज अधिकारी यांच्यामुळे शेतकरी हा कर्जबाजारी होत चालला आहे. त्यास पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळत नाही. शेतकऱ्याचे कुटुंब रात्रंदिवस कष्ट करते. हे दूर करण्यासाठी जोतीराव फुले म्हणतात, "आज्ञनानें गांजलेल्या दुबळ्या शूद्र शेतकऱ्यांस विद्यादान देऊन त्यांच्या बोडक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्या कमी न केल्यास, थोड्याच काळांत या जुलमाचा परिणाम फार भयंकर होणार आहे..." (तत्रैव, पृ.३०६) शिवाय जंगलखाते नष्ट केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्येवर शिक्षण हा नामी उपाय असल्याचे जोतीराव फुले सतत नोंदवतात.

शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी भटब्राह्मण आणि इंग्रज सरकारने कोणकोणत्या उपाययोजना राबवाव्यात याविषयी जोतीराव फुल्यांनी मांडलेले विचार आजही किती उपयुक्त आहेत, हे लक्षात येते. शेतकऱ्यांचे गैरवर्तन थांबले पाहिजे. शेतकऱ्यांतील बहुपत्नीत्व आणि बालविवाह प्रथा बंद झाली पाहिजे. जातिभेद संपला पाहिजे. शेतकऱ्याचे अज्ञान दूर कसे होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. शेतकऱ्यांनी आपली मुले शाळेत पाठवली पाहिजे. त्यांना शेतीकामाचे शिक्षण दिले पाहिजे. शेतीकामाचे शिक्षण घेतलेल्या तरुणास पाटिलकी मिळाली पाहिजे. त्याचबरोबर त्यांना सरकारी कचेरीत लहानमोठ्या जागेवर नेमले पाहिजे.

शूद्र शेतकऱ्यांच्या शेतीची सुधारणा होण्यासाठी कोणत्या बाबींची अंमलबजावणी करावी, याविषयी जोतीराव फुले आपले मत व्यक्त करतात. यंत्राच्या साह्याने शेतीची कामे करण्याचे शिक्षण मिळाले पाहिजे. शेतीसाठी बैलांची गरज असते, त्यामुळे गाय, बैल आणि वासरे कापून खाऊ नयेत. शेतीला पाणी मिळावे यासाठी सरकारने बंधारे आणि धरणे बांधून घेतली पाहिजेत. पाणाड्याकडून पाणी पाहून विहिरी खोदून घेतल्या पाहिजेत. शेती सुपीक व्हावी यासाठी नदी व नाल्यात साचलेली माती फुकट मिळाली पाहिजे. शेळ्यामेंढ्यांची पैदास वाढवली तर शेतीसाठी खत मिळेल. रानटी जनावरांपासून शेतीचे रक्षण व्हावे यासाठी शेतकऱ्यांना बंदुका दिल्या जाव्यात. शेतीचे नुकसान झाले तर सरकारने भरपाई दिली पाहिजे. शेतीसंबंधी प्रदर्शने भरवल्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळते. मुलांना शेतीसंबंधीची पुस्तके व वर्तमानपत्रे वाचण्यास दिली पाहिजे. असे झाले तर शेती आणि शेतकरी दोन्हींची सुधारणा होईल असे जोतीराव फुल्यांना वाटते. हे विचार आजच्या काळातही किती उपयुक्त आहेत याची प्रचीती येते.

एकंदरीत जोतीराव फुले यांनी कृषी आणि कृषक यांच्या संदर्भाने मांडलेले विचार भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी उपयुक्त आहेत. शेतकऱ्यांची अवनती होण्यामागे आज्ञान हे सर्वात मोठे कारण असल्याचे ते स्पष्ट करतात. शेतकरी शिक्षित असता तर मतलबी वर्गाकडून धर्माच्या नावाखाली होणारी त्याची फसवणूक थांबली असती. शिवाय राज्यसत्ता शेती आणि शेतकऱ्यांप्रती उदासीन असेल तर शेतीचा विकास होणार नाही, हे जोतीराव फुल्यांना समजून आले होते. त्यामुळे अज्ञानशाही, भटशाही आणि अंग्लशाही यांच्या कचाट्यातून शेतकरी मुक्त झाला तरच तो प्रगती करेल असा विश्वास ते व्यक्त करतात.

### १.४.५ जोतीराव फुल्यांचे विज्ञाननिष्ठ विचार:

जोतीराव फुले यांच्या विचारप्रतिपादनात विज्ञाननिष्ठा जाणवते. प्रखर बुद्धिप्रामाण्यवाद आणि विवेकवादाच्या आधारे ते विचार मांडतात. 'शेतकऱ्याचा असूड' मधील तिसऱ्या प्रकरणात त्यांनी पृथ्वी आणि मानवासंदर्भात मांडलेल्या उत्पत्तीत वैज्ञानिक दृष्टिकोन आढळतो. अलौकिक, अध्यात्मिक आणि पारलौकिक दृष्टीचा प्रभाव असलेल्या काळात वैज्ञानिक दृष्टीने सभोवताल मांडणे ही अवघड बाब होती. जोतीरावांनी अनेक धर्मग्रंथ आणि विचारवंत अभ्यासले होते. थॉमस पेन आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांचे शहाणपण त्यांना कळले होते. चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतवाद त्यांनी अभ्यासला होता. त्यामुळे पृथ्वी आणि मानव यांच्या उत्पत्तीबाबत झालेली मांडणी त्यांनी नाकारली. "अगम्य, अतर्क्य आकाशमय विस्तीर्ण पोकळींत नानाप्रकारचे तत्त्वांच्या संयोगवियोगानें अगणित सूर्यमंडलें त्यांच्या उपग्रहासह निर्माण होऊन लयास जात आहेत." (तत्रैव, पृ.२८८) असे मत ते मांडतात, याचा अर्थ त्यांना विज्ञान माहीत होते.

मानवाच्या उत्पत्तीबाबतीत जोतीराव फुल्यांनी मांडलेले मत लक्षात घेतले पाहिजे. बायबल, मनुस्मृती यांमध्ये मातीपासून, ब्राह्मणाच्या चार अवयवांपासून चार जातीचे पुरुष निर्माण झाले, ही कल्पना ते स्वीकारत नाहीत. त्यापेक्षा आरंभीचा मानव जंगलात कसा जगत होता, याविषयी ते विचार व्यक्त करतात. कालांतराने मतलबी ग्रंथ निर्माण करून विविध जाती बनविण्यात आल्याने मानव वेगवेगळा झाला. काहींना दास बनवले. काहींनी स्वतःला श्रेष्ठ म्हणवून घेतले.

'गुलामगिरी' या पुस्तकात जोतीराव फुल्यांनी आरंभीच्या पाच प्रकरणात पारंपरिक 'अवतार' ही संकल्पना आधुनिक पद्धतीने स्पष्ट केली आहे. 'मनुस्मृती' मध्ये लिहिलेली उत्पत्ती ही खोटी असून सर्व मनुष्यांसाठी लागू पडत नाही, असे त्यांनी साधार पटवून दिले आहे. ते म्हणतात, "मनूनें चार वर्णांची उत्पत्ति लिहिली आहे, ती एकंदर सर्व सृष्टिक्रमांशीं ताडून पाहिली म्हणजे सर्व खोटी आहे असें आपणास कळून येतें" (तत्रैव,पृ.१४८) हे सिद्ध करण्यासाठी ते एक प्रश्न उपस्थित करतात, की ब्राह्मणांची मूळ माता ब्राह्मणी ही ब्रह्म्याच्या कोणत्या अवयवापासून झाली याविषयी मनूने काहीच कसे लिहून ठेवले नाही ? म्हणजेच मनुसारख्या अधिकाऱ्यांनी कल्पित गोष्टी लिहून त्याला ईश्वरेच्छा असे मानून दासांच्या मनावर ठसवले. त्यातून विविध वर्ण निर्माण केल्याचे जोतीराव फुल्यांनी स्पष्ट केले आहे.

सर्वसामान्य माणसाच्या मनात अवतार ही संकल्पना रुजलेली आहे. पृथ्वीवर जेव्हा जेव्हा अधर्माची वाढ होते तेव्हा ईश्वर हा वेगवेगळ्या रूपात अवतार घेऊन ते नष्ट करतो, ह्या कल्पनेला जोतीराव फुले शह देतात. अवतार ही संकल्पना शास्त्रीय अंगाने मांडताना त्यांनी तार्किकतेचा उपयोग केला आहे. त्यात पूर्णतः विज्ञान नसले तरी तार्किकता आहे. आर्यांच्या अनेक टोळ्यांपैकी पहिली टोळी जलमार्गाने आली. लहान मचव्यातून माशासारखे आलेल्या टोळीच्या अधिकाऱ्यास ' मत्स्य ' हे नाव पडले. मत्स्याने शंकासूराचे राज्य ताब्यात घेतले. दुसरी टोळी कचव्यातून बंदरात आली. कासवाप्रमाणे सावकाश चालणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव कच्छ पडले. पुढे वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम आणि कृष्ण यांनी आपापल्या काळातील शूरविरांना पराभूत करून राज्य बळकावले. पुढे बळीराजा, जोतीबा, खंडोबा, भैरोबा अशा देवांना देव न मानता त्यांचा मनुष्यरूपातील खरा इतिहास त्यांनी लोकांपुढे

ठेवला. बळीराजाच्या ताब्यात असलेल्या अनेक क्षेत्रांचे क्षेत्रपाल म्हणजे जोतीबा-खंडोबासारखी शूर अधिकारी होते असे त्यांनी स्पष्ट केले आहे. यावरून असे लक्षात येते की जोतीराव फुल्यांनी अवतार ही कल्पना पूर्णतः मानवाच्या राज्यबदलाच्या इतिहासरूपात मांडली आहे. अशी मांडणी करणे हे वैज्ञानिक दृष्टीचे द्योतक आहे.

परशुराम हा कसा होता याविषयी जोतीराव फुल्यांनी केलेले लेखन विशेष स्लरूपाचे आहे. दंतकथा, पुराणकथा यांना ते लौकिक दृष्टीने मांडतात. 'गुलामगिरी' या पुस्तकातील आठव्या भागात धोंडीराम हे जोतीराव यांना प्रश्न विचारतात की परशुराम स्वभावाने कसा होता. जोतीराव म्हणतात, "परशुराम स्वभावाने पुंड, साहसी, नष्ट, निर्दय, मूर्ख आणि अधम होता. तो आपल्या जन्म देणाऱ्या रेणुकेचें शीर उडविण्यास काडीमात्र भ्याला नाही." (तत्रैव,पृ.१६८) परशुराम हा चिरंजीव आहे ही कल्पना जोतीराव फुले नाकारतात. त्यामुळे 'गुलामगिरी' हे संवादमय पुस्तक म्हणजे मानवाचा आरंभापासून ते इंग्रज काळापर्यंतचा इतिहास आहे. त्यातील जोतीराव फुल्यांची विज्ञाननिष्ठ दृष्टी विशेष लक्षात येते.

सत्ताधारी हा कटकारस्थान करून समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींना कशाप्रकारे संपवित जातो याविषयी जोतीराव फुले तार्किक विश्लेषण करतात. मत्स्य या अधिकाऱ्यापासून ते इंग्रज अधिकाऱ्यांपर्यंतचे सत्ताधारी सर्वसामान्य लोकांना लुटत आले आहेत, हे ते स्पष्ट करतात. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातही त्यांनी अनेक संकल्पना वैज्ञानिक दृष्टीने स्पष्ट केल्या आहेत. उदा. सत्य, जन्म, दैव, पाप, पुण्य, स्वर्ग, मृत्यू. ते स्वर्गाविषयी म्हणतात, "एकंदर सर्व धर्मपुस्तकांत स्वर्ग आहे म्हणून लिहितात; परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एका तरी गृहस्थास स्वतः हा स्वर्ग पाहिला म्हणून सांगतां येईल काय ?" (तत्रैव, पृ.४६५) यावरून स्वर्ग ही कल्पना किती खोटी आहे याकडे ते लक्ष वेधतात.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- महात्मा ज्योतिराव फुले यांचा विज्ञान विषयक विचार स्पष्ट करा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

## १.५ समारोप

एकूणच जोतीराव फुले हे विज्ञाननिष्ठ विचारसरणीचे होते. पुराणग्रंथावर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टीने ते सभोवतालकडे पाहात होते. समाजातल्या विविध रूढी ह्या मनुष्यनिर्मित आहेत हे त्यांना माहीत होते. त्यामुळे त्यावर टीका करून त्यांचे महत्त्व त्यांनी कमी केले. देव आणि धर्माचा आधार घेऊन समाजाची फसवणूक करणाऱ्या लोकांचा समाचार घेतला. त्यामुळे सत्यनिष्ठा हे तत्त्व त्यांच्या विचारात आढळते.

जोतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून, सत्यधर्माची मांडणी केली. खोटा इतिहास दाखवून खरा इतिहास मांडला. सत्यशोधन आणि सत्यवर्तन यास महत्त्व दिले. भेदाभेद मानणारा धर्म नाकारला. निर्मिक ही संकल्पना मांडली. नैवेद्य अर्पण करण्याची प्रथा नाकारली. पौराणिक कथांवर विश्वास ठेवू नये असा उपदेश केला. त्यामुळे जोतीराव फुले यांचे विचार आधुनिक भारताच्या निर्माणासाठी उपयुक्त ठरणारे आहेत.

जोतीराव फुल्यांनी शिक्षणाला महत्त्व दिले. विद्या नसेल तर गुलामगिरी येते आणि सर्वत्र अनर्थ ओढावतो याचा इशारा दिला. विद्या नसेल तर मती जाते, नीति जाते, गती खुंटते आणि दारिद्र्य ओढावते, याकडे लक्ष वेधले. शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे असावे, अशी भूमिका मांडली.

जोतीराव फुल्यांनी निर्मिक हा शब्द निर्माण करून तो निर्माणकर्त्यासाठी वापरला. त्यामुळे ईश्वरविषयक भक्ती, पूजा आणि श्रध्दा यातील ढोंग उघड केले. शेतकऱ्यांना फसवणाऱ्या आणि लुबाडणाऱ्या प्रवृत्ती उघड केल्या. मानवाच्या स्वातंत्र्याचा आग्रह धरला. त्यामुळे सामाजिक प्रबोधनासाठी अखंड कार्य करणारा आणि समाजपरिवर्तनासाठी विचार मांडणारा विचारवंत योद्धा म्हणून जोतीराव फुल्यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या विचार व कार्याची प्रेरणा घेऊन विविध साहित्य प्रवाह वाटचाल करीत आहेत.

# आ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : तत्त्व आणि विचार प्रेरणा

## १.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. वडिलांचे नाव रामजी मालोजी सकपाळ. त्यांनी एम.ए., पीएच.डी., एम.एस्सी., डी.एस्सी., बार-ॲट-लॉ., डी.लिट. अशा किती तरी पदव्या संपादन केल्या. न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्र, समाजशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी, लेखक, प्राध्यापक, पत्रकार आणि संपादक अशा किती तरी पदावरून त्यांनी कार्य केले आहे. त्यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' मधून लेखन केले. 'भारतातील जाती, त्यांची प्रणाली, उत्पत्ती आणि विकास', 'इव्हॉल्युशन ऑफ प्रोव्हिन्सियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया', 'जातीचे निर्मुलन', 'शूद्र पूर्वी कोण होते ?','दि अनटचेबल्स : व्हु वेअर दे अँड व्हाय दे बिकम अनटचेबल्स', 'थॉट्स ऑन पाकिस्तान', 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी', 'रानडे, गांधी आणि जिना', 'इस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती', 'बुध्द आणि त्यांचा धम्म' असे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यांनी 'भारतीय संविधान' निर्मितीसाठी दिलेले योगदान अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. त्यांनी विविध प्रसंगी दिलेली भाषणे संग्रहरूपात प्रकाशित झाले आहेत. या सर्वांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि तत्त्वे लक्षात घेता येतात.

### १.६.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार:

शिक्षण हा मानवासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणाशिवाय व्यक्ती आणि समाजाचा विकास होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या आधारे स्वतःची आणि एकूणच समाज आणि राष्ट्राची प्रगती साधता येते हे दाखवून दिले. स्वाभिमान वाढण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, असा शिक्षणाचा हेतू ते स्पष्ट करतात. त्यासाठी ते प्रतिष्ठा हा शब्द वापरतात. प्रत्येक व्यक्तीने आपल्या मुलांना योग्य शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. २९ सप्टेंबर १९३४ च्या भाषणात त्यांनी समाजात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे, हा विचार मांडला. शिक्षण हे योग्य असले पाहिजे, यावर ते भर देतात. ते म्हणतात, "शिक्षण घेतले पाहिजे व तेही उच्च दर्जाचे शिक्षण घेतले पाहिजे." (आंबेडकर:२००२,४२४) योग्य शिक्षण याचा अर्थ स्वतःसह समाजाचे हित जोपासण्यासाठी उपयोगी पडणारे. उच्च दर्जाचे शिक्षण याचा अर्थ सन्मान, प्रतिष्ठा आणि नोकरी मिळवून देणारे. शिक्षण हे योग्य आणि उच्च दर्जाचे असले पाहिजे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती.

शिक्षणाची गरज किती असते ? या प्रश्नाचा वेध डॉ. बाबासाहेब आंबेडकर घेतात. ६ मे १९२८ रोजीच्या भाषणात ते म्हणतात, "आधी दारूबंदी की आधी सार्वत्रिक शिक्षण ? असा आम्हाला कोणी विचारले तर 'आधी सार्वत्रिक शिक्षण' असाच आम्ही जबाब देऊ. शिक्षणप्रसार सार्वत्रिक झाल्यास दारूबंदीला आळा घालणे सोपे जाईल." (तत्रैव, पृ.१७१) अज्ञान आणि दारूचे व्यसन दोन्हीही समाजविघातक आहेत, तरीही ते शिक्षणाला प्राधान्य देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाबरोबर शीलाला महत्त्व देतात. शील म्हणजे नीतीपूर्ण विचार आणि वर्तन की ज्यात नैतिक चारित्र्य सामावलेले असते. विद्येबरोबर शील संपादन करणे आवश्यक आहे, असे त्यांना प्रकर्षाने वाटत होते. "शीलाशिवाय विद्या फुकाची आहे. कारण विद्या एक शस्त्र आहे. एखाद्याजवळ विद्येचे शस्त्र असेल व तो शीलवान असेल तर त्यायोगे तो एकाचे रक्षण करील तोच इसम शीलवान नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करील." (तत्रैव खंड १८, भाग २, पृ.१९३) शिक्षण पूर्ण झालेला मनुष्य स्वार्थी बनतो यावर ते ठाम होते, त्यासाठीच शिक्षणाचा आणि शीलाचा एकत्र विचार ते करतात.

शिक्षणाचा हेतू सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला आहे. १४ जानेवारी १९४८ रोजी मुंबई येथील भाषणात त्यांनी शिक्षणामुळे आपला उध्दार होतो असे मत मांडून राजकारणात प्रवेश करण्यासाठी शिक्षण कसे उपयोगी पडते हे स्पष्ट केले. ते म्हणतात, "राजकारणाच्या दोऱ्या विद्येशिवाय आपल्या हाती येणार नाहीत. "(खंड १८, भाग३, पृ.८७) अशिक्षित माणसाला राजकारण कळणार नाही त्यामुळे त्याला अनेक सुविधांपासून वंचित राहावे लागते, याचा ते विचार करीत होते. अज्ञानामुळे अस्पृश्य समाज हा राजकीय हक्कांपासून पारखा झाला आहे,असे त्यांचे निरीक्षण होते. त्यामुळे खऱ्या उन्नतीचे साधन म्हणून ते शिक्षणाकडे पाहात होते.

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असावे या मताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा सक्तीचा कायदा केला पाहिजे अशी भूमिका ते मांडत होते. १९२९ मध्ये महाबळेश्वर येथे प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भाने एक परिषद भरली होती. त्या परिषदेतील भाषणात ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे... सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा (तो) पाया आहे." (खंड १८, भाग १, पृ.१६६) त्यावेळी शिक्षण न घेतलेला फार मोठा मागास समाज होता. तो शिक्षण घेण्यासाठी उदासीन होता. अशा समाजाला शिक्षणाची सक्ती केली पाहिजे, त्यासाठी सरकारने कृतिशील पावले उचलली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे असावे तसे ते मोफतही असावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. ज्यांना फी भरता येईल अशांकडून ती भरून घ्यावी मात्र ज्यांच्याकडे फी भरण्याचे सामर्थ्य नाही त्यांना ती माफ केली पाहिजे, यासाठी दारूबंदीला दुय्यम स्थान दिले तरी चालेल असे मत ते मांडत होते. मुंबई म्युनिसिपालिटीतील लोकप्रतिनिधी गरिबांच्या शिक्षणाकडे लक्ष देत नसत असे त्यांचे निरीक्षण होते. त्यासाठी 'म्युनिसीपालिटीमध्ये बहूमत मध्यम व गरीब वर्गातील लोकांच्याच प्रतिनिधींचे असले पाहिजे.' (आंबेडकर : २००५, ४७) यावरून ते प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे आणि मागास समाजासाठी मोफत असावे या मताचा आग्रही पुरस्कार करीत होते हे लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उच्च शिक्षणाबाबतचे विचारही लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी बदलत्या काळात उच्च शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. ते म्हणतात, "एक काळ असा होता की चार पुस्तके शिकलेला स्पृश्य माणूस मामलेदार होत असे, पण आज तो काळ बदलला आहे. आज उच्च शिक्षण घेतल्याखेरीज कोणासही सरकारी नोकऱ्या मिळू शकत नाहीत." (खंड १८, भाग १, पृ.४६३) याचा अर्थ ते फक्त नोकरीसाठी शिक्षण घेतले पाहिजे, अशा संकुचित विचाराचे नव्हते. 'आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे ( उच्च

शिक्षण) हेच औषध आहे.' (खंड १८, भाग ३,पृ.२४५) अशी भूमिका त्यांनी १९५१ मध्ये घेतली होती. यावरून उच्च शिक्षणाकडे ते व्यापक दृष्टीने पाहात होते, हे लक्षात येते.

शिक्षण घेताना विद्यार्थ्यांनी आपल्या गरिबीचे भांडवल करू नये असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. परिस्थितीची तक्रार न करता अभ्यास केला पाहिजे आणि २४ पैकी २० तास अभ्यास करता आला पाहिजे तरच आपणास आपल्या बुद्धीचा प्रभाव वाढवता येतो, असे त्यांना वाटत होते. ते म्हणत, "मी विद्यार्थीदशेत इंग्लंडमध्ये असताना ज्या अभ्यासक्रमास ८ वर्षे लागतात तो अभ्यास मी २ वर्षे ३ महिन्यात यशस्वी तऱ्हेने पुरा केला. हे करण्यासाठी २४ तासांपैकी २१ तास अभ्यास करावा लागला आहे." (खंड१८, भाग २, पृ.१९१) शिक्षण घेण्यासाठी किती कष्ट घेतले पाहिजे, याचा वस्तुपाठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर दाखवून देतात.

राजकारण, चळवळ आणि शिक्षण, याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वेगळ्या दृष्टीने पाहात होते. शिक्षणापेक्षा राजकारणात दंग असलेले विद्यार्थी पाहून त्यांना हा शिक्षणाचा ऱ्हास वाटत होता. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांने चळवळ आणि राजकारणात सहभाग घेतला तर काहीही साध्य करता येणार नाही, असा विचार ते मांडतात." लायकी वाढविण्याचे मुख्य काम विद्यार्थीदशेत तुम्ही करीत असताना तुम्ही इतर कोणत्याही चळवळीत पडणे चुकीचे होईल." (खंड १८, भाग १, पृ.३९८) विद्यार्थी संघटना शिक्षणाच्या प्रश्नाऐवजी भलत्याच बाबींकडे विद्यार्थ्यांना घेऊन जात असतील तर राष्ट्रापुढची ती फार मोठी समस्या बनू शकते, हा इशाराही ते देतात.

बौद्धिक विकास करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, असे म्हणणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षक किंवा प्राध्यापकाची कर्तव्य सांगायला विसरत नाहीत. त्यांना वाटते शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने विद्यादान केले पाहिजे. विद्यार्थी हा विचारप्रवर्तक व्हावा यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजेत. नोकरी करण्यासाठी म्हणून न शिकविता शिक्षकांनी कर्तव्य म्हणून कार्य केले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. यावरून शिक्षणाकडे ते किती गांभीर्याने पाहात होते, हे लक्षात येते.

एकूणच शिक्षण हे सामाजिक दुखण्यावरचे औषध आहे. शिक्षणातून उत्तम नागरिक घडला पाहिजे. विद्यार्थ्यांची मने सुसंस्कारित झाली पाहिजेत. शिक्षणामुळे नैतिक चारित्र्य वृध्दिंगत झाले पाहिजे. त्यासाठी प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे आणि गरीब-मागास समाजासाठी मोफत असले पाहिजे, अशा भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाकडे पाहात होते. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाची आवश्यकता असते, हे ओळखून त्यांनी मुंबई आणि औरंगाबाद येथे उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये सुरू केली. त्यामधून विद्या, विनय आणि शील यांचे संस्कार दिले जावेत यासाठी प्रयत्न केले.

### १.६.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजशास्त्र होते. त्यांनी भारतीय समाजाचे जवळून निरीक्षण केले होते. चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि विविध जातींमध्ये विभागलेला भारतीय समाज त्यांनी अनुभवला होता. जातिभेदामुळे निर्माण झालेल्या विविध प्रश्नांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला होता. यातून बाहेर पडण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याचाही ते

विचार करीत होते. त्यांनी वेळोवेळी लिहिलेले अग्रलेख, विविध प्रसंगी दिलेली भाषणे आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांतून त्यांचे सामाजिक विचार समजून घेता येतात.

डॉ  बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम हिंदू समाजाचे स्वरूप कसे आहे यावर प्रकाश टाकला आहे. ३१ जानेवारी १९२० च्या 'मूकनायक' मधील अग्रलेखात ते म्हणतात, "हिंदुसमाज हा एक मनोरा आहे. व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, या मनोऱ्यास शिडी नाही. आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे; त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो; त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. व वरच्या मजल्यातला माणूस, मग तो कितीही नालायक असो; त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही." (आंबेडकर :१९९०,३४५) त्यातही काही जाती ह्या अस्पृश्य आहेत. त्यामुळे ते हिंदू समाजाचे ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे तीन वर्ग करतात. ब्राह्मण हा उच्चस्थानी असल्यामुळे स्वत:ला भूदेव समजतो. ब्राह्मणेतरांकडे सत्ता व ज्ञान नाही. शेती, व्यापार-उदीम-नोकरी करता येत असूनही ते मागासलेले आहेत. बहिष्कृत वर्ग मात्र दुर्बलता, दारिद्र्य, अज्ञान आणि अस्पृश्यता यात अडकला आहे. यावरून भारतीय समाज हा विषमता आणि उच्च-नीच भाव यावर आधारलेला आहे याकडे ते लक्ष वेधतात.

समाजव्यवस्थेत वरिष्ठ वर्गास अधिकाधिक अधिकार मिळतात आणि बहिष्कृत वर्गास कोणताही अधिकार मिळत नाही, यामुळे होणाऱ्या परिणामांचा विचारही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे. बहिष्कृत वर्गास व्यापार करता येत नाही, जमिनी कसता येत नाहीत, चांगले घर बांधता येत नाही, चांगले कपडे वापरण्याचा अधिकार नाही. बहिष्कृत वर्गास  मजूर करून, त्याच्या डोक्यावर एखादा माल देऊन विकावयास नेला असता लोक घेतील परंतु तोच माल एखादा बहिष्कृत व्यक्ती विकावयास बसली तर मोठा गुन्हा ठरून तो माल कोणीच विकत घेत नाही, हे वास्तव  डॉ. आंबेडकर उघड करतात. अशा विषम आणि स्पृश्य-अस्पृश्य समाजरचनेमुळे होणारा परिणाम स्पष्ट करताना ते म्हणतात, "जोपर्यंत ही कीड निघणार नाहीं तोपर्यंत राष्ट्राची सामाजिक व राजकीय प्रगती फोल ठरून तो जगांतील प्रमुख राष्ट्रापासून दूर एका कोपऱ्यांत भिजत पडणार!" (तत्रैव, पृ.४०९) यावरून अस्पृश्यता, उच्च-नीचता हा भारतीय समाजाला लागलेली कीड आहे, ती संपली नाही तर देशाची प्रगती होणार नाही, हा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात.

भारतीय समाज हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर आधारलेला आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था ही बहुजन समाजासाठी अवजड शृंखला आहे आणि ती वरिष्ठ वर्गाच्या फायद्याची आहे, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. या व्यवस्थेचे गोडवे गायले जातात. ती व्यवस्था टिकून राहावी यासाठी प्रयत्न केले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र ही व्यवस्था जमीनदोस्त केली पाहिजे, याविषयी विचार मांडले.

विषम समाजरचनेमुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामांपासून मुक्त होण्याचे तीन मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सूचवितात. देशांतर, धर्मांतर आणि नामांतर या मार्गांनी काही साध्या करता येईल का, याचा विचार ते करतात. परदेशात हिंदी म्हणून जितका त्रास होतो त्यापेक्षा स्वदेशात हिंदू म्हणून अधिक त्रास होतो. परदेशात द्रव्यार्जनाचे मार्ग खुले असतात.

बहिष्कृत वर्गापुढे देशांतर हा एक मार्ग आहे परंतु देशांतर हा सर्वांना शक्य होणारा मार्ग नाही असे त्यांना वाटते. त्यामुळे देशात राहूनच अस्पृश्यतानिर्मुलन केले पाहिजे, ही भूमिका ते घेतात. धर्मांतर हा दुसरा मार्ग असल्याचे ते सूचवितात. "अस्पृश्य हे हिंदू आहेत म्हणूनच त्यास या रस्त्यावरून जाण्याची मनाई आहे. असा जर हिंदुंचा नियम आहे तर, आपण आज धर्म त्याग व धर्मांतर करून आपली सुटका का करून घेऊ नये ? (खंड १८, भाग १, पृ.१६) शिवाय ज्या नावांमुळे वरिष्ठ लोक अस्पृश्यांचा तिरस्कार करतात, ती नाव सोडली पाहिजे. उदा. महार हे अस्पृश्यसूचक नाव आहे. त्याऐवजी आदि-हिंदू म्हणवून घ्यावे असे काही लोक सूचवितात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मात्र" 'बहिष्कृत' हे नाव काय वाईट आहे?" (तत्रैव, पृ.१८) असे म्हणतात. त्यापेक्षा सर्वसमावेशक असे आणखी एक नाव ते सूचवितात. ते म्हणतात," सर्व जातीनी आपली जातीवाचक नावे सोडून सर्वांनी सर्वसाधारण असे एक नाव धारण केले पाहिजे. माझ्या मते सर्वांनीच फक्त हिंदू असे म्हणावे व जातीवाचक पोटनावे काढून टाकावीत. कोणी स्वतःस ब्राह्मण, मराठा, महार, चांभार, मांग इत्यादी न म्हणता फक्त हिंदू असे म्हणावे तेणेकरून समाजात समता उत्पन्न होऊन एकी होईल." (तत्रैव, पृ.१८ व १९) त्यासाठी ब्रिटिश राजदंड लावला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हे विचार १९२४ मधील आहेत मात्र आजही ते लक्षात घ्यावेत असेच आहेत.

'महाड येथील धर्मसंगर व वरिष्ठ हिंदूंची जबाबदारी' या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. त्यांना वाटते, समाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी हिंदूधर्मीय लोकांकडूनच अडथळा होतो, तो थांबला पाहिजे. महाडच्या सत्याग्रहानंतर वरिष्ठ हिंदूंनी तळ्याचे शुध्दीकरण करून घेतले हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खटकले. ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मात समतेला वाव आहे. वरिष्ठ हिंदूंनी याकडे लक्ष देऊन तळ्याच्या शुध्दीपेक्षा संघटित होण्यावर भर दिला पाहिजे. "जातिभेदामुळे व अस्पृश्यतेमुळे हिंदुसमाजाची संघशक्ती क्षय पावली आहे, परस्परविषयक आपलेपणा नष्ट झाला आहे, एका जातीचे हितसंबंध दुसऱ्या जातींशी विरोधी झाले आहेत, तो जातिभेद व ती अस्पृश्यता नष्ट झाल्याखेरीज एकनिश्चयात्मक बलसंवर्धनाचे कार्य घडून येणार नाही." (आंबेडकर : १९९०, १५) यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदुच्या ऐक्याचा विचार जोरकसपणे मांडत होते, त्यातही वरिष्ठ हिंदूंनी याकामी पुढाकार घ्यावे हे सूचवित होते.

अस्पृश्यांना मंदिरप्रवेश नव्हता. तत्कालीन हिंदू महासभेने स्पृश्य व अस्पृश्यांसाठी स्वतंत्र संयुक्त मंदिर बांधण्याचे जाहीर केले. या कृतीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'अस्पृश्यता निवारणाचा पोरखेळ' असे म्हणतात. त्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न सुटणार नाही. त्याऐवजी सार्वजनिक व्यवस्था सर्वांना खुल्या केल्या पाहिजे असे ते सूचवितात. "अस्पृश्य लोक स्पृश्यांच्या देवळांत शिरण्याचा प्रयत्न करीत असतां जी संस्था निराळीं देवळें बांधण्याचा उपक्रम करते ती संस्था म्हणजे एक मुर्खांचा कंपू आहे..." (तत्रैव, पृ.४४) यावरून स्वतंत्र मंदिर हा अस्पृश्यतानिवारणाचा मार्ग असू शकत नाही, हा विचार बाबासाहेब मांडत होते, हे लक्षात घ्यावे लागते.

अस्पृश्यता निवारणाचा आणखी एक मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. वतनदारी पध्दत ही अन्यायकारक आहे. वतनामुळे महारांची कामे आणि कामाचे तासही निश्चित नसतात. त्यांना वाटते महार वतनामुळे बहिष्कृत समाज हा लाचार आणि स्वाभिमानशून्य

बनला आहे. महार समाजाची महत्वाकांक्षा मारली गेली आहे. त्यामुळेच ते म्हणतात, "आम्ही महार वतन खालसा करावे या मताचे आहोंत." (तत्रैव, पृ.९९) वतन नष्ट केल्याशिवाय महारांची सुधारणा होणे अश्यक आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते.

वरिष्ठ समाज हा लहानसहान कारणांवरून अस्पृश्यांवर बहिष्कार टाकतो. त्यावर उपाय काय असू शकेल हे स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डिसेंबर १९२७ च्या 'बहिष्कृत भारत' मध्ये 'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' हा अग्रलेख लिहिला. त्यानुसार काही अस्पृश्य जातींना स्वतःचे काही धंदे आहेत, उदा. मांग जात दोरखंड तयार करते. भंगी लोक मैला साफ करतात. यांनी काम करणे सोडले तर वरिष्ठ जातींवर संकट येते. महार जातीचे असे ठराविक काम नसल्यामुळे अवघड होते. त्यासाठी त्यांनी इनाम जमिनी कसल्या पाहिजेत. जिथला गाव बहिष्कार टाकतो, त्यासाठी दुसरा उपाय करावा. "दरेक गांवांत पांच पांच दहा दहा घरांची तुरळक वस्ती ठेवून कोंडमारा करून घेण्याऐवजी निरनिराळ्या गांवांतील लहान लहान वस्ती उठवून त्यांची एक निराळी वसाहत केली तर ही व्यवस्था त्यांच्या सर्वस्वी हिताची होणार आहे." (तत्रैव, पृ.१५०) त्यामुळे स्वतंत्र वस्ती करणे, विविध उद्योग करणे, शेतीसारख्या साधनाचा उपयोग करणे, शेतीला जोडून दुसरा धंदा करणे, स्वत:ची खादी स्वत:च विणणे, अशा उपाययोजना अंमलात आणल्या तर अस्पृश्यता नष्ट होईल असे त्यांना वाटते. यावरून स्वावलंबन हा अस्पृश्यतानिवारणाचा मोठा मार्ग असल्याचे ते सूचवितात हे लक्षात घेतले पाहिजे.

अस्पृश्यतेचा उगम हा जातिभेदातूनच झाला आहे, याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठाम होते. जातिभेद संपवायचा असेल तर समाजात रोटी-बेटी व्यवहार सुरू झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. गलिच्छ चालीरिती बंद झाल्या पाहिजे. स्वावलंबन आणि स्वाभिमान बाळगला पाहिजे. त्यासाठी एकजूट होऊन संघटना स्थापन केल्या पाहिजे. सर्व अस्पृश्य समाज एकत्र आला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारात नव्या समाजरचनेचा हेतू दडलेला आढळतो. समाजातील सर्वच घटकांची प्रगती होण्यासाठी समाजरचना बदलणे आवश्यक आहे. हक्कांपासून वंचित ठेवलेल्या वर्गाला वरिष्ठ वर्गाने समानतेने वागवले पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर समाज उभा राहिला पाहिजे. अस्पृश्य, बहिष्कृत लोक हेही माणसेच आहेत, या मानसिकतेने सर्वांनी वर्तन केले पाहिजे. जातिभेद पूर्णतः नष्ट केला पाहिजे, अशी भूमिका घेऊन ते विचार मांडत होते.

### १.६.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतर कोणत्याही विचारांपेक्षा धार्मिक विचारास अधिक महत्त्व दिले होते. १९५६ मध्ये नागपूर येथे दलित फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात, "कोणत्याही गोष्टीपेक्षा राजकारणाची तुम्हाला अधिक आवड दिसते. माझे तसे नाही. मला धर्म जास्त प्यारा आहे आणि त्यासाठीच मी माझी शक्ती वेचणार आहे." (खंड१८, भाग ३, पृ.५२७) यावरून ते धर्माबाबत किती सजग होते हे लक्षात येते.

धर्म हा व्यक्ती आणि समाजाच्या जीवनासाठी धर्म हा आवश्यक असतो असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते. 'धर्म कशासाठी पाहिजे?' असा प्रश्न काही लोक त्यांना विचारत. त्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, "धर्म हा दुराचारावर नियंत्रण ठेवतो... गाडीला वंगण असते, चाकाला खीळ असेल तर बैल गाडी ओढतील. त्याचप्रमाणे मनुष्याच्या पापी, दुराचारी वर्तनाला बंधन म्हणजेच धर्म!" (तत्रैव, पृ.४२२) यावरून धर्माचे मानवी समाजातील स्थान अधोरेखित करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर करताना आढळतात.

डॉ. आंबेडकरांचे धार्मिक विचार हे प्रामुख्याने हिंदू धर्म आणि बौद्ध धम्म यांच्या संदर्भाने आलेले आहेत. मानवी जीवनात धर्माचे स्थान हे अत्यंत आवश्यक असते. धर्माशिवाय माणसाचे जगणे सैरभैर स्वरूपाचे होते, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे कार्ल मार्क्सचे, 'धर्म म्हणजे अफू आहे!' हे मत त्यांना पटत नाही. त्याऐवजी बुध्द, कबीर आणि जोतीराव फुले यांच्या चिंतनातील धार्मिक विचार त्यांना जवळचे वाटतात. त्यामुळे सत्य, अहिंसा आणि मानवता या तत्त्वांच्या आधारे धर्मविचार मांडण्याचा प्रयत्न ते करतात.

आपल्या वैयक्तिक जीवनात धर्माला महत्त्व देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जीवनात मात्र धर्म बाजूला ठेवत असत. ज्या देशात धार्मिक कायदा हा सर्वश्रेष्ठ ठरतो त्या देशाचा ऱ्हास हा कधी ना कधी होत असतो, याविषयी त्यांनी अभ्यास केला होता. ते म्हणतात, "हिंदुस्थानात धार्मिक कायदा श्रेष्ठ ठरला, माझ्या मते देशावर ती एक फार मोठी आपत्ती ओढावली. कायद्यात बदल करता येत नाही असा समज हिंदू समाजातील प्रतिगामी लोकांमध्ये त्याकाळी रूढ होता हेच ही आपत्ती ओढावण्याचे कारण आहे असे माझे मत आहे." (तत्रैव, पृ.८९) धर्माचा आणि धार्मिक कायद्याचा उपयोग हा सार्वजनिक जीवनासाठी न करता वैयक्तिक जीवनासाठी केला पाहिजे, याचा ते गांभीर्याने विचार करीत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा सखोल अभ्यास केला होता. हिंदू आचारधर्म हा विषमतेवर आधारलेला आहे हे त्यांनी अनुभवले होते. हिंदू धर्मातील कायदे हे अन्यायकारक आहेत त्यामुळे त्याचे सुसूत्रीकरण करणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते. 'हिंदू कोड बिल' तयार करून त्यांनी तसा प्रयत्नही केला मात्र अनेकांनी त्यास विरोध केला. कालांतराने त्यांचा हिंदू आचारधर्म सुधारणेचा प्रयत्न अंगिकारला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरंभी हिंदू धर्माच्या अनुषंगाने तर आयुष्याच्या उत्तरार्धात बौध्द धम्माच्या संदर्भाने विचार मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू धर्माचा एक घटक म्हणून हिंदू धर्माची चिकित्सा करतात. मार्च १९२० मध्ये माणगाव येथे पार पडलेल्या परिषदेत त्यांनी 'हिंदू धर्माचे आपण घटक आहोत.' (खंड १८, भाग १, पृ.२) असा उल्लेख करून हिंदू धर्माची चिकित्सा केली आहे. हिंदू धर्मात जन्मसिद्ध योग्य-अयोग्य, पवित्र-अपवित्र यानुसार लोकांची विभागणी केली जाते. त्यात ब्राह्मण वर्ग हा जन्माने श्रेष्ठ आणि पवित्र मानला जातो. ब्राह्मणेतर हा वर्ग ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठतेत आणि पवित्रतेत कमी दर्जाचा मानला जातो तर बहिष्कृत वर्ग हा जन्मतः कनिष्ठ आणि अपवित्र मानला जातो. हिंदू धर्मातील या विषमतेमुळे ब्राह्मणेतर आणि बहिष्कृत वर्ग हा विद्या आणि अर्थार्जनापासून वंचित राहिले. बहिष्कृत वर्ग व्यापार, नोकरी आणि शेती करू शकला नाही. विटाळ वा अस्पृश्यतेमुळे खालच्या जातींतील लोकांचे आत्मबल आणि

स्वाभिमान नष्ट झाला आहे. यापूर्वी त्यांनी हिंदू समाजाला शिडी नसलेल्या मनोऱ्याची उपमा दिली होती. अशाप्रकारे हिंदू धर्मातील विषमतामूलक समाजरचनेचे विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे.

हिंदू धर्म हा अनेक जातींनी बनलेला आहे. त्यातील काही जातींना अस्पृश्य म्हणून लेखले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते अस्पृश्यता व जातिभेद हा नावात साठवलेला आहे. उदा. ब्राह्मण, मराठा, महार, चांभार, मांग. ते म्हणतात, "माझ्या मते सर्वांनीच फक्त हिंदू असे म्हणावे व जातीवाचक पोटनावे काढून टाकावीत." ( तत्रैव, पृ.१८) १९२४ मध्ये मांडलेला हा मुद्दा कोणीही लक्षात घेतला नाही. तो लक्षात घेतला असता तर १९३५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मी मरणार नाही' असे म्हणण्याची वेळ आली नसती.

हिंदू धर्म हा प्रत्येकाला माणुसकीने वागण्याची मुभा देत नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा केली. त्यामुळे हिंदू धर्मासाठी त्यांनी वापरलेली विशेषणे आजही पचनार नाहीत. ते म्हणतात, "हिंदू धर्म हा धर्म नाही. हा रोग आहे, महारोग आहे !... हिंदू धर्म हा मुळी धर्मच राहिलेला नाही. तो धर्म आहे असे कोणीही मला सिध्द करून द्यावे. हिंदू धर्म हे एक विष आहे. विषाचे अमृत होणे शक्य नाही. ज्या धर्मातील लोक अस्पृश्य समाजातील माणसांना माणुसकीने वागवीत नाहीत त्याला धर्म कसे म्हणावे ?" (तत्रैव, पृ.४३८) यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्माकडून कोणती अपेक्षा करीत होते हे लक्षात येते. त्यांना धर्मात समता, प्रेम आणि आपुलकीची भावना हवी होती. ही भावना हिंदू धर्मात आढळत नाही, असे त्यांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ मे १९३६ रोजी मुंबई इलाखा महार परिषदेत भाषण केले. या भाषणात त्यांनी धर्मांतरामागची ऐहिक कारणे विशद केली, आध्यात्मिक कारणे विशद करताना पुन्हा ते हिंदू धर्माची चिकित्सा करतात. 'ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म' ही धर्माची व्याख्या डॉ. आंबेडकरांना मान्य होती. ही व्याख्या ते हिंदू धर्माला लावून पाहतात. ते म्हणतात, "हिंदू धर्मात व्यक्तीला काही स्थान नाही. हिंदू धर्माची रचना वर्गाच्या कल्पनेवर केलेली आहे. एकाने दुसऱ्याशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहेत." (तत्रैव, पृ.५००) कोणत्याही धर्मात व्यक्तीला प्राधान्य असले पाहिजे, व्यक्तीचा विकास हे धर्माचे ध्येय असले पाहिजे. हिंदू धर्मात देव, आत्मा यास जागा आहे मात्र मानवी जीवनाला जागा नाही, अशा भूमिकेतून ते हिंदू धर्माची चिकित्सा करीत होते.

धर्माने प्रत्येक व्यक्तीला सज्ञान होण्याची संधी दिली पाहिजे. धर्माने लोकांना बौद्धिक गुलामगिरीत ठेवू नये. त्याने सर्वांना सारखे स्वातंत्र्य दिले पाहिजे. एकाची हाती शस्त्र तर दुसरा निःशस्त्र असा भेद धर्माने करू नये. काहींना धनसंपादनाचा अधिकार तर काहीजन परावलंबी अशी व्यवस्था धर्मात नसावी. धर्मातील प्रत्येक व्यक्तीकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे. हिंदू धर्म हा चातुर्वर्ण्य व्यवस्था मानणारा असल्यामुळे वरील अपेक्षा पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे हिंदू धर्मातील प्रत्येक वर्ग आणि जाती हे "छावणी दिलेले हे दोन परस्परविरोधी सैन्याचे तळ आहेत, असेच म्हणावे लागेल." (तत्रैव, पृ.५०१) असे बाबासाहेब म्हणतात. त्यांची ही धर्मचिकित्सा आजच्या काळातही लागू पडते.

धर्माकडे पाहण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र दृष्टिकोन होता. त्यांनी कुराण, बायबल, गीता अशी धर्मग्रंथे वाचली होती. यांत जे सांगितले आहे ते सर्व खरे मानावे असे बंधन घालून माणसाच्या बुध्दीला कायमचा खो दिला आहे, असे बाबासाहेबांना वाटते. त्यामुळे स्वतःचा धर्म कसा असेल याविषयी ते म्हणतात, "माझा धर्म कायद्यावर किंवा काही विशिष्ट तत्त्वांवर आधारलेला नसेल पण त्यात 'वास्तवता' मात्र तुम्हाला नक्कीच आढळेल." (खंड १८, भाग २, पृ.५३८) धर्म हा वास्तवावर आधारलेला असला पाहिजे, असे त्यांचे मत होते. या पाश्र्वभूमीवर ते बौध्द विचारसरणीकडे वळलेले आढळतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये बौद्ध विचार अंगिकारला असला तरी १९०७ मध्येच त्यांना बुध्दविचाराची ओळख झाली होती. ते मॅट्रिक पास झाले तेव्हा कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांनी त्यांना बुध्दाचे चरित्र भेट दिले होते. १९३५ मध्ये त्यांनी हिंदू म्हणून मरणार नाही असे जाहीर केले असले तरी कोणता धर्म स्वीकारणार हे जाहीर केले नव्हते. १९५०-५१ पासून त्यांनी गौतम बुद्धाच्या विचाराचा गंभीरपणे अभ्यास केला. त्याविषयी विचार मांडले आणि लेख लिहिले. १९५६ मध्ये त्यांनी 'बुध्द आणि त्यांचा धम्म' हे पुस्तक लिहिले. त्या आधारे त्यांचे बौद्ध धर्मासंदर्भातील विचार लक्षात घेता येतात.

भारतात धर्माकडे पाहण्याचा उदार दृष्टिकोन आढळतो. सर्वधर्मसमभाव किंवा कोणताच धर्म वाईट नसतो, माणूस वाईट असतो, अशी भूमिका घेऊन वावरणारे अनेकजण आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मात्र हे पटत नाही. ते म्हणतात, "सर्व धर्म खरे आहेत किंवा सारखे आहेत असे म्हणण्याइतका मिथ्यावाद दुसरा कोणताच नसेल." (खंड २०, पृ.३८०) यावरून ते भाबडेपणाने धर्माकडे पाहात नाहीत. विविध धर्माचा अभ्यास करून बौध्द धर्माचे वेगळेपण ते मांडतात. ते म्हणतात, "बौद्ध धर्म व हिंदू धर्म यात केवढा तरी फरक आहे. बौद्ध धर्म जातीविरहित एकजिनशी समाजरचनेचा पुरस्कार करतो तर हिंदू धर्म जातीवरच मुख्य अधिष्ठान ठेवतो." (खंड १८, भाग ३, पृ.२०३) बौद्ध धर्म हा जातीचा आधार घेणारा नाही म्हणून ते त्याविषयी अधिक सखोल विचार मांडतात.

बुध्द हा अहिंसा मार्गाचा अवलंब करतो हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय महत्त्वाचे वाटते. अहिंसा हे महान तत्त्व आहे. त्यामुळे जगाचे विध्वंसन थांबते. शिवाय बुध्दाने सामाजिक, वैयक्तिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार केला, हे बाबासाहेबांना महत्त्वाचे वाटते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'बुध्द हा मानव होता.' हे सांगून ते म्हणतात, "बुध्दाने सामान्य जनतेत वास्तव्य केले आणि मानवी दृष्टिकोनातून जनतेची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न केला." (तत्रैव, पृ.२०३) त्यामुळेच बाबासाहेबांनी बौद्ध विचार अंगिकारून त्याविषयी अधिकाधिक चिंतन मांडले.

बौद्ध धर्मामुळे भारत देश हा महान आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते कारण बौद्ध धर्म हा समाजाचे विविध वर्णांमध्ये विभाजन करीत नाही. त्यामुळेच ते म्हणतात, "धर्म शुद्ध तत्त्वावर आधारित असला पाहिजे. बुध्दाचा वर्णाश्रम पद्धतीवर कधीच विश्वास नव्हता." (तत्रैव, पृ.२३५) शिवाय बुध्दाला वेद मान्य नव्हते आणि वर्णव्यवस्थाही मान्य नव्हती. त्यामुळेच त्यांनी आपले पहिले आणि श्रेष्ठ गुरू म्हणून बुध्दाला मानले आणि आयुष्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ते बौध्द धम्माच्या प्रचारात गुंतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची तुलना हिंदू धर्माबरोबर केली तशी ख्रिस्ती धर्म आणि कार्ल मार्क्सच्या विचाराबरोबरही केली. १५ फेब्रुवारी १९५३ रोजी दिल्ली येथील एका भाषणात ते म्हणाले, "जगापुढे विशेषतः आशिया खंडापुढे आज दोनच मार्ग उपलब्ध आहेत. एक बुध्दाचा मार्ग व दुसरा मार्क्सचा मार्ग. बुध्दाच्या तत्त्वज्ञानाचा वेळीच जगाने स्वीकार केला नाही तर, कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा विजय होणे अपरिहार्य आहे. बुध्दाचे तत्त्वज्ञान हाच जगाला एकमेव आधार आहे व त्याचा जेवढा प्रचार होईल तेवढे जग युध्दापासून दूर व शांततेच्या नजिक जाईल." (तत्रैव, पृ.३४९) त्यांच्या मते कम्युनिझमचा प्रतिकार करण्यासाठी केवळ बौध्द धर्मच उपयुक्त ठरणार आहे. 'बुध्द की कार्ल मार्क्स' या विषयावर काठमांडू येथे त्यांनी २० नोव्हेंबर १९५६ रोजी भाषण केले. या भाषणात त्यांनी मार्क्सबरोबर बुध्दाची केलेली तुलना अधिक स्पष्टतेने आली आहे.

बौद्ध धर्म आणि ख्रिश्चन धर्म यांची तुलना करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात की बुध्द धर्मात मोक्ष मिळवून देण्यासाठी ख्रिश्चन लोकांसारखे पाद्री नाहीत. ते म्हणतात, "ख्रिस्ती धर्मात व बुध्द धर्मात अंतर आहे. ख्रिस्ती धर्मात येशुने सांगितले आहे की, गरीब लोकहो, तुम्ही दारिद्र्याला भिऊ नका. मेल्यावर सारे जग तुमचेच आहे. अशी बुध्द धर्मात आर्थिक बाब डावललेली नाही." (तत्रैव,पृ.४३१) त्यामुळे बौद्ध धर्म हाच जगापुढे एकमेव मार्ग असल्याचा उच्चार डॉ. आंबेडकर पुन्हा पुन्हा करताना आढळतात.

बौद्ध आणि जैन यांची तुलना करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अहिंसा हा मुद्दा चर्चेला घेतात. बुध्द हा अहिंसेला महत्त्व देतो त्याप्रमाणे वर्धमान महावीर हेही अहिंसेला महत्त्व देतात. डॉ. आंबेडकर मात्र या दोघांच्या अहिंसेमध्ये फरक करतात. ते म्हणतात, "बुध्द धर्माने उपदेशिलेली अहिंसा आणि जैन धर्माने उपदेशिलेली अहिंसा यात महदंतर आहे. जैन धर्माने अहिंसेला अतिरेकास नेऊन पोहोचविले." (तत्रैव, पृ.४६३) बुध्दाने हत्येची इच्छा आणि हत्येची आवश्यकता यात फरक केला होता. या संदर्भात बाबासाहेब म्हणतात, "ज्याठिकाणी जीवहत्या करण्याची आवश्यकता असते त्या ठिकाणी त्याने (बुध्दाने) जीवहत्येला प्रतिबंध केला नाही." (आंबेडकर : २००६, २६७) यावरून विविध धर्म आणि तत्त्ववेत्त्यांबरोबर बौद्ध धर्माची तुलना करून बाबासाहेबांनी आपले धार्मिक विचार स्पष्ट केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्म आणि धम्म यातील फरक स्पष्ट केला आहे. "देवावर श्रद्धा, आत्म्याच्या अस्तित्वासंबंधी विश्वास, ईश्वरपूजा, चुकणाऱ्या आत्म्याची सुधारणा, प्रार्थनाविधी व यज्ञ-याग इत्यादींनी देवाला प्रसन्न करणे म्हणजे धर्म... धम्म म्हणजे सदाचरण. म्हणजेच जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माणसा-माणसांतील व्यवहार उचित असणे." (तत्रैव, पृ.२४४) धर्मात स्वातंत्र्य नसते मात्र धम्मात ते असते. धर्म हा अमानवी शक्तीचे अस्तित्व मानते तर धम्म हा मानवाचे अस्तित्व मानतो. अशा अनेक अंगांनी डॉ. आंबेडकरांनी धर्म आणि धम्म यातील फरक स्पष्ट केला आहे.

एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार हे हिंदू धर्माची चिकित्सा करीत करीत बौद्ध धर्माचे स्वरूप स्पष्ट करीत जातात. अत्यंत विज्ञाननिष्ठ भूमिकेतून ते धर्माकडे पाहतात. मानवी समाज आणि व्यक्तीसाठी धर्माची किती आवश्यकता आहे यावर ते भर देतात. माणुसकीची वागणूक देणारा, सत्याचा शोध घेणारा, वास्तववावर आधारलेला आणि

सर्वार्थाने स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा धर्म हाच खरा धर्म असतो, या निष्कर्षाप्रत ते घेऊन जातात. इतर धर्मांच्या तुलनेत बौद्ध धर्म हा जगाला शांती देणारा आणि युध्दापासून दूर नेणारा आहे, अशी भूमिका ते घेतात. धर्म आणि धम्म यातील फरक स्पष्ट करून सर्वसामान्य मानवी पातळीवरील धम्माचा प्रसार करण्याचा मानस ते व्यक्त करतात.

### १.६.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राजकीय विचारवंत होते. स्वराज्य चळवळ आणि राजकारण याविषयी त्यांनी वेळोवेळी आपली मते मांडली आहेत. भारतातील स्वराज्याचा प्रश्न मांडताना ते स्पष्ट विचार व्यक्त करतात. त्यांना वाटते संपूर्ण भारत हा एकसंघ झाला पाहिजे. ते म्हणतात, "भारत हे एकराष्ट्र व्हावे असे जर ध्येय असेल तर या ध्येयाच्या पूर्ततेसाठी स्वराज्य  सर्वात महत्त्वाचे साधन ठरेल, असे मी म्हणेन." (खंड १८, भाग १, पृ.१९६) स्वराज्याचा विचार करताना आधुनिक लोकशाहीचा विचार केला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. आधुनिक लोकशाही राज्यातील मूलभूत तत्त्व सांगताना ते प्रत्येक व्यक्तीचे मूल्य मान्य करण्याचा सल्ला देतात.

एकसंघ भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्ताधारी वर्गास जाणीव करून देतात. अल्पसंख्याक वर्गाचे हित जोपासण्यासाठी सत्ताधारी वर्गाने नेहमीच प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक जातीला पुरेसे प्रतिनिधित्व दिले पाहिजे. विविध जातीजमातीच्या संरक्षणाची तरतूद घटनेत करून ठेवली पाहिजे, अशी भूमिका ते घेतात. अनेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वराज्य चळवळीच्या विरोधी होते असे वाटते. गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी आयोजित एका मानपत्र सोहळ्यात त्यांनी दिलेले उत्तर हे स्वराज्याच्या बाजूने होते. स्वराज्य हवेच पण त्यामुळे मिळणारी सत्ता ही सर्व समाजात योग्यरीतीने विभागली पाहिजे असा आग्रह ते धरतात. ते म्हणतात, "या देशास स्वराज्य द्यावे असा ठराव आल्यास त्याला मी पाठिंबा देणार आहे." (तत्रैव, पृ.२३२) यावरून ते स्वराज्याच्या बाजूने भूमिका घेत होते हे लक्षात येते.

भारताला शक्य तितक्या लवकर स्वत:चे सरकार स्थापन करता आले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. प्रचलित नोकरशाही संपुष्टात येऊन लोकांचे, लोकांनी आणि लोकांकरिता चालवलेले सरकार स्थापन व्हावे अशी इच्छा ते व्यक्त करीत होते. आपल्या देशातील प्रश्न हाताळण्यासाठी इंग्रज हे अकार्यक्षम आहेत,  आपणच आपले प्रश्न सोडवले पाहिजे, अशी भूमिका ते घेत होते. त्यामुळे ते म्हणतात, "ब्रिटिश सरकार जोपर्यंत या देशात आहे तोपर्यंत राजकीय अधिकारांचा अंशही आमच्या हाती येण्याची शक्यता नाही." (तत्रैव, पृ.२३८) यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वराज्याच्या बाजूने किती रीतसर होते, हे लक्षात येते.

भारतात लोकशाही शासन येणे गरजेचे आहे, या मताचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार करीत होते. हे करताना कोणत्या बाबी आवश्यक आहेत याकडेही ते लक्ष वेधत होते. भारतीय समाजपध्दती ही समता आणि बंधुभाव विकसित होण्यासाठी पूरक नाही आणि लोकशाही शासनासाठी समता आणि बंधुभाव फार आवश्यक आहे, याचा खोलवर विचार ते करीत होते. त्यामुळे इंग्रज गेल्यानंतर त्यांच्या जागी कोण असणार याचा विचार प्रथम केला पाहिजे अशी भूमिका ते घेतात. ते म्हणतात, "आम्हाला उत्तरदायी सरकार हवे असले तरी

ज्यात केवळ आमचे मालक बदलल्या जातील असे सरकार आम्हास नको. शासक वर्ग जबाबदार असावा असे तुम्हास वाटत असेल तर कायदे मंडळ खऱ्या अर्थाने आणि पूर्णतः प्रातिनिधिक असले पाहिजे." (तत्रैव, पृ.२४०) त्या त्या समाजघटकाचा न्यायपूर्ण विचार करणारे प्रतिनिधी असतील तर राज्यकारभार हा हा समन्यायी होईल यावर त्यांचा विश्वास होता.

लोकशाहीचे दोन शत्रू आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. याविषयी ३ एप्रिल १९५५ रोजीच्या भाषणात ते म्हणतात, "लोकशाहीचे प्रामुख्याने दोन शत्रू आहेत. एक म्हणजे हुकूमशाही आणि दुसरी म्हणजे माणसा-माणसात भेद मानणारी नीती किंवा संस्कृती." (खंड १८, भाग ३, पृ.४३५) हुकूमशाहीमुळे समाजात एकी वाढू शकत नाही आणि संघटना मोडीत निघतात. अशीच अवस्था माणसांमध्ये भेद मानणाऱ्या संस्कृतीमुळे होते. याचा परिणाम हा लोकशाहीवर होते, याचे स्पष्ट संकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात.

लोकशाही यशस्वी करण्यासाठी काय केले पाहिजे, याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार लक्षात घेतले पाहिजे. आरंभी ते लोकशाहीची व्याख्या सांगतात. "रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पध्दतीस लोकशाही म्हणतात." (तत्रैव, पृ.३२८) ही व्याख्या इतरांच्या व्याख्यांपेक्षा वेगळी आहे. या विचारात अहिंसेचा, शांतीचा आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार आहे.

लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाची शर्त सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विषमता संपवून टाकण्यास प्राधान्य देतात. विरोधी पक्ष अस्तित्वात असला पाहिजे. कायदा आणि प्रशासन या संदर्भात सर्वांना सारखी समानता असली पाहिजे. सर्वांमध्ये सांविधानिक नैतिकता असली पाहिजे, म्हणजे नियमांचे पालन केले पाहिजे. बहुमतवाल्यांनी अल्पमतवाल्यांवर जुलूम करू नये. समातात नैतिकता असली पाहिजे. शेवटची शर्त सांगताना ते म्हणतात, "लोकशाहीला 'लोकनिष्ठेची' फार आवश्यकता असते...लोकनिष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहाणारी कर्तव्यनिष्ठा होय!" (तत्रैव, पृ.३३७) लोकशाही टिकणे आणि ती यशस्वीपणे राबविणे आवश्यक असल्याचे मत ते शेवटपर्यंत मांडत होते.

स्वतंत्र मतदारसंघाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अगदी स्पष्ट होती. बहिष्कृत वर्ग आणि अस्पृश्य यांचा उध्दार झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यासाठी अस्पृश्यांचा प्रतिनिधी निवडण्याचा हक्क हा फक्त अस्पृश्य जातीतील मतदारानांच असला पाहिजे, हा विचार त्यांनी जोरकसपणे मांडला. त्यामुळे अस्पृश्य वर्गाची काळजी घेणारे उमेदवार निवडून येतील असे त्यांना वाटत होते.

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्था लक्षात घेऊन राजकीय विचार मांडत होते. विविध जाती आणि धर्म असलेल्या देशात लोकशाही शासन पध्दती अंमलात आणण्यासाठी सर्वसमावेशक धोरण राबवणे आवश्यक असते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना स्थान दिले पाहिजे. संसदीय शासन पध्दती यशस्वी करण्यासाठी सामाजिक समतेबरोबर आर्थिक समतेलाही प्राधान्य दिले पाहिजे.

लोकशाहीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विरोधी पक्षाला महत्त्व दिले पाहिजे. एक व्यक्ती एक मूल्य हे तत्त्व जोपासले पाहिजे. अल्पसंख्याकांचे हित जोपासले पाहिजे. राजकारण म्हणजे व्यक्तिमात्रांच्या स्वातंत्र्याचे मापन करण्याचे मूलभूत माप असते. अशा व्यापक भूमिकेतून ते राजकीय विचार मांडत होते.

### १.६.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांसाठी मांडलेले विचार बहूमोल स्वरूपाचे आहेत. भारतातील संबंध हिंदू स्त्रियांच्या उत्थानासाठी ते विचार मांडत होते. 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' या पुस्तकात त्यांनी मनुस्मृतीपूर्व काळात स्त्रियांना विद्यार्जनाचा अधिकार होता, हे दाखवून दिले. पूर्वी राज्यकारभारात अधिकारपदावर स्त्रिया होत्या. गुरुकुलात वेदातही त्या निष्णात होत्या. हे स्पष्ट करण्यासाठी ते जनक-सुलभा, याज्ञवल्क-गार्गी, याज्ञवल्क-मैत्रेयी, शंकराचार्य-विद्याधरी यांनी सार्वजनिक ठिकाणी वादविवाद केल्याचे उदाहरण देतात. 'मनुस्मृती' चा कायदा आला भारतीय स्त्री अवनत होत गेली. धार्मिक कायद्यामुळे स्त्रिया मागे पडल्या याविषयी ते १९३९ पासून विचार मांडत होते.

स्त्रीचे समाजातील स्थान फार महत्त्वाचे आहे. तिचे स्वातंत्र्य आणि तिची प्रगती अत्यंत आवश्यक आहे याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजीत असतो." (खंड १८, भाग १, पृ.४२६) त्यामुळे समाजाची प्रगती व्हायची असेल तर देशातील स्त्रियांची प्रगती झाली पाहिजे असे त्यांना वाटत होते. सार्वजनिक जीवनात स्त्रियांनी उतरले पाहिजे, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढले पाहिजे, असा विचार ते मांडत होते.

स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न जोतीराव फुल्यांनी समजून घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरही त्याविषयी जागरूक होते. मुला-मुलींचे लग्न घाईने न करता प्रथम त्यांना शिकविले पाहिजे. शिक्षित स्त्रीने आपल्या कर्तव्यात पतीला सहकार्य केले पाहिजे हे सांगताना ते म्हणतात, "लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा." (तत्रैव, पृ.४२७) यावरून स्त्री-पुरुष समतेकडे ते गंभीरपणे पाहात होते हे लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' म्हणजे 'हिंदूसंहिता विधेयक' हे ९ एप्रिल १९४८ रोजी घटना समितीपुढे सादर केले. त्यातील हिंदू स्त्री-पुरुषांच्या मालमत्तेचे हक्क, पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तकग्रहण, अज्ञानवयता आणि पालकत्व हे सातही प्रश्न भारतीय स्त्रियांसाठी महत्त्वाचे होते. या बिलामुळे भारतीय स्त्रियांना पुरुषांप्रमाणे अधिकार मिळणार होते. या बिलाचे समर्थन आणि प्रचार करताना कोल्हापूर येथील एका सभेत ते म्हणतात, "ज्या स्त्रीला आपल्या नवऱ्याबरोबर संसार करणे बरे वाटणार नाही, तिला घटस्फोट घेण्याची या बिलाने मुभा देण्यात आली होती." (तत्रैव, पृ.३४१) हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला विचार हा भारतीय स्त्रीमुक्तीचा विचार होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य जातीतील स्त्रियांसाठी स्वतंत्र विचार करतात. आपल्या पोटी होणारी संतती ही अस्पृश्य गणली जाते, यावर मात करण्यासाठी अस्पृश्य स्त्रियांनी काही गोष्टी मुद्दाम केल्या पाहिजेत, असे त्यांना वाटत होते. अस्पृश्य स्त्रियांनी शिक्षण घेणे महत्त्वाचे आहेच, त्याचबरोबर काही बाबी सोडल्या पाहिजेत, याविषयी ते म्हणतात, "तुम्ही सर्वांनी जुन्या व गलिच्छ चालीरिती सोडून दिल्या पाहिजेत... तुमची लुगडी नेसण्याची पध्दत ही तुमच्या अस्पृश्यतेची साक्ष आहे... वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पद्धतीने लुगडी नेसतात त्या पध्दतीने तुम्ही लुगडी नेसण्याचा प्रघात पाडला पाहिजे... तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे." (तत्रैव, पृ.१४४) त्यांची ही भूमिका अस्पृश्य स्त्रियांसाठी प्रेरणादायी अशीच आहे. आजही हा विचार उपयुक्त ठरतो.

एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांसाठी मांडलेले विचार हे क्रांतिकारक स्वरूपाचे आहेत. स्त्रीला माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी ते उपयुक्त आहेत. धार्मिक गुलामगिरीतून स्त्रीची मुक्तता करण्यासाठी ते आवश्यक आहेत. 'मनुस्मृती' मुळे दुय्यम ठरलेली स्त्री भारतीय संविधानातील कायद्यामुळे प्रगतीचा मार्ग धरू शकली यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेली भूमिका निश्चित उपयोगी ठरली हे नाकारता येत नाही.

### १.६.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार:

भारतीय शेती आणि शेतकरी यांविषयी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार आजही उपयुक्त ठरणारे आहेत. भारतातील शेतजमिनीच्या प्रश्नावर त्यांनी केलेले चिंतन मौलिक स्वरूपाचे आहे. शेतकरी हा संपूर्ण जगाचा पोशिंदा असतो. शेतकरी कष्ट करतो, शेती पिकवितो तेव्हा त्यामुळे इतर लोकांना अन्न मिळते. तो सुखी झाला पाहिजे. असे होत नाही हे डॉ. आंबेडकरांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भाने मांडलेले विचार भारतीय शेतीला प्रगतीच्या दिशेने नेणारे आहेत.

'भारतीय लहान-लहान शेतजमिनी व त्यावरील उपाय' या संशोधनपर लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरंभी शेतीचे महत्त्व मांडले आहे. त्यानंतर शेतजमिनीचे लहान लहान तुकडे झाल्यामुळे भारतीय शेती फायद्याची ठरली नाही, हे ते स्पष्ट करतात. पुढे जमिनीचे एकीकरण आणि विस्तारीकरणाचे स्वरूप मांडून त्यावर उपाय योजना सूचवितात. ते म्हणतात, "जर लहान व विस्कळीत शेतजमिनीमुळे शेतीला फटका बसत असेल तर औद्योगिकीकरणाखेरीज दुसरा पर्याय नाही." (आंबेडकर : २००८, ४८) यावरून शेतकरी आणि शेती यांची प्रगती झाली पाहिजे, अशी भूमिका ते घेत होते हे लक्षात येते.

खोतीचा प्रश्न हाही शेतीच्या अनेक प्रश्नांपैकी एक प्रश्न होता. खोतीमुळे सामान्य शेतकऱ्यांचे जीवन भरडले जात होते. खोत हा अतिशय जुलमाने वागत असे. त्याच्या खाजगी जमिनीतील लागवडीची कामे तो लोकांकडून वेठीने करून घेत असे. त्या मोबदल्यात शेतकऱ्यांना पोटापुरतीही मजुरी मिळत नसे. शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेऊ नयेत यासाठी खोत प्रयत्न करीत असे. अशा खोती पध्दतीमुळे शेतकरी गुलाम झाला होता, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समजून घेतले. खोतीचा प्रश्न निकालात लागला पाहिजे यासाठी त्यांनी विचार मांडले.

खोती पध्दत समूळ नष्ट झाली पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. चिपळूण येथे १४ एप्रिल १९२९ रोजी झालेल्या शेतकरी परिषदेत खोती पध्दतीला एकदम मूठमाती देण्यास त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना खोताच्या संकटांतून वाचवण्याची जबाबदारी ही सरकारची आहे, असे ठाम मत त्यांनी मांडले. ते म्हणतात, "ह्या (खोती) पध्दतीमुळे शेतकऱ्याच्या चित्ताला शांती नाही. काबाडकष्ट करून तयार केलेल्या शेतीवर धनिकांनी आयत्या बिळावर नागोबा या नात्याने हल्ला करून त्या आपल्या ताब्यात घ्याव्या. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे जीवन चारी बाजूंनी संकटात राहिले तरी धनिकांना व खोतांना त्याची पर्वा नसते. अशा वेळी श्रमजीवी शेतकऱ्यांच्या कष्टाचे, मेहनतीचे फळ सरकारने मिळवून दिले पाहिजे." (आंबेडकर:२००८,१०५) यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खोतीसारख्या जाचक प्रथांमधून शेतकरी हा मुक्त झाला पाहिजे हा विचार मांडत होते हे लक्षात येते.

शेतीचे तुकडे पडत गेले तर शेतकरी हा अल्पभूधारक किंवा भूमिहीन होत जातो. शेतीच्या या विखुरलेपणावर वा धारणक्षेत्राच्या क्षमतेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सूचविलेला उपाय लक्षात घेतला पाहिजे. शेती ही जर सहकारी तत्त्वावर केली तर ती अधिक किफायतशीर ठरेल आणि छोटा शेतकरी जगेल. सहकारी शेतीचा पुरस्कार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कृषीतज्ज्ञ होते.

शेती ही केवळ पिकविण्यासाठी होऊ नये तर ती आर्थिक उद्योगाचे साधन म्हणून विकसित केली पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. शेती हा आर्थिक उद्योग आहे या दृष्टीने शेतकऱ्याने शेतीत लागवड केली पाहिजे. त्यासाठी त्याला उत्पादनाची साधने मिळाली पाहिजे. शेतीकडे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून न पाहता अर्थार्जनाचे साधन म्हणूनही पाहावे ही डॉ. आंबेडकरांची भूमिका वर्तमानातही उपयोगी पडत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जल आणि विद्युतविषयक मांडलेले विचार आणि केलेले कार्य शेतीच्या विकासासाठी फलदायी ठरले आहेत. शेती ही शेतकऱ्यांना आणि देशाला प्रगतीच्या दिशेने नेणारी झाली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. शेतीचे तुकडे पडू नयेत. खोत आणि जमीनदार यांच्या तावडीतून शेतकऱ्याची सुटका झाली पाहिजे. शेतीसाठी पुरेसा विजेचा पुरवठा झाला पाहिजे. महापुरामुळे होणाऱ्या संकटातून वाचण्यासाठी पाटबंधाऱ्यांची सोय झाली पाहिजे. शेतीला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत, अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या लेखन आणि भाषणात सतत मांडत होते.

### १.६.७ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरीब, शेतकरी आणि कामगार यांच्या हितरक्षणासाठी १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. त्या माध्यमातून त्यांनी कामगारांच्या संदर्भाने विचार मांडले. १९३८ मध्ये मनमाड येथे अखिल जी.आय.पी. रेल्वे अस्पृश्य कामगार परिषदेतील भाषणात त्यांनी विचार व्यक्त केले. अस्पृश्य कामगारांची वेगळी परिषद भरवून कामगारांमध्ये फूट पाडली जात आहे, अशी टीका त्यांच्यावर झाली. त्या टीकेस उत्तर देताना ते म्हणाले, "माझ्या मते या देशातील कामगारांना दोन शत्रूंशी तोंड द्यावे

लागेल. हे दोन शत्रू म्हणजे ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे होत." ( खंड १८, भाग २, पृ.९७) ब्राह्मणशाही म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण ते करतात. त्यांना वाटते ब्राह्मणशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव या तत्त्वांचा अभाव. दलित कामगार फक्त सूतकताई विभागातच काम करू शकतो; विणाई विभागात त्याला काम दिले जात नाही कारण तो अस्पृश्य असतो. यामुळे सर्व जातीचे कामगार एकत्र येऊन संघटित होऊ शकत नाहीत, हे डॉ. आंबेडकरांचे निरीक्षण नाकारता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कामगारांविषयी घेतलेली भूमिका ही सर्वस्वी वेगळी आहे. कोणत्याही कामगारांना जात नसते कारण तो फक्त कामगार असतो, असे स्पृश्य पुढाऱ्यांना वाटते, हे मत डॉ. आंबेडकर मान्य करत नाहीत. कामगारांसाठी संघटना आवश्यक आहेच परंतु त्यापूर्वी कामगारांमध्ये ऐक्याची भावना रूजली पाहिजे असे त्यांना वाटत होते. भारतात मालक आणि नोकर (कामगार) असे केवळ दोनच वर्ग आहेत असे गृहीत धरून फक्त भांडवलशाही नष्ट करण्याची मोहीम हातात घेता येत नाही. त्या दृष्टीने दोन्हींचा विचार केला पाहिजे असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "वंश आणि धर्मामुळे एक कामगार दुसऱ्याचा शत्रू बनत असल्यामुळे कामगारांच्या ऐक्यामध्ये आड येणारी ही कारणे नष्ट करणे हाच कामगार ऐक्याचा खरा मार्ग आहे." (तत्रैव, पृ.१०१) त्यामुळे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांवर आधारलेली पध्दती हे कामगार संघटनेचे ध्येय असले पाहिजे, हा विचार ते सातत्याने मांडतात.

जगातील सर्व कामगार संघटित झाले पाहिजे असे कार्ल मार्क्सला वाटत होते मात्र तसे झाले नाही. वर्ण, वंश, धर्म, जात आणि प्रदेश यांचे अडथळे लक्षात घ्यावे लागतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही अडथळे लक्षात घेतली होती. त्यांनी ' स्वतंत्र मजूर पक्ष ' स्थापन केला होता. कामगारांच्या हक्कांसाठी आणि सत्तेसाठी कामगाराने ज्ञान घेतले पाहिजे, अशी आग्रही भूमिका ते घेतात. निव्वळ कारखानदारांना शिव्या न देता भारतीय कामगारांनी अभ्यास केला पाहिजे, शिक्षण घेतले पाहिजे, हा विचार ते वेळोवेळी पटवून देतात. सामाजिकतेच्या अंगाने भारतीय कामगारांनी एकजूट केली पाहिजे, हा अतिशय वेगळा विचार ते मांडत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

दिल्ली येथे १७ सप्टेंबर १९४३ रोजी 'द ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्कस स्टडी कॅम्प' च्या समारोपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या आर्थिक विकासाबाबत विचार मांडले. मुळात कामगार हा शिक्षित होऊन शहाणा झाला पाहिजे, त्याने कामगारांच्या स्वातंत्र्याविषयी पुस्तके वाचली पाहिजे, असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "हिंदी कामगारांनी दुसरीही एक गोष्ट शिकायला हवी. ती म्हणजे ही, की ज्ञानावाचून सामर्थ्य नाही." (तत्रैव,पृ.४४०) कामगारांच्या हिताचे संरक्षण करणे, इतके संकुचित उद्दिष्ट कामागारांचे असू नये, त्यासाठी सत्तेत आले पाहिजे. शासनयंत्रणेचा ताबा घ्यायचा असेल तर कामगारांनी तयार झाले पाहिजे. त्यासाठी शासन पध्दतीवरील पुस्तके वाचली पाहिजे, असा सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगारांना देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे काही काळ मजूर मंत्री होते. कामगारांच्या हितासाठी त्यांनी अनेक धोरणं राबवली. भारताच्या भावी राज्यघटनेत कामगारांच्या राजकीय हक्कांना प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका घेतली. १९४४ मधील एका भाषणात ते म्हणतात,

"मध्यवर्ती कायदे मंडळात ५० टक्के आणि प्रांतिक कायदे मंडळात ३० टक्के जागा कामगारांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. यासाठी तुम्ही चळवळ करा. मजूर खाते माझ्याकडे आहे. ते मला सुव्यवस्थित करावयाचे आहे. मजुरांचे जास्तीत जास्त कल्याण करणे हेच माझे ध्येय आहे." (तत्रैव, पृ.४५९) यावरून कामगारांच्या हितासंर्भात त्यांनी मांडलेले विचार किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते.

भारतात श्रमाला महत्त्व दिले जात नाही. कामगारांकडे माणूस म्हणून न पाहता कामगार म्हणून पाहिले जाते. ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निरीक्षणातून सुटली नव्हती. १९४५ रोजी एका परिषदेत ते म्हणतात, "कामगार हा मनुष्य आहे व मानवाचे हक्क जे आहेत ते कामगाराला असणे जरुरीचे आहे. लढाया संपल्या असल्या तरी भांडवलवाले व कामगार यांच्यातील लढा काही कमी महत्त्वाचा नाही." (तत्रैव, पृ.५६८) कामगार हा माणूस आहे, त्याला त्याचे अधिकार मिळाले पाहिजे, असे डॉ. आंबेडकर सरकारला त्यावेळी सांगत होते. त्यांचा हा विचार कामगार वर्गाचे कल्याण साधण्यासाठी प्रेरणा देणारा आहे.

एकूणच कामगार हा भांडवलदार आणि ब्राह्मणशाहीमुळे त्रस्त आहे. कामगार सामाजिक विषमतेमुळे विभागला आहे. तो सामाजिक दृष्टीने एकत्र आला पाहिजे. राजकीय दृष्टीने तो संघटित झाला पाहिजे. शासनयंत्रणेवर त्याचे नियंत्रण असले पाहिजे. तो शिक्षित झाला पाहिजे. त्याने शासनव्यवस्थेवरील पुस्तके वाचली पाहिजेत. इतरांप्रमाणे तोही माणूस आहे. त्या दृष्टीने कामगारांनी चळवळ केली पाहिजे, असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करीत होते.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयक विचार तुमच्या शब्दात आढावा घ्या.

---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------

## १.७ समारोप

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्व आणि विचारात भारतीय समाजव्यवस्थेला मध्यवर्ती ठेवले आहे. बुध्द, कबीर आणि जोतीराव फुल्यांना गुरू मानले. भाकरीपेक्षा स्वाभिमानाला महत्त्व दिले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला मूल्य असते हा विचार मांडला. व्यक्तीच्या प्रतिष्ठेला महत्त्व दिले. जात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन व्यक्तीचे माणूस म्हणून असलेले अस्तित्व मान्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चातचर्वर्ण्यव्यवस्थेला नकार दिला. माणसा-माणसात भेद करणारी व्यवस्था नाकारली. श्रेष्ठ-कनिष्ठ अथवा स्पृश्य-अस्पृश्य हा भेद व्यक्तीच्या प्रगतीसाठी अडथळा आहे, असे स्पष्ट केले. निरिश्वरवाद हा जगण्याचा पाया मानला.

स्वातंत्र्य, समता बंधुता आणि धर्मनिरपेक्ष न्याय या तत्त्वांचा पुरस्कार केला. त्यामुळे त्यांची विचारसरणी ही भारतीय समाजव्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी उपयुक्त ठरणारी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला महत्त्व दिले. शिक्षणाला नैतिकतेची जोड असली पाहिजे असा विचार मांडला. शिक्षणामुळे योग्यता मिळवून समाजासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे, अशी भूमिका घेतली. राजकारणाचे अंतिम उद्दिष्ट हे समाजहित असते, याकडे लक्ष वेधले. हुकूमशाही आणि विषमसमाजरचना लोकशाहीला मारक असते, हे पटवून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, कामगार आणि महिला यांच्या उत्थानाचा विचार केला. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध विचार मांडले. कामगारांचे ऐक्य, शेतकऱ्यांची सरकारने घ्यावयाची काळजी आणि स्त्रीची धार्मिक कायद्यातून होणारी सुटका यासाठी विविध कायद्यांची योजना करण्याचा विचार मांडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या एकूण विचारात धार्मिक विचाराला विशेष स्थान दिले. बौध्द धम्मामुळे जगातील समस्या सुटतील हा विश्वास व्यक्त केला. अहिंसा, सत्य, समता, बंधुभाव, स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्ष कायदा हा व्यक्ती आणि देशाच्या विकासासाठी आवश्यक असतो, असे साधार स्पष्ट केले. त्यांच्या ह्या विचारांमुळे आंबेडकरवाद उदयास आला.

## १.८ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. जोतीराव फुल्यांचे विचार कोणते उद्दिष्ट घेऊन आविष्कृत झाले आहेत ?

२. जोतीराव फुल्यांच्या शिक्षणविषयक विचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

३. जोतीराव फुल्यांच्या धर्मविषयक विचाराचे वेगळेपण विशद करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. जोतीराव फुले आणि पुराणग्रंथ

२. विद्येविना मति गेली

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यता निवारण

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही

५. डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातील स्वाभिमान

## १.९ संदर्भ


- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग १, संपादक : वसंत मून व इतर, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२
- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग २, संपादक : वसंत मून व इतर, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२
- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, भाग ३, संपादक : वसंत मून व इतर, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२
- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड २०, संपादक : हरी नरके व इतर, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५
- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, संपादक : वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई, १९९०
- आंबेडकर बाबासाहेब : डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भाषण आणि विचार, खंड-४, कृषी, संपादक : डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर, २००८
- आंबेडकर बाबासाहेब : भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म : अनुवादक : घनःश्याम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस आणि शां. श. रेगे, सद्धम्मादित्य प्रकाशन, केळझर, जि. वर्धा, २००६
- कीर धनंजय : महात्मा फुले गौरव ग्रंथ, संपादक : हरी नरके, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, २०१८
- जोतीराव फुले : महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपादक : धनंजय कीर आणि इतर, म.रा.सि.आणि सं.मं., मुंबई, २००६


*****

# २

# फुले-आंबेडकरवादी साहित्य: प्रेरणा व स्वरूप

**घटक रचना**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ फुले–आंबेडकरी साहित्य : पूर्व परंपरा

२.३ फुले-आंबेडकरी साहित्य प्रवाह

२.४ फुले-आंबेडकरवादी साहित्य निर्मितीचे प्रेरणास्रोत

२.४.१ महात्मा फुले

२.४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

२.५ फुले-आंबेडकरवादी साहित्य- स्वरूप

२.६ व्याख्या

२.७ फुले-आंबेडकरी साहित्य प्रेरणा, संवेदन

२.८ फुले-आंबेडकरी साहित्य: परंपरा

२.८.१ कथा लेखन

२.८.२ कादंबरी लेखन

२.८.३ काव्यलेखन

२.८.४ नाट्यलेखन

२.८.५ वैचारिक साहित्य-समीक्षा

२.९ फुले–आंबेडकरी साहित्याची वैशिष्ट्ये

२.१० समारोप

२.११ नमुना प्रश्न

२.१२ संदर्भ

२.१३ अधिक वाचन


## २.० उद्दिष्टे

- फुले-आंबेडकर यांचे विचार समजून घेणे.
- फुले-आंबेडकरवादी साहित्याच्या प्रेरणा जाणून घेणे.
- फुले-आंबेडकरवादी साहित्याचा परिचय करून घेणे.
- फुले-आंबेडकरवादी साहित्याचे महत्त्व आधेरेखित करणे.

## २.१ प्रस्तावना

पारंपरिक समाजव्यवस्थेत 'जात' हा घटक प्रभावीपणे अस्तित्वात होता. सार्वजनिक हित आणि सहकार्य हे जातिंपुरतेच मर्यादित होते. या व्यवस्थेने जातिनिहाय व्यवसाय धोरण स्वीकारले होते. त्यामुळे व्यवसाय स्वातंत्र्य नव्हते. म्हणूनच जात आणि व्यवसाय हे समीकरण दीर्घकाळ चालूच राहिले. भारतीय चार्तुवर्ण्यव्यवस्थेने 'शूद्र' या वर्णातील लोकांनी तीन वर्णांची (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य) सेवा करावी आणि हेच त्यांचे 'कर्म' असल्याचे समाजमनावर नोंदविले होते. आणि गुलामगिरीच्या जोखडात त्यांना बंदिस्त करून ठेवले. समाजव्यवस्थेचा हा कावेबाजपणा महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आला. आणि त्यांनी याला शह दिला. वर्षानुवर्षे अस्पृश्यांचे अनेकांगी शोषण झाले. श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या श्रेणीबद्ध व्यवस्थेत त्यांना अडकवून त्यांचे माणूसपण नाकारले. स्व-विकासाच्या कोणत्याच संधी अस्पृश्यांना प्राप्त होऊ शकल्या नाहीत. हे वास्तव आहे. त्यामुळेच अस्पृश्य मानला गेलेला समाज दीर्घकाळ शिक्षणापासून, सुखापासून वंचित राहिला होता. यातून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परिवर्तनवादी चळवळ महत्त्वाची ठरली.

## २.२ फुले-आंबेडकरी साहित्य : पूर्व परंपरा

फुले–आंबेडकरी साहित्य हे मुख्यत्वे एका वैचारिक चळवळीचा, परिवर्तनवादी विचार परंपरेचा परिपाक आहे. या वैचारिक स्वरूपातील साहित्याची निर्मिती सर्वसाधारणपणे १९५६ नंतरची आहे, असे असले तरी संत परंपरेतील संत चोखामेळा आणि त्याचे कुटुंबीय यांनी केलेली अभंगरचना ही या स्वरूपाच्या जाणिवेचा एक भाग आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. महात्मा फुले यांनी उभी केलेली विचार परिवर्तनाची परंपरा लक्षात घेता मुक्ताबाई या मुलीने जो निबंध लिहिला तो या परंपरेला पुढे घेऊन जाणारा ठरला. 'मांगा-म्हाराच्या दुःखाविषयी' हा तिचा निबंध जाणिवेचा एक स्वर आहे. ‘अन्याय्याची जाणीव होणे' आणि त्याविषयीचे कथन करणे, ते मांडणे ही परिवर्तनाची नांदी ठरत असते. ही परिवर्तनाची नांदी पुढे घेऊन जाण्याचे कार्य आपल्या शाहिरांनी केले. फुले-आंबेडकरांची भूमिका शाहिरांनी आपल्या कवनांमधून लोकांपर्यंत पोहोचविली. या विचारांचा अवलंब करून कवने रचणारा शाहिरांचा एक मोठा वर्ग या काळात उदयास आला. किसन फागू बंदसोडे, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम कांबळे, शाहीर धेगडे, केरुबुवा गायकवाड, शाहीर भीमराव कर्डक, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक आदींनी फुले-आंबेडकरी विचार चळवळीला बळकट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना, परिवर्तनाच्या भूमिकेला अनेक ‘जलसाकारां’नी शब्दबद्ध केले. पोवाडा, गीतरचना, तमाशा, जलसा (पारंपारिक लोककला) यांमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान शाहिर अर्जुन घेगडे, दीनबंधू, केरूबुवा गायकवाड, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक इत्यादींनी जनमानसापर्यंत पोहोचविले. आपल्या संभाषणातून, काव्यातून त्यांनी आपले अनुभव कथन केले आणि जाणीव जागृतीची एक मोहिम उभी केली. या सर्वांतून मानवतेची जोपासना व्हावी हा विचार पुढे आला. फुले-आंबेडकर यांनी मानवतावादी दृष्टी बरोबरच समतेचा विचार दिला. मानवाला दुःखातून मुक्त करण्याचे स्वप्न उराशी बाळगत स्वत्वाची जाणीव

करून दिली. या मधूनच फुले-आंबेडकरवादी साहित्य आकारास येत गेले, असे म्हणता येईल.

## २.३ फुले-आंबेडकरी साहित्य प्रवाह

महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रबोधनाची परंपरा अर्वाचीन काळात सुरू केली. या परंपरेत 'मानवता' हे एक महत्त्वाचे मूल्य जोपासले गेले. या दोन्ही महान विचारवंतांनी कृतिशील चळवळ सुरू ठेवून प्रबोधनात्मक विचार लोकमानसासमोर ठेवले, पर्यायाने ते रुजविले. त्यामुळेच समाजात परिवर्तन घडून आले. परिवर्तनाचे नवभान समाजास आले. ते नवभान साहित्यातून अनेकांनी मांडले. त्यातूनच हा फुले-आंबेडकरी साहित्य प्रवाह उदयास आला. सामाजिक समता आणि मानवता ही मूल्ये या साहित्य प्रवाहातील साहित्य निर्मिती मागे राहिलेली दिसतात. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या चळवळी, त्यांचे लोकांसमोर ठेवलेले विचार, त्यातून झालेली विचारक्रांती या साहित्य निर्मितीस प्रेरक ठरली. या साहित्यामागे फुले, आंबेडकर यांची प्रेरणा आहे. तसेच त्यांची विचार तत्त्वे केंद्रस्थानी आहेत. फुले, आंबेडकरांचे विचार प्रमाण मानून जे साहित्य निर्माण झाले ते फुले-आंबेडकरी साहित्य होय.

फुले-आंबेडकरी साहित्य प्रवाहाच्या नामाभिधानाविषयी राजा ढाले म्हणतात, “'दलित' या कुचकामी शब्दात जाती संस्था मोडण्याची कोणतीच तरकीब नाही, कोणतेच सामर्थ्य नाही, कोणताच विचार नाही. तर ती तरकीब, ते सामर्थ्य आणि तो विचारव्युह अनुस्यूत आहे. तो फक्त 'फुले-आंबेडकर' या जोडशब्दात! मग या विचारव्युहाचं नाव आपल्या साहित्य प्रवाहाने का धारण करु नये?”१ राजा ढाले यांनी हा उपस्थित केलेला प्रश्न मार्मिक आहे. कारण महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तत्त्ववेत्यांनी जातिअंतासाठी, दलिततत्वासाठी विचारलढा दिला. म्हणूनच आपण 'दलित' हा शब्द नाकारून 'फुले-आंबेडकर' हा शब्दप्रयोग करणे उचित ठरेल. कारण दलित हा शब्द जातीला अधोरेखित करणारा आहे. जातिच्या परंपरानिहाय जगण्यातून आपण बाहेर पडण्याची गरज आहे. 'दलित' हा जातदर्शक शब्द मागे टाकून, आपण फुले-आंबेडकरी विचार प्रवाह स्वीकारणे आवश्यक ठरते. या संदर्भात गौतमीपुत्र कांबळे म्हणतात, “फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य हेच नाव आपल्या साहित्य प्रवाहाला जसे उचित ठरते. तसेच ते आपल्या मानवमुक्तीच्या लढ्यातील शस्त्राचे नाव म्हणूनही उचित ठरते.”२ एकूणच या नामाभिधानामागे महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, त्यांचे तत्त्वज्ञान, प्रेरणा आहे. या प्रेरणेतून अनेकजण लेखन करू शकतात. त्यांच्या लेखनामागेही या महान पुरुषांचे आदर्श असणार आहेत, हे महत्वाचे ठरते. फुले-आंबेडकर हा एक विचार आहे. तसेच ते आदर्श जीवन जगण्याचा प्रेरणास्रोत आहे.

## २.४ फुले-आंबेडकरवादी साहित्य निर्मितीचे प्रेरणास्रोत

### २.४.१ महात्मा फुले:

महात्मा फुले यांनी शिक्षणाला महत्व देत पुण्यामध्ये शाळा सुरू केली. वंचिताना दुःखातून बाहेर काढण्यासाठी शिक्षण हाच योग्य मार्ग आहे, हे पटवून दिले. याच अनुषंगाने ‘ब्राम्हणांचे

कसब' (१९६९), 'गुलामगिरी' (१९७३), 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) या वैचारिक लेखनाबरोबरच त्यांनी 'तृतीय रत्न' (१८५५) हे नाटक ही लिहिले.

महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजातील स्त्रीशिक्षण, केशवपन, विधवाविवाह यांसारख्या प्रश्नांना चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवले. तसेच शेतकरी आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींचे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक प्रश्न प्रभावीपणे त्यांनी समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्मातील पारंपरिक विचारांना शह देत पुरोहितशाहीला विरोध दर्शविला. त्यातूनच त्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेचा दंभस्फोट केला. महात्मा फुले यांनी सामाजिक समता, न्याय आणि मानवता या त्रिसूत्रींचा पुरस्कार केला. आणि समाजाला जाणीवपूर्वक समाजव्यवस्थेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन दिला. त्यातूनच बहुजन समाज विचारमंथनाच्या प्रक्रियेत येऊ शकला. हे महात्मा फुले यांच्या कार्यामुळे, चळवळीमुळे होऊ शकले.

महात्मा फुल्यांच्या विचारप्रणालीत मानवी हक्क, न्याय आणि स्वातंत्र्य ही प्रमुख तीन तत्त्वे आहेत. पारंपरिक समाजव्यवस्थेत असणारी जातियता, वर्गरचना, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांना त्यांनी विरोध दर्शविला. तसेच समाजातील विषमता त्यांना समूळ नष्ट व्हावी असे वाटत होते. कारण शोषक-शोषित, मालक-गुलाम ही व्यवस्थाच त्यांना मोडीत काढावयाची होती. या विषमतेविरोधात त्यांनी क्रांती घडवून आणली. संरजामशाहीला त्यांनी विरोध दर्शविला. आणि पारंपरिक समाजाला जागृक करण्याचे ध्येय उरी बाळगत ही सामाजिक विचारक्रांती घडवून आणली. हा क्रांतिकारक सामाजिक विचार समाजाला समतेच्या दिशेने घेऊन जाणारा असून परिवर्तनाच्या टप्प्यात महत्वपूर्ण आहे. तसेच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून पारंपरिक विचारसरणीला, कर्मकांडांना छेद दिला. महात्मा फुले यांनी अज्ञान, दारिद्र्य आणि गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून प्रथम शिक्षण या घटकाकडे लक्ष दिले. समाजामधील तळागाळातील समूह दारिद्र्य अवस्थेत आहेत. यासाठीच त्यांनी अस्पृश्य स्त्री-पुरुषांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. महात्मा फुले यांनी जी चळवळ उभी केली. त्या सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी ही चळवळ पुढे नेली.

### २.४.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या राष्ट्रघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, नेते, स्त्रियांचे कैवारी होते. त्यांनी विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून लेखन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जनता', 'मूकनायक', 'प्रबुद्ध भारत' ही नियतकालिके सुरू केली. ही नियतकालिके वैचारिकता, चिंतनात्मकता निर्माण करणारी होती; तशीच ती साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देणारी ही होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्च १९२७ मध्ये महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह केला. त्याचप्रमाणे नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०) या आंदोलन कृतीतून एक नवा आयाम चळवळींना प्राप्त झाला. त्यांची ही कृती सामाजिक आणि धार्मिक क्रांतींचा आरंभ करणारी ठरली. त्यानंतर अस्पृश्यांच्या मूलभूत हक्कांसाठी अनेक लढे उभारले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत हितकारणी सभा' (१९२४), 'समाज समता संघ' (१९२७), 'स्वतंत्र मजदूर पक्ष' (१९३६), अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशन (१९४२) इत्यादींची स्थापना केली. त्यांनी समाजाला उद्बोधन, मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक लोकशाही

हवी होती. या लोकशाहीत सामाजिक न्यायाची जपणूक करणारी विचारधारा त्यांना अभिप्रेत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही त्रिसूत्रबद्ध विचारप्रणाली समाजाला दिली. या विचारप्रणाली मागे व्यक्तिविकास आणि समाजविकास आहे. त्यांनी पारंपरिक समाजव्यवस्थेतील अनिष्ट रूढी, परंपरांना विरोध केला. अंधश्रद्धा, कर्मकांड यांच्या विरोधात जनजागृती केली. आपल्या लेखणीने या सर्वांच्या विरोधात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धम्मक्रांती घडविली. तसेच उपेक्षित, वंचित, दीन-दुबळ्या समजल्या गेलेल्या अनेक जातीतील लोकांना स्वाभिमानाने जगण्याचा मूलमंत्र दिला. आपणही या समाजातील एक माणूस आहोत याची जाणीव करून दिली. त्यांच्यात आत्मविश्वासाची भावना निर्माण केली. सामाजिक आणि राजकीय बदल, परिवर्तन डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत होते. त्याअनुषंगाने त्यांनी सर्व स्तरातील लोकांना एकत्र करीत परिवर्तनाची क्रांती घडविली. तसेच डॉ. आंबेडकरांनी नीतिला अनन्यसाधारण महत्त्व दिले. ही नीती व्यक्तीला 'व्यक्ती' म्हणून जगायला शिकवत असते.

**डॉ. आंबेडकरांचे काही महत्त्वपूर्ण विचारतत्वे पुढील प्रमाणे सांगता येतील:**

- सामाजिक-धार्मिक क्रांती नंतर राजकीय क्रांती होते.
- धार्मिक-सामाजिक रचनेचा आर्थिक रचनेशी संबंध असतो.
- ‘समग्र समाजाची सुधारणा’ याअर्थी सुधारणा होणे आवश्यक आहे.
- जातिसंस्थेने हिंदू समाजाचे विघटन, व नैतिक अध:पतन केलेले आहे.
- जातिभेदामुळे हिंदू समाजाचे संघटन होऊ शकलेले नाही.
- व्यक्तविकास हे अंतिम ध्येय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिसंस्था, धर्मसंस्था, राजकीय संस्था, नातेसंबंध संस्था या चार संस्था मानतात आणि सामाजिक-धार्मिक रचना, आर्थिक रचना, आणि राजकीय रचना या तीन प्रमुख रचना समाजाच्या जडणघडणीत असतात, असे ते मानतात. क्रांती ही कोणत्या घटकांवर अवलंबून असते. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढील प्रमाणे सांगतात,

“१) समाजातील दोषांची जाणीव असणे.

२) अशा दोषांमुळे कोणीतरी दुःख भोगते आहे हे जाणण्याची क्षमता असणे.

३) शस्त्रांची उपलब्धता असणे.”[३]

उपरोक्त तीन घटक लक्षात घेतले असता दोन घटक हे शिक्षणाशी आणि जाणीवेशी निगडित आहेत तर तिसरा घटक हा संघर्षाशी निगडित आहे. या घटकांमधून 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलगामी विचार त्यांच्या विचारप्रणाली मध्ये असलेला दिसतो.

## २.५ फुले-आंबेडकरवादी साहित्य-स्वरूप

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकूणच मानव मुक्तीचा लढा दिला. मानवतावादी विचाराची कास धरून मानव मुक्तीचा विचार समाजमनात रुजाविला. स्वातंत्र्य, समता, मानवता, बंधुता, न्याय या मूल्यांची रुजवणूक केली. समाजाच्या एकूण विकासासाठी ही जीवनमूल्ये या दोन विचारवंतांनी महत्त्वाची मानली. या जीवनमूल्यांच्या आधारे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. जातीय व्यवस्था, धर्म, समाज, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, राज्यघटना आदि विषयांवर यांनी मूलगामी चिंतन करून विचार मांडलेले आहेत. ते समाजचिंतक असल्यामुळे त्यांनी व्यक्ती, व्यक्तिसमूह त्यांच्या गरजा यांचे भान सतत ठेवले आणि पारंपरिक विचारांना तिलांजली देऊन समाज विकास साधण्यासाठी अतिशय परिश्रम घेतले. धर्म, धर्मग्रंथ, कर्म, कर्मकांड, दैववाद, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था यांवर प्रखरतेने हल्ला चढविला. आणि विज्ञानाचा पुरस्कार करून आधुनिक मूल्यांचे भान आणून दिले. त्याचबरोबर अस्मितेची जाणीव करून दिली हे विचारवंत मुख्यतः सुधारणावादी होते. त्यांनी भारतीय समाजरचनेचा सूक्ष्मपणे अभ्यास केलेला होता म्हणून त्यांनी सुधारणावादी भूमिका घेऊन विचारातक्रांती घडवली.

फुले-आंबेडकर साहित्य उपरोक्त विचारांनी प्रेरित झालेले आहे. या विचारवंतांनी दिलेले विचार, प्रेरणा आणि जीवनमार्ग या साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. या साहित्यातून फुले-आंबेडकरी विचार प्रेरणा व्यक्त झालेली असते. मुख्यत्वे या साहित्यातून मानवी जीवन हा समाज व्यवस्थेचा एक भाग आहे. या भागाचे, जीवनाचे विश्लेषण, त्याची चिकित्सा फुले-आंबेडकर साहित्यातून केली जाते.

## २.६ व्याख्या

१) ज्या साहित्या मागील प्रेरणा फुले-आंबेडकर आहेत त्या साहित्याला फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य म्हणावे. - राजा ढाले

२) ज्या साहित्यातून फुले-आंबेडकरी विचार-जाणीव अविष्कृत होते, तसेच या विचार जाणिवेशी सुसंगत वर्तन करण्याची प्रेरणा मिळते. त्या साहित्याला फुले-आंबेडकर प्रेरणेचे साहित्य म्हणावे. - प्रा. गौतमीपुत्र कांबळे

'फुले-आंबेडकर यांच्या विचारांशी प्रमाण राहून स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता या मूल्यांचा पुरस्कार करणारे आणि विषमताधिष्टित समाजव्यवस्थेच्या विरुद्ध जाणीवपूर्वक लेखन करून मानवी जीवनानुभव मांडणारे साहित्य म्हणजे फुले-आंबेडकर साहित्य असे म्हणता येईल.'

## २.७ फुले-आंबेडकरी साहित्य प्रेरणा, संवेदन

फुले-आंबेडकरी साहित्य हे व्यक्तिविकास आणि समाज विकास साधण्याची प्रेरणा देणारे आहे. या साहित्याची प्रेरणा वा उद्देश सांगताना राजा ढाले म्हणतात. 'फुले-आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यिकांचा हाच उद्देश असला पाहिजे. त्याला मने घडवायची आहेत. त्यांच्यात

परिवर्तन घडवून आणायचे आहे. कारण मने तशीच ठेवून कुठलाही समाज बदलता येणार नाही. म्हणून समाज बदलायचा असेल तर प्रथम समाजाचं पारंपारिक मन बदललं पाहिजे आणि त्यासाठी साहित्याहून अधिक प्रभावी असं माध्यम आपल्याकडे दुसरं कुठलंही नाही."[४] राजा ढाले म्हणतात त्याप्रमाणे येथे पारंपरिक मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. मन आणि विचार यांची सांगड ते घालताना दिसतात. ते औचित्यपूर्ण आहे. व्यक्तीला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणे, त्याला ज्ञानसंपन्न बनविणे आणि आपल्या विचारप्रणालीशी प्रामाणिक राहणे हे साहित्याचे कार्य आहे.

फुले-आंबेडकरी साहित्य हे फुले-आंबेडकरांच्या जीवनदृष्टीला, विचारप्रणालीला प्रमाण मानते. या साहित्याचे मूल प्रेरणास्तोत्र महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. जी विचारदृष्टी फुले-आंबेडकरांनी आपल्या जीवनकार्यातून दिली, त्याचा पुरस्कार हे साहित्य करते. स्वाभिमान, स्वत्व, अस्तित्व, मानवतावादी मूल्ये यांची सजवणूक करण्याचे कार्य हे साहित्य करते. या साहित्याने मानवाला जागृतावस्थेकडे आणून अन्याय्याच्या विरोधात संघर्ष करण्यास उदयुक्त केले. फुले-आंबेडकरांनी जे क्रांतीचे बीज रोवले त्याला पुढे घेऊन जाण्याचे कार्य हे साहित्य करीत आहे. फुले-आंबेडकरांनी नवसमाज निर्मितीसाठी जे प्रयत्न केले; त्या प्रयत्नांना अनुसरून साहित्य निर्मिती होणे आणि आदर्शवत परिवर्तन घडवून आणणे हे कार्य करण्याचे उद्दिष्ट उद्याच्या परिप्रेक्ष्यात आपण पाहणे ही आवश्यक आहे.

## २.८ फुले-आंबेडकरी साहित्य: परंपरा

फुले-आंबेडकरी विचार हे एक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाचा पाया महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी निगडित आहे. महात्मा फुल्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाला, गुलामगिरीला विरोध केला; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुलेंपासून प्रेरणा घेत, त्यांना गुरुस्थानी ठेवून समताधिष्ठित व्यवस्थेचा पुरस्कार केला. समतेवर आधारित नवसमाज घडवण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. जातिवस्थेच्या ढोंगीपणावर कडाडून प्रहार केला. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला, ब्राह्मण्याला विरोध दर्शविला; सामाजिक स्वातंत्र्याला महत्त्व देत समाजविकास घडविला हे या तत्त्वज्ञानामागे असलेले दिसते.

मोतीराम कटारे आंबेडकरवादी दृष्टिकोनातून ओबीसी तरुणांच्या भूमिका मांडताना म्हणतात, "मंडलची लढाई जिंकल्यानंतर अनेक ओबीसी तरुण आंबेडकरी विचारधारेकडे आकृष्ठ झालेले आहेत. ते स्वतःला आंबेडकरवादी म्हणवितात. मात्र ते स्वतःला दलित म्हणवून घ्यायला तयार नाहीत. स्वतःला दलित साहित्यिक म्हणविणारे या आंबेडकरवादी ओबीसी तरुणांना आपल्यापासून दूर ढकलणार आहेत काय? ज्या हिंदुत्ववाद्यांनी या ओबीसी तरुणांत आंबेडकरी अनुयायांविषयी द्वेष पोसला तेच आता हिंदुत्ववाद्यांच्या उरावर बसू पाहत आहेत, अशा तरुणांना आंबेडकरी प्रेरणा मान्य करणारे आपल्यात सामावून घेणार नाहीत काय? ओबीसी तरुणांचे हे मतपरिवर्तन विचारधारेच्या आधारे झालेले असून जेव्हा दलित संकल्पना नाकारतात तेव्हा त्यांचा जातीला अपरिहार्यपणे नकार नसतो, दलित साहित्यिकांना गेल्या चाळीस वर्षात जातीय मानसिकतेतून मुक्त होता आलेले नाही. ओबीसी तरुणांना जातीय मानसिकतेतून मुक्त होण्यास काही कालावधी निश्चित द्यावा

लागेल. मात्र सैद्धांतिक पातळीवर ते दलित साहित्यिकांपेक्षा आघाडीवर आहेत, हे नाकारून चालणार नाही."५ त्यांची ही भूमिका फुले-आंबेडकरी विचारप्रणालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. कारण बंधुता, मानवता ही तत्वे या विचार प्रणालीशी निगडित आहेत.

जातीभेद निर्मूलन हे फुले-आंबेडकरी या दोन विचारवंतांचा महत्त्वाचा हेतू होता. जाती नष्ट झाल्यास स्वतःचा आणि समाजाचाही विकास होईल. हा त्यांना विश्वास होता. फुले-आंबेडकरी साहित्य हे सामाजिक समता, सामाजिक न्याय यांची जपणूक करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवते. जातीयता, विषमता अधोरेखित करून त्याविरोधात भाष्य करू पाहते. फुले-आंबेडकरी चळवळीने जी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळ उभी केली ती पुढे नेण्याचे कार्य हे साहित्य करते.

महात्मा फुले यांच्या विचारप्रणालीला अनुसरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही विखुरलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. स्वतःचा विकास स्वतः केला पाहिजे ही शिकवण दिली. तसेच त्यांनी जी मानवतेची चळवळ उभी केली होती या चळवळीत अनेक समूहातील लोकांनी सहभाग घेतला होता. या चळवळींना वैचारिक दिशा देण्यासाठी साहित्य निर्मिती महत्त्वाची ठरते. फुले-आंबेडकर यांच्या समतावादी विचारांशी निगडित साहित्य निर्मिती झाली. या साहित्यातून जीवनाचे अनेक टप्पे जसे मांडले गेले तसेच समाजाच्या अनेक अंगांचे दर्शनही घडविले.

### २.८.१ कथा लेखन:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत असणारे आणि त्यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या अनेकांनी प्रारंभापासून कथा लेखन केले आहे. १९३३ ते १९५८ या काळात 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून फुले-आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन कथा लेखन झालेले आहे. बंधूमाधव हे सातत्याने कथालेखन करीत होते. त्यांची कथा वर्णन, घटना, निवेदन करणारी असून आवाहन करणारी देखील आहे. त्यांची पहिली कथा 'जावे त्यांच्या वंशा' (१९३५) ही आहे. 'बंदा गुलाम', 'नवी वाट, बैत्याचा बैल यांसारख्या कथांमधून त्यांनी गरीब, उपेक्षित वर्गातील माणसाचे चित्रण केले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी साधारणत: १९४९ पासून कथालेखनास आरंभ केलेला दिसतो. आशय, विषयाच्या अनुषंगाने त्यांची कथा इतरांपेक्षा वेगळी आहे. त्यांच्यावर मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा प्रभाव होता. त्यांनी ग्रामीण जीवन पद्धती, मुंबईतील झोपडपट्टीमय वस्त्या आदींचे मार्मिक दर्शन आपल्या कथांमधून घडविले आहे. त्यांचे 'खुळंवाडी' (१९५७), 'बरबाद्या कंजारी' (१९६०), 'भानामती' (१९६२), 'कृष्णाकाठच्या कथा' (१९६४), 'गजाआड' (१९६५), 'भुताचा मळा' (१९७५), 'चिरानगरची भुतं' (१९७८) इत्यादी कथासंग्रह आहेत. उपेक्षितांच्या वाट्याला आलेले दुःख, त्यांची जगण्यासाठीची धडपड, पोटाची भूक भागविण्यासाठी त्यांना करावा लागणारा संघर्ष त्यांच्या 'स्मशानातील सोनं', 'भोमक्या', 'मरीआईचा गाडा', 'कोंबडी चोर', 'सुलतान' इत्यादी कथांमधून आलेला आहे. शंकरराव खरात यांचा 'बारा बलुतेदार' (१९५९) हा पहिला कथासंग्रह आहे. त्यानंतर 'तडिपार' (१९६१), 'सांगवा' (१९६२), 'टिटवीचा फेरा' (१९६३), 'आडगावचं पाणी' (१९७०),

'माझा काय दोष?' (१९९६), 'स्वातंत्र्य कुणाच्या दारी' (१९९९) इत्यादी कथासंग्रह लक्षवेधक आहेत. शंकरराव खरात यांची कथा ही जुन्या-नव्या विचारांचे दर्शन घडविणारी जशी आहे; तशी ती जुन्या- नव्या विचारांचा संघर्ष उभा करणारी ही आहे. तसेच त्यांची कथा भटक्या-विमुक्त, गुन्हेगार ठरविल्या गेलेल्या जातीतील लोकांचे जीवन अधोरेखित करते. तसेच स्वातंत्र्योत्तर बदलणाऱ्या गावांचे चित्रण करून बदलती गाव संस्कृती उभी केली आहे. उदाहरणार्थ, आडगावचं पाणी', 'गावशिव' हे कथासंग्रह यासंदर्भात पाहता येतील.

विद्रोही कथाकार म्हणून बाबूराव बागूल यांना मानले जाते. अन्याय, अत्याचार, विषमता या विषयाची चीड त्यांच्या कथांमधून प्रत्ययास येते. तसेच आत्मभानाचा स्वर त्यांच्या कथेतून स्पष्टपणे प्रकट झालेला आहे. त्यांचे 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३), 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) हे कथासंग्रह आहेत. बाबुराव बागूल यांच्या कथांमधून शोषित माणसाचे बहुमुखी दुःख रेखाटले गेले आहे. त्यांच्या 'भूक', 'गुंड', 'आई', 'सक्तमजुरी', 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथा अनेक केंद्रानुवर्ती आहेत. समाजव्यवस्थेतील शोषण व्यवस्थेचे दर्शन घडवून मुक्तीचा लढा स्वीकारला गेला पाहिजे, हे वैचारिकत्त्व वाचकाच्या मनात निर्माण करणारे आहे.

वामन होवाळ यांच्या 'येळकोट' (१९८२), 'वारसदार' (१९८६) इत्यादी कथासंग्रहातून ग्रामीण, शहरी जीवनातील वास्तव अधोरेखित केले आहे. तसेच योगिराज वाघमारे यांच्या 'उद्रेक' (१९७८), 'बेगड' (१९८०), 'गुडदाणी' (१९८३) हे कथासंग्रह उपेक्षित माणूस, समाज बांधिलकी, आत्मशोध अत्यंत प्रभावीपणे रेखाटतात. अर्जुन डांगळे यांनी उपेक्षित समाजाच्या रोजच्या प्रश्नांचा शोध कथेतून घेतला आहे. 'बांधावरची माणसं' (१९८१) या कथासंग्रहातून गाव, गावकी, अन्याय, अत्याचार, सवर्णाकडूंन उपेक्षितांची होणारी पिळवणूक आदीचे चित्रण करतात.

उर्मिला पवार यांचे 'सहावे बोट' (१९८८), 'चौथी भिंत' (१९९०) या कथासंग्रहातील कथांमधून उपेक्षित स्त्रीचे व्यक्तिचित्रण जसे आले आहे, तसेच उपेक्षित स्त्रीला आत्मभान प्राप्त व्हावे, तिला माणूस म्हणून जगता यावे या विषयाचे चित्रण येते. भीमसेन देठे यांच्या 'गिऱ्हाणा' (१९८८) या कथासंग्रहात शिक्षित समाज, त्याची मानसिकता, त्यांच्यात होणारे स्थित्यंतर उपरोधिक शैलीत मांडले आहे. अविनाश डोळस यांचा 'महासंगर' (१९८३) हा कथासंग्रह दलित पँथर चळवळीच्या प्रभावाचा ठसा उमटवणारा आहे. गौतमीपुत्र कांबळे यांचा 'परिव्राजक' (२००५), अमिताभ यांचा पड हे कथासंग्रह आंबेडकरी तत्वज्ञानाचे दर्शन घडविणारा आहेत.

### २.८.२ कादंबरी लेखन:

भारतीय समाजव्यवस्था ही प्राचीन काळापासून चातुर्वर्ण्याधिष्टीत आहे. पेशवाई कालखंडापर्यंत उपेक्षित वर्गाचे सर्व प्रकारचे शोषण होत होते. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या वर्गाने या शोषणाला नकार दिला. आणि आपल्या वर्गाला अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यास बळही दिले. शोषणाचे प्राचीनत्व अनेक लेखकांनी आपल्या कादंबरीतून चित्रित केले. उदाहरणार्थ, 'पोखरण', 'सूड' या कादंबऱ्या यासंदर्भात पाहता येतील.

अण्णाभाऊ साठे शंकरराव खरात, केशव मेश्राम, नामदेव कांबळे, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, उत्तम बंडू तुपे, लक्ष्मण गायकवाड, बी. रंगराव, भीमसेन देठे आदींनी आपल्या कादंबरीलेखनातून समाजातील शोषण, अन्याय्य वागणूक याविषयीचे लेखन केले आहे. अण्णाभाऊ साठे उपेक्षित माणसाच्या जीवनाचे त्याच्या कथा-वेदनांचे चित्र आपल्या कादंबरी लेखनात करतात. उदा. 'फकीरा', 'वैर', 'अलगूज', 'कुरूप', 'रानबोका' इत्यादी. त्यांनी ग्रामीण अनुभवविश्व आणि उपेक्षित वर्गाचे जीवन यांची सांगड आपल्या कादंबरी लेखनात घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. शंकरराव खरात यांनी 'माणुसकीची हाक', 'हातभट्टी', 'झोपडपट्टी',' गावचा टिनपोल गुरुजी', 'पारधी', 'बन्याची दिंडी' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ते साधारणत: शहरी स्थलावकाशातील बकाल वस्त्यांमध्ये राहणारा समूह आणि त्याचे जगणे आपल्या लेखनातून दर्शवितात. 'झोपडपट्टी', 'हातभट्टी', 'फुटपाथ नं.१' या कादंबऱ्या झोपडपट्टीतील भीषण वास्तवता वाचकासमोर ठेवतात.

'पोखरण', 'हकिकत', 'जटायू' या कादंबऱ्या लिहिणारे केशव मेश्राम एक महत्त्वपूर्ण कादंबरीकार आहेत. त्यांची 'पोखरण' ही कादंबरी प्राचीन कालापासूनच्या शोषणव्यवस्थेचे दर्शन घडविते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक स्तरावरील विषमतेचे चित्रण ते जसे करतात तसेच ते माणूस म्हणून आपला जगण्याचा हक्क आहे, याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतात. बाबूराव बागूल यांनी समाजाला एक नवी दृष्टी, नवी दिशा दिली, त्यांची 'सूड' ही लघुकादंबरी 'काल'च्या जीवनापासूनचे दुःख ते 'आज'च्या अवकाशातील आपले जगणे आणि त्यातून सुखाचा मार्ग शोधण्याचा प्रवास कसा सुरू झाला आहे. या विषयीचे चिंतन घडविते. तसेच नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळी', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र', नामदेव कांबळे यांची 'राघववेळ', योगेंद्र मेश्राम यांची 'माझ गाव कुठाय?', विजय शिरसाट यांची 'कुस्ती' या कादंबऱ्या काल, आज आणि उद्याच्या अवकाशातील उपेक्षितांचे जीवन कसे आहे आणि कसे असावे याविषयीचे दर्शन घडवितात. माधव कोंडविलकर यांच्या 'अनाथ', 'अजून उजाडायचं आहे', 'छेद' या कादंबरीमधून उपेक्षितांचे वास्तवजीवन चित्रित केले आहे. माई तांबे यांची 'नियती' ही कादंबरी कोकणातील उपेक्षित वर्गाच्या जीवनाचा वेध घेते. भीमसेन देठ यांची 'चक्री' ही कादंबरी १९९४ च्या जळगाव वासनाकांडातील स्त्रियांचे हलाखीचे, त्यांच्या उद्ध्वस्त होण्याचे दर्शन घडविते. एकूणच फुले-आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेले कादंबरी लेखन हे रंजनवादाच्यापलीकडे जाऊन वास्तवपूर्ण असे जीवन साकारण्याचा प्रयत्न करणारे आहे. तसेच परंपरानिहाय वाट्याला आलेल्या जीवनाचा वेध घेत वर्तमानातील दुःखाकडून भविष्यातील सुखाचा शोध घेऊ पाहणारे आहे.

### २.८.३ काव्यलेखन:

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होत आणि जाणीवपूर्वक सामाजिक स्थितीगती, धर्म- समाजव्यवस्था याबरोबरच परिवर्तनाची भूमिका घेऊन फुले-आंबेडकरी कविता पुढे आली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तरकालीन कवींनी आपल्या कवितेतून सामाजिक जीवन, अन्याय, अत्याचार, अधोरेखित केले आहे. १९६० ते १९८० या काळातील केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, वामन निंबाळकर, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, चंद्रशेखर मलकपट्टे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, आदी कवींनी

समाजवास्तव मांडले आहे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतील जीवनाचे दर्शन त्यांनी कवितेमधून घडविले आहे.

आपल्या समाजाची परंपरागत स्थिती कवींनी कवितेतून मांडली आहे. वामन निंबाळकर 'गावकुसाबाहेरील कविता' या काव्यसंग्रहात उपेक्षितांच्या वाट्याला जे हलाखीचे, दारिद्र्याचे, दुःखाचे जीवन आले ते त्यांनी कवितेतून व्यक्त केले आहे.

**उदाहरणार्थ,**

‘अंधार पचवुनी अवघा

दुःखाचे ओझे पाठी

त्या गावकुसाबाहेरी

ते जगती दुसऱ्यांसाठी’

(माय, वामन निंबाळकर)

दुःखाला वाचा फोडणे, समाजव्यवस्थेला नकार देत बंड पुकारणे, विद्रोहाचे रुप स्वीकारणे ही भूमिका अनेक कवींनी घेतलेली दिसते.

**उदाहरणार्थ,**

‘ज्यांनी इथल्या सूर्याला, दगडांनाही

ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले

संचित निश्चित केले

त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो.

ते सर्व देवदैवत माझे वैरी आहेत

ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली.

ते शब्द प्रामाण्यवादी सगुणनिर्गुण वैरी आहेत माझे

ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही.’

(वैरी, यशवंत मनोहर)

स्त्रीवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे विस्तृत चित्रण हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मलिका अमर शेख, उर्मिला पवार, संध्या रंगारी, प्रज्ञा दया पवार, उषा अंभोरे, कविता मोरवणकर, आशालता कांबळे आदी कवयित्रीने केलेले आहे. स्त्रीच्या शोषणाच्या विविध तऱ्हा समर्थपणे या कवयित्रीनी मांडल्या आहेत. जात समाज, संस्कृती यांचा या कवयित्री धिक्कार करताना दिसतात.

**उदाहरणार्थ,**

'या देशाच्या महान संस्कृती.
तुला कोपरापासून नमस्कार....!
जगातील अतिप्राचीन नि उच्च संस्कृती म्हणून
तुला अभिवादन करायला नाही विसरलो
पण आज पाठ्यपुस्तकातल्या
खोट्या वर्णनांची चीड येते
नि तुला आई म्हणताना आम्हाला लाज वाटते.
तू आई  असलीस तरी
आमच्याशी केलेस सावत्रपणाचे विषम राजकारण...
हे संस्कृती आमचं माणूसपण तू पिंजून पिंजून काढलेस
ज्वालामुखीचा नांगर आमच्या घरादारावर फिरवलास.
आम्ही राख राख झालो, बेचिराख झालो.'

(संस्कृती- हिरा बनसोडे)

१९८० नंतरची कविता सामाजिक भान, अंतर्मुखता, मानवी मूल्यांचा उद्घोष, आशयघन प्रतिमा आणि अर्थाचे सूचन करणारी आहे. अरुण काळे यांचे 'रॉकगार्डन' (१९९३), 'सायरनचे शहर' (१९९७), 'नंतर आलेले लोक' (२००६), 'ग्लोबलचं गावकुस' (२००८) हे चार कविता संग्रह आहेत. आधुनिकीकरण, जागतिकीकरणाचा वेध घेत सामान्य, गरीब वंचितांचे जीवन अधोरेखित करतात. लोकनाथ यशवंत यांचे 'आता होऊन जाऊ द्या' (१९८९), 'शेवटी काय झाले' (१९९६), 'पुन्हा चाल करू या' (२००९) या संग्रहातून काल आणि आजच्या परिप्रेक्ष्यातील उपेक्षितांचे जीवन, त्यांचे शोषण यांचा परामर्श घेणारे आहे. कवितेची आशयाभिव्यक्ती, तिचे शीर्षक या अनुषंगाने केलेले प्रयोग लक्ष वेधून घेणारे आहेत. उदाहरणार्थ, उत्तम अंभोरे यांचा 'पत्ता बदलत जाणारा गणीम' (२०००) हा काव्यसंग्रह, उत्तम कांबळे यांचा 'जागतिकीकरणात माझी कविता (२००६) हा काव्यसंग्रह नव्या काळासोबत येणारी नवी आव्हाने समोर ठेवणारा आहे. पारंपरिक मराठी कवितेतील चाकोरीबद्ध अनुभवविश्व नाकारून फुले-आंबेडकरी कवितेने प्रभावीपणे समूहाचे प्रत्ययकारी जीवनदर्शन घडविले, हे तिचे वेगळेपण म्हणून येथे नोंदविता येईल.

### २.८.४ नाट्यलेखन:

नाटकात संघर्ष हा एक अविभाज्य घटक असतो. स्व आणि स्वेतर समाजातील शोषकांशी चाललेला संघर्ष नाटकामध्ये व्यक्त झालेला असतो. सर्वसामान्यांचे शोषण करणाऱ्या

ब्राहमण्यप्रवृत्तीच्या व्यक्ती अधिक आहेत हे काही नाटकामधून व्यक्त झाले आहे. उदा. 'काळोखाच्या गर्भात', 'झुंबर', 'वाटा-पळवाटा', 'खेळीया', 'किरवंत', 'आम्ही देशाचे मारेकरी' इत्यादी. ब्राहमणी कसब खोडून काढणे कसे आवश्यक आहे, हे पात्राच्या माध्यमातून जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न नाटककार करतात. सावकार, मालक, सरंजामी पाटील याच्यासारखे सत्तारूढ आणि आर्थिक सुबत्ता असलेले लोक वर्षानुवर्ष सर्वसामान्याना गुलामी करण्यास भाग पाडतात आणि तेच त्याचे शोषक आणि शोषणकर्ता असतात. या सर्व व्यवस्थेमध्ये माणूस 'माणूसपण' हरवत चाललेला दिसतो. त्यामुळे एकूणच, जगावं कसं? हा प्रश्न गरीबांसमोर उभा असलेला दिसतो. उदा. 'तनमाजोरी', 'कारान', 'अकींचन' इत्यादी नाटकातून याचा प्रत्यय येतो.

१९८० नंतरच्या काळात नाटकांनी पारंपरिकतेपेक्षा वेगळी वाट स्वीकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. जसे 'जय जय रघुवीर समर्थ '(१९८६), 'पांढरा बुधवार' (१९९५), 'गांधी आंबेडकर' (प्रेमानंद गज्वी); 'कोण म्हणत टक्का दिला' (संजय पवार); 'दोन अंकी नाटक' (रामनाथ चव्हाण); 'वाटा-पळवाटा '(१९९१), 'खेळीया'(१९८२) (दत्ता भगत) यासारख्या नाटकांमधून पात्रांच्या मानसिकतेचे भडक चित्रण नाकारून त्यांच्या मानसिकतेतील अंतर्विरोध, तर्कविसंगतता, आपमतलबीवृत्ती, विषमताधिष्ठित मन या नाटकांमधून व्यक्त केलेले दिसते. त्याचा सकारात्मक एक परिणाम म्हणजे सवर्ण प्रेक्षकांना स्वत:च्या मानसिकतेचे पुनरावलोकन करण्यास, चिंतन करण्यास प्रवृत्त करते. ही नाटके ज्याप्रकारे सवर्णाची मानसिकता अधोरेखित करतात. तसेच 'प्रकाशपुत्र' (१९९२), 'जाता नाही जात' (२००७), या नाटकांमधून स्वतःची जात लपविणारे लोकांचे चित्रण नाटकातून होताना दिसते. यासारख्या नाटकांमधून नाटककार आत्मविश्लेषण, आत्मपरीक्षण आणि मानवेतर आधारित व्यापक विचार यावर लक्ष केंद्रित करू पाहताना दिसतात.

### २.८.५ वैचारिक साहित्य-समीक्षा:

मराठी वैचारिक साहित्याला एक दीर्घ परंपरा आहे. या परंपरेत फुले-आंबेडकरी साहित्यातील वैचारिक साहित्याने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून वैचारिकता, तत्वज्ञान, जीवनोपयुक्त असे विचार व्यक्त झालेले आहेत. महात्मा फुले यांचे 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड, 'ब्राह्मणांचे कसब' हे लेखन फुले-आंबेडकरी चळवळीला वैचारिक दिशा देणारे ठरले. 'हू वेअर द शुद्राज', 'दी अनटचेबल्स' हे डॉ.आंबेडकरांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आणि 'मूकनायक', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' ही नियतकालिके वैचारिक दृष्टीने लेखन करणारे साहित्य म्हणून महत्त्वाचे आहे. तसेच विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'भारतीय अस्पृश्यता', डॉ. सदा कऱ्हाडे यांचा बुद्धवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, सुनील सोनवणे यांचा आंबेडकरी साहित्य आणि तत्वज्ञान, यशवंत मनोहर यांची आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य', 'आंबेडकरी आस्वादक समीक्षा'; रा. ग. जाधव यांचा 'निळी पहाट', निळी क्षितीजे आदी ग्रंथसंपदा वैचारिक दृष्टिकोनातून निर्माण झालेली दिसते. त्यातून सिद्धांतने, वैचारिक भूमिका, साहित्य संकल्पना, विचारतत्वे सुस्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अनेक समीक्षकांनी अनेक समीक्षाग्रंथ लिहून फुले-आंबेडकरी साहित्यसमीक्षेत मोलाची भर घातलेली आहे. केशव मेश्राम यांचे 'शब्दांगण', 'समन्वय', शब्दव्रत; डॉ. यशवंत मनोहर

यांचे 'स्वाद आणि चिकित्सा, समाज आणि साहित्यसमीक्षा; दत्ता भगत यांचे निळी वाटचाल; वामन निंबाळकर यांचे साठोत्तरी मराठी कवितेत आंबेडकरदर्शन, हरीश खंडेराव यांचे आंबेडकरवादी साहित्याचा दृष्टिकोन आणि दायित्व, मोतीराम कटारे यांचे फुले-आंबेडकरी साहित्य: आकलन आणि आस्वाद, फुले आंबेडकरी चळवळ आणि साहित्य चिंतन, फुले-आंबेडकर प्रेरणेचे नवे कवी: नवे आकलन आणि आस्वाद, अनिलकुमार सुपडू पगारे यांचे फुले आंबेडकरी साहित्य : विचारवेध, अविनाश डोळस यांचे आंबेडकरी विचार आणि साहित्य, डॉ. गंगाधर पानतावणे यांचे आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, टी.पी.तथा भाऊसाहेब आडसूळ यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य, डॉ.भालचंद्र नेमाडे यांचे फुले-आंबेडकर: शोध आणि बोध, प्र. श्री.नेरूरकर यांचे फुले-आंबेडकर दलित साहित्य, श्रीराम गुंदेकर यांचे महात्मा ज्योतिबा फुले: विचार आणि वाङ्मय आदि समीक्षकांनी लिहिलेली समीक्षा ही फुले-आंबेडकरी चळवळ आणि साहित्य यांचा सांधा बांधण्याचा प्रयत्न करणारी आहे. एकूणच, साहित्य विचार आणि समीक्षा ही फुले-आंबेडकरी साहित्यात महत्त्वपूर्ण मोलाची भर घालणारी आहे.

## २.९ फुले-आंबेडकरी साहित्याची वैशिष्ट्ये

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या त्रिसूत्री बरोबरच प्रज्ञा, करुणा, शील या तत्वत्रयीचा ठसा फुले–आंबेडकरी साहित्यात उमटलेला दिसतो.

२) वेदना, विद्रोह, नकार, विज्ञाननिष्ठा, मानवता यांचा पुरस्कार फुले–आंबेडकरी साहित्याने केलेला आहे.

३) फुले–आंबेडकरी साहित्य हे वास्तववादी आहे. ते पारंपरिक मूल्यव्यवस्थेला नकार देते.

४) फुले–आंबेडकरी साहित्य महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिवर्तनवादी विचारांवर विश्वास ठेवणारे आहे. आणि समाजपरिवर्तन व्हावे हा आशावाद बाळगत समतेचा पुरस्कार करणारे आहे.

५) फुले-आंबेडकर विचार हा या साहित्य निर्मिती प्रेरणास्तोत्र आहे. तसेच हे साहित्य फुले-आंबेडकर यांची मूल्ये, जाणीवा यांचे परिमाण आहे.

६) फुले-आंबेडकरवादी साहित्याचा केंद्रबिंदू व्यक्ती, व्यक्तीविकास, समूहविकास आहे. हे साहित्य सामाजिक प्रबोधन, नीतिमूल्ये, यांचा आग्रह करते.

७) फुले-आंबेडकर यांच्या प्रेरणेवर, तत्वांवर, विचारांवर हे साहित्य भर देते. आणि मानवी मूल्यांच्या उत्कर्षासाठी हे साहित्य कार्य करते.

८) फुले-आंबेडकरांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विषयक दिलेली अमूल्य विचारधारा जपणे आणि वाचकांचे त्याकडे लक्ष वेधणे ही प्रेरणा या लेखनामागे असलेली दिसते.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- फुले आंबेडकरवादी साहित्याच्या प्रेरणा कोणत्या सविस्तर स्पष्ट करा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

## २.१० समारोप

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून वैचारिकता, तत्वज्ञान, जीवनोपयुक्त असे विचार व्यक्त झालेले आहेत. महात्मा फुले यांचे 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड, 'ब्राह्मणांचे कसब' हे लेखन या चळवळीला वैचारिक दिशा देणारे ठरले. तसेच 'हू वेअर द शुद्राज', 'दी अनटचेबल्स' हे डॉ.आंबेडकरांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आणि ‘मूकनायक’, ‘जनता’, ‘प्रबुद्ध भारत’ ही नियतकालिके वैचारिक दृष्टीने लेखन करणारे साहित्य म्हणून महत्त्वाचे आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका-तत्त्वज्ञान आदी संदर्भयूक्ततेने फुले–आंबेडकरी साहित्य आकारास आलेले आहे. फुले-आंबेडकरी साहित्य हे विज्ञानाचा पुरस्कार करते आणि परिवर्तनाची भूमिका स्वीकारते. जात-वर्ण-वर्ग विरहित समाजरचना आणि समानता या साहित्याला अभिप्रेत आहे.

## २.११ नमुना प्रश्न

१. फुले-आंबेडकरवादी साहित्य निर्मितीचे स्वरूप लिहा

२. फुले-आंबेडकरवादी साहित्यप्रेरणा स्पष्ट करा.

३. फुले-आंबेडकरवादी साहित्याची परंपरा सोदाहरण स्पष्ट करा.

४. फुले-आंबेडकरवादी वैचारिक साहित्य-समीक्षेचा परिचय करून द्या.

## २.१२ संदर्भ


- ढाले राजा, एकविसावा अस्मितादर्श साहित्यिक मेळावा, अध्यक्षीय भाषण, पुणे, २७-२८ मे पुणे, १९९५, पृ.१४
- रत्नाकर धम्मपाल (संपादक) फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य, दलित नामांतराचा वाद, सुगावा प्रकाशन, पुणे १९९७, पृ.१००
- पवार दया पवार आणि इतर (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३, पृ.२४

- ढाले राजा, एकविसावा अस्मितादर्श साहित्यिक मेळावा, अध्यक्षिय भाषण, पुणे,२७-२८ मे, पुणे, १९९५, पृ.४०- ४१
- कटारे मोतीराम, मूल्यशोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०००, पृ. ८६-८७


## २.१३ अधिक वाचन

- फुले-आंबेडकरी साहित्य: आकलन आणि आस्वाद - मोतीराम कटारे
- फुले आंबेडकरी चळवळ आणि साहित्य चिंतन - मोतीराम कटारे
- फुले आंबेडकरी साहित्य: विचारवेध - अनिलकुमार सुपडू पगारे
- फुले-आंबेडकर प्रेरणेचे नवे कवी: नवे आकलन आणि आस्वाद - मोतीराम कटारे
- महात्मा ज्योतिबा फुले: विचार आणि वाड्मय - श्रीराम गुंदेकर.

*****

# ३

# कादंबरी : 'विषवृक्षाच्या मुळ्या' - वासुदेव मुलाटे

**घटक रचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ वासुदेव मुलाटे यांचे साहित्यलेखन

३.३ 'विषवृक्षाच्या मुळ्या'

  ३.३.१ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे समकालीन वास्तव

  ३.३.२ वासुदेव मुलाटे यांच्या कादंबरीलेखनाच्या प्रेरणा

  ३.३.३ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे कथानक

  ३.३.४ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा आशय

  ३.३.५ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा नायक - विश्वनाथ तरटे

  ३.३.६ 'विषवृक्षाच्या मुळया' या कादंबरीची भाषा व शैली

३.४ समारोप

३.५ नमुना प्रश्न

३.६ संदर्भ


## ३.० उद्दिष्टे

वासुदेव मुलाटे यांच्या कादंबरीचे फुले-आंबेडकरी साहित्य स्वरूप समजून घेणे.

- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे कथानक अभ्यासणे.
- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा आशयबंध अभ्यासणे.
- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीची भाषा व शैली अभ्यासणे.
- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतील घटनाप्रसंग अभ्यासणे.
- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतील संवेदनशील नायक विश्वनाथ.
- 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीच्या समकालीन वास्तवाचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो, घटक १ व २ मध्ये कादंबरी साहित्य प्रकाराची माहिती करून घेतली. तसेच फुले-आंबेडकरवादी साहित्याची वैशिष्ट्येही अभ्यासली. कोणत्याही भेदाभेदांशीवाय माणसाच्या माणूसपणाला महत्त्व देणारा फुले -शाहू-आंबेडकर यांचा विचार सर्वच आधुनिक

मराठी साहित्याचा पाया आहे. वासुदेव मुलाटे यांच्या 'विशवृक्षाच्या मुळया' या कादंबरीतील समाज समजून घेताना फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा अभ्यास करावा लागतो तसेच ग्रामीण संस्कृतीचाही अभ्यास  करणे गरजेचे आहे. यांचे कारण ग्रामीण आणि शहरी  असा मोठा भेद आहे या भेदाचेही चित्रण या कादंबरीतून होते. फुले-आंबेडकरी साहित्याचा विचार पेरणारी ही कादंबरी ग्रामीण  व शहरी आशा दोन्ही स्तरावर घडत असते त्यामुळे या दोन वेगळ्या वतावरणाचाही  विचार ही कादंबरी अभासताना करावा लागतो.

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. साहित्यात जे जे उमटते ते सारे समाजातून अभिव्यक्त झालेले असते. समाजातील घटनांचे वास्तव चित्रण साहित्यातून लेखक मांडत असतो. माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा या व्यतिरिक्त अनेकविध गोष्टींसाठी माणूस सतत प्रयत्न करत असतो. माणूस हा समाजप्रधान प्राणी आहे. समाजाची निर्मिती व त्याबरोबर माणसानेच निर्माण केलेल्या अनेक धर्म, प्रथा, परंपरा, पद्धती, चालीरीती यांचा प्रभाव त्याच्या जीवनावर तसेच समूहजीवनावर पडत असतो. साहित्याचा अभ्यास म्हणजेच समाजातील अनेकविध घटना ज्या साहित्यात उमटल्या आहेत त्याचा अभ्यास असतो. एका अर्थी साहित्याचा अभ्यास म्हणजेच समाजाचा अभ्यास असतो. समाज हा काळच्या प्रवाहात सतत बदलत असतो. माणसाच्या जगण्याचे आयाम काळानुसारी बदलत राहीलेले आहेत. परिवर्तन हाच नियम आहे. त्यामुसार समाज सतत बदलत असतो. या बदलत्या स्वरूपांचा अभ्यास साहित्यात उमटलेल्या साधनातून करणे म्हणजे एका अर्थी मानवी इतिहास समजून घेणे व मानवी समूहाची बदलती रूप समजून घेणे असते. या प्रवाहात अनेक 'वाद' म्हणजेच विचारसरणी जन्म घेतात. माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यावर त्याला स्वभावधर्मानुसार संचय करण्याची वृत्ती असते त्यातून सत्ता संघर्ष निर्माण होतात. शोषक व शोषित असे दोन गट निर्माण होतात, तर कधी आतले आणि बाहेरचे असा वर्तुळातचा वाद निर्माण होतो. शोषक गट हा कोणत्या ना कोणत्या प्रकारे अधिक बलवान असतो व तसा तो बनवला गेला असतो त्यासाठी धर्माचा, चालीरीतीचा वापर करून इतर गटाला गुलाम बनविले जाते तर कधी बळाचा वापर होताना दिसतो. सहनशक्तीची परिसीमा अथवा आत्मभान असे म्हणून शकतो पण यातून निर्माण झालेली ऊर्जा शोषित गटाला विरोध व विद्रोह करण्याचे बळ देते. हा विद्रोह असतो तो त्यांना गुलाम बनविणाऱ्या संकल्पना अथवा चालीरीतींविरुद्धचा! हा विद्रोह असतो जगण्याच्या व अस्तित्वाच्या धडपडीतून निर्माण झालेल्या मानवी मनाचा! जगण्याचा हक्क सगळ्यांना समान आहे हे दाखवणारा, स्वत:च्या न्याय व हक्काची मागणी करणारा, स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा, गुलामगिरीतून मुक्तता करणारा! माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्रत्येकाला आहे हे तत्वज्ञान घेऊन एक असाच एक लढा उभा राहीला – ज्याने प्रत्येकाला माणूस म्हणून त्याची ओळख मिळवून दिली. समाजातील उपेक्षित घटकांचा हा लढा ज्याची मांडणी फुले- शाहू-आंबेडकर यांच्या तत्वज्ञानावर अथवा विचारांवर आधारलेली आहे. या चळवळीला मानवतावादी विचारांची कास आहे. आणि हेच समाजातील बदल साहित्यातून टिपले गेले. या साहित्याला  'फुले-आंबेडकरवादी साहित्य' म्हणून ओळखले जाते. बहुजन समाजातील जनतेला माणूस म्हणून जगण्याचे हक्क मिळवून देणारे, देव कल्पना नाकारणारे व त्याबरोबर निर्माण झालेल्या पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, पुनर्जन्म यासारख्या संकल्पना मोडीत काढत केवळ माणसाच्या भौतिक

अस्तित्वाला महत्त्व देणारे हे तत्वज्ञान आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व ह्याचा पुरस्कार करणारा हा विचार आहे. बुद्धीप्रामाण्यवादाचा पुरस्कार केलेला दिसतो.

वर्ण भेदाचे जातिभेदांत झालेले रूपांतर व त्यातून निर्माण झालेल्या स्पृश्य-अस्पृश्यतेच्या चालीरीती यामुळे समाजाचे स्वास्थ्य पूर्णत: बिघडले होते. शूद्र  अथवा अस्पृश्य मानली गेलेले गट माणूस म्हणून जगण्यासाठी लढा देत असताना फुले - शाहू - आंबेडकर या विचारवंतांनी अभारलेल्या माणसाला व त्याच्या जगण्याला महत्त्व देणाऱ्या तत्वज्ञानाला आत्मसात करत वाटचाल करत राहीले. या जगण्यातून व अनुभवातून जे जे काही आले ते सारे साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला दिसतो. साहित्याचा अभ्यासातून समाज समजून घेणे व त्यांचे विविध आयामाला स्पर्श  करणे शक्य  होते. फुले-आंबेडकरी विचारातून निर्माण झालेलली आत्मसन्मानाची जाणीव, माणसाला प्रतिष्ठा देणारा विचार रूजला. म्हणूनच अनेक वर्षांपासून शिक्षणापासून वंचित राहीलेला समाजगट आपल्या पारंपरिक बलुतेदारी पद्धतीचा व व्यवसायाचा त्याग करून शिक्षण  घेऊ लागला. त्याला आत्मशोध  घ्यावासा वाटू लागला. व्यक्त व्हावेसे वाटू लागले, परंपरेतील आपले स्थान समजून घेण्यासाठी तो साहित्यातून व्यक्त झाला. यामागे ज्या जाणिवा आहेत त्यात माणूस म्हणून वागवले न जाण्याची वेदना, आत्मसन्मानाची मागणी, आत्मशोधाची कास, आत्मसन्मानाच्या आड येणाऱ्या परंपरेला व धर्माला नकार, व त्या विरुद्धचा विद्रोह आहे. विचारवंत राजा ढाले म्हणतात, "एका बंदिस्त समाजरचनेतून आणि एका सांस्कृतिक व्यूहातून ती समाजरचना व तो सांस्कृतिक बंध तोडून फोडून बाहेर पडणारा समाज आणि तातडीचे ते बंध तोडून फोडून बाहेर पडणार समाज आणि त्याआधीच ते बंध झुगारून बाहेर पडलेला समाज यांच्यात एकवाक्यता असेल, कारण त्यांची दु :खेच समान असतील तर ईपस्तीतेही समान असतील.  म्हणून जो जो समाजरचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरुद्ध लढणारा दृष्टिकोण घेऊन साहित्यनिर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणील, तो दलित साहित्यिक असेल आणि त्यांचे साहित्य हे दलितांच्या दृष्टीकोनातून लिहिलेले दलित साहित्य असेल यांचा अर्थ दलित साहित्याच्या मागे दलित जाणीव आहे. या दलित जाणिवेला  समाजव्यवस्था पाहिजे आणि ही व्यवस्था मूल्य अधिष्ठित आहे. जाती-वर्ग-वर्ण यांचा अंत या व्यवस्थेला अभिप्रेत आहे."

याचाच अर्थ जे जे भेदाभेदारीत साहित्य आहे अथवा भेदांवर टीका करणारे साहित्य आहे ते सारे फुले-आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झालेले आहे. "आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे, प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत:भोवतींच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य." अशी व्ययख्या प्रा. दत्ता भगत यांनी केलेली आहे. या साहित्याचे विशेष म्हणजे फुले आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान, आत्मशोधाची जाणीव, सामाजिक गुलामगिरीला नकार, आत्मशोधाचे तीव्र व उत्कट प्रकटीकरण! 'एक माणूस-एक मूल्य' या सिद्धांताचा स्वीकार केल्यामुळे जगण्याचा दृष्टीकोन बदललेले व या बदलातून व्यक्त झालेले हे साहित्य आहे.

१९४५ नंतरच्या काळात मराठी साहित्यविश्वात झालेल्या परिवर्तनाने साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. अनेक सामाजिक, वैचारिक चळवळीतून समाज बदललेला दिसतो. या बदललेल्या जाणिवांचा परिपाक म्हणजे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी हे

साहित्यप्रवाह होत. स्वातंत्र प्राप्तीनंतरच्या काळातील पिढीने आपले जीवनानुभव मांडायला सुरुवात केली. त्यांचे प्रश्न, त्यांच्या भाव-भावना, सुख- दु:खे समाजाला समजावीत म्हणून त्यांनी लिहायला सुरुवात केली. दलित साहित्याच्या मागोमागच ग्रामीण साहित्याची चळवळ उभी राहीली. शहरी मध्यमवर्गीय, पांढरपेशा उच्चवर्णीय समाज म्हणजेच एकूण मराठी समाज नाही. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि या देशातील बहुसंख्य जनता ही खेड्यांपाड्यातून, दऱ्याखोऱ्यातून आणि रानावनातून राहते. व यांचे प्रश्न वेगळे आहेत. याकडे महात्मा फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानी शेतकरी आहे. त्याला आत्मभान येण्याची गरज आहे हा विचार म. फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून परखडपणे मांडला. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या तत्वज्ञानाचा समन्वय साधून संपूर्ण समाजाची पुनर्मांडणी ग्रामीण साहित्य चळवळ करू इच्छिते. ही चळवळ स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्टा लोकशाही आणि मानवता या मूल्यांचे जतन करते. ग्रामीण या संकल्पनेबाबत मुलाटे लिहीतात, “ग्रामीण संकल्पनेत ग्रामीण जीवन अपेक्षित आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, वागणे, रहाणे, आचार-विचार, दृष्टिकोण, भाव-भावना यांना महत्त्व आहे... मनातील आंदोलने, ताण-तणाव, जीवणविष्यक दृष्टी, आचार-विचार, निसर्ग, वातावरण, परिस्थिती यातून त्याच्या काही वैशिष्टपूर्ण जाणिवा निर्माण झालेल्या आसतात. या जाणिवाच ग्रामीण या संकल्पनेत सर्वात अधिक महत्त्वाच्या आहेत.” (डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य: स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ २९) ग्रामीण संकल्पनेची इतकी नेमकी व्याख्या इतरत्र दिसत नाही.

ग्रामीण साहित्याचा उल्लेख 'ज्ञानपद साहित्य' असाही केला जातो. त्याचा शब्दश; अर्थ या देशातील जनसामान्यांमधील साहित्य असा होतो. ग्रामीण साहित्य असा वेगळा साहित्यप्रकार नाही तो एक वेगळा असा साहित्य प्रवाह मानता येईल. ग्रामीण विभागाशी संबंधित असे जीवनानुभव ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतात. ग्राम म्हणजे खेडेगाव तेथील जीवनपध्दती तेथील समाज, त्या समाजाची कृषीप्रधान संस्कृती, त्यांची भाषा, तेथील विशिष्ट निसर्गाशी, मातीशी त्यांचा असलेला वैशिष्टयपूर्ण संबंध, त्या संस्कृतीला लाभलेली इतर वैशिष्टे, तेथील मानवी जीवनाला त्या प्रदेशानुसार लाभलेली आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानात्मक औद्योगिक वैशिष्टये आणि त्यांच्याशी संबंधीत प्रश्न व समस्या तसेच कालौघात होत जाणा-या स्थित्यंतराचे तेथील जीवनसंस्कृतीवर होणारे संस्कार यांचा आविष्कर ग्रामीण साहित्यात होत असतो.

ग्रामनिष्ठ समाज संस्कृतीवर आधारलेले साहित्य आहे. ग्रामीण माणसाचे निसर्गाशी असलेले अतूट नाते या साहित्यातून व्यक्त होताना दिसते. बदलत्या ग्राम जीवनाचा शोध या साहित्यातून घेतलेला वाचकाला दिसून येतो. विविध धर्म, संप्रदाय, जाती एकत्र राहतात त्यामुळे ही संस्कृती सर्व समावेशक आहे. जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर मोठा परीणाम झाला यांचे कितरण ग्रामीण साहित्यातून दिसते. तसेच तेथील राजकारण आणि समाजाचे चित्रण स्पष्टपणे केलेल दिसते. माणूस हा याही साहित्याचा केक्सद्रबिंदू आहे त्यामुळे माणसाच्या भाव -भावनांचा आलेख इथे चितारलेला दिसतो. सामाजिक बांधिलकी व्यक्त करणारे साहित्य म्हणून ग्रामीण साहित्यांची ओळख आहे. ग्रामीण माणसांची डू:खे, वेदना यांचे चित्रण व या जीवनपद्धतीतून निर्माण झालेले प्रश्न तसेच शहरी जीवनाचे पडसाद या साऱ्यांचा पट ग्रामीण साहित्य मांडते.

## ३.२ वासुदेव मुलाटे यांचे साहित्यलेखन

डॉ. वासुदेव मुलाटे यांनी मराठी विषयातून एम्.ए. बरोबरच डॉक्टरेट संपादित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपिठाच्या मराठी विभागातून प्रपाठक म्हणून स्वेच्छानिवृत्ती घेतली. काही काळ पुणे येथील पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रपाठक म्हणून अध्यापनाचे कार्य. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीचे सदस्य. महाराष्ट्र ग्रामीण साहित्य परिषदेचे मुख्य कार्यवाह. पुणे विभागीय पहिले ग्रामीण साहित्य संमेलन पुणे, अध्यक्ष १९९४, कै. अण्णाभाऊ साठे १० वे राज्य साहित्य संमेलन, जालना अध्यक्ष २००२.

वासुदेव मुलाटे यांचे साहित्यलेखन दोन प्रकारचे आहे; सर्जनशील व चिंतनशील. प्रामुख्याने सर्जनशील लेखकाचा पिंड असला तरी समकालीन साहित्यव्यवहारावर भाष्य करणेसाठी त्यांनी चिंतनात्मक लेखन केले आहे. गो.म.कुलकर्णी म्हणतात त्यानुसार, "वासुदेव मुलाटे हे ग्रामीण साहित्याचे निर्माते, साक्षेपी चिकित्सक आणि ग्रामीण चळवळीत सहभागी होणारे कार्यकर्ते म्हणून प्रसिदध आहेत. ग्रामीण साहित्याच्या केवळ समर्थनापेक्षा विचक्षणपणे या साहित्याची पाहाणी, चिकित्सकपणे, मर्म व यात निर्माण झालेल्या त्रुटीवर बोट ठेवणे हे त्यांचे उद्दीष्ट असते; यामुळे या संबंधीच्या त्यांच्या विचारांत वाचकाला अंतर्मुख करण्याची क्षमता निर्माण होते." (डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य: स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ ७)

ग्रामीण जीवनातील शोषित, वंचितांचे जीवन त्यांनी आपल्या साहित्यातून मांडले. या साहित्याला परिवर्तनवादी विचार प्राप्त व्हावा यासाठी ते प्रयत्नशील राहीले आहेत. जीवनवादी व परिवर्तनवादी विचारांचा पाया भक्कम व्हावा म्हणून सर्व साहित्य प्रकारातून त्यांनी लेखन केले. कार्यकर्त्यांच्या भूमिकेत साहित्यमेळावे भरवणे, प्रबोधनशिबीर आयोजित करणे, साहित्यपत्रिका काढणे असे उपक्रम सातत्याने त्यांनी केले आहेत. अध्यापक, अभ्यासक, संपादक, प्रकाशक म्हणून एक विशिष्ट भूमिका घेऊन त्यांनी लेखन केलेले आहे. ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये मांडताना मुलाटे म्हणतात, "ग्रामीण साहित्याला विद्रोहाचे वावडे नाही परंतु हा विद्रोह विधायक हवा. नुसत्या विद्रोहात मोडतोड असते. ग्रामीण साहित्याची चळवळ उत्क्रांतीवादी चळवळ आहे. ज्या देशात, ज्या समाजात, ज्या संस्कृतीत रहायचे आहे तो देश, तो समाज, त्या समाजाचा धर्म, संस्कृती समूळ नाकारून जीवनातील प्रश्न सुटतातच असे नाही. म्हणून जिथे रहायचे आहे, तो देश, तो धर्म, तो समाज, ती संस्कृती यांच्यात आवश्यक सुधारणा करणे महत्त्वाचे असते. या सुधारणांसाठी प्रतिगामी शक्ती विरुद्ध पुकारलेला लढा विधायक विद्रोहच असतो. असे मी मानतो." (डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य: स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ ४७) त्यांच्या साहित्यकृती अभ्यासताना ग्रामीण समाजातील कोणत्याही पातळीवरच्या शोषणाला, पिळवणुकीला त्यांचा विरोध आहे हे लक्षात येते. देशातील कोणत्याही समस्येचे उत्तर शोधतांना आधी ग्रामीण जनतेचा विचार झाला पाहिजे असे त्यांना वाटते.

**वासुदेव मुलाटे यांची संहित्यसंपदा:**

- अंधाररंग (कथासंग्रह), अबॉर्शन आणि इतरकथा (कथासंग्रह), काळोखवेणा (कथासंग्रह), झाड आणि समंध (कथासंग्रह), व्यथाफूल (कथासंग्रह);
- चिंतनाच्या क्षितिजावर (चिंतनशील मनाचे दर्शन घडविणारा लेखसंग्रह), झाकोळलेल्या वाटा (लेखसंग्रह), मनातलं आभाळ (ललित लेख);
- विषवृक्षाच्या मुळ्या (कादंबरी);
- हार्ट क्रॅकर (विनोदी एकांकिका);
- मराठवाड्याची कथा, महदंबेचे ढवळे, गुलामगिरी (संपादन);
- **उलगुलान आणि तडजोड:** एक आकलन (संशोधनात्मक), ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही (वैचारिक), ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा (वैचारिक), ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा (वैचारिक), झुंबर आणि ऋणानुबंध : रंगअंतरग (संशोधनात्मक), सहा दलित आत्मकथने: एक चिंतन (संशोधनात्मक),
- **ग्रामीण कथा:** स्वरूप आणि विकास (साहित्य आणि समीक्षा), दलितांची आत्मकथने: संकल्पना व स्वरूप (साहित्य आणि समीक्षा), नवे साहित्य नवे आकलन (समीक्षा), बिंब प्रतिबिंब (समीक्षा) : (या पुस्तकाला मसाप चा २०१८ सालचा रा. श्री. जोग पुरस्कार मिळाला आहे.) (६-४-२०१८), शेतकऱ्यांचा असूड ( जोतीराव फुले यांच्या याच नावाच्या मूळ पुस्तकाची समीक्षा), शोध जाणिवांचा (वैचारिक/समीक्षा), समीक्षा संवाद, सार्वजनिक सत्यधर्म (मूळ लेखक महात्मा जोतीराव फुले; संपादन - डाॅ. वासुदेव मुलाटे), साहित्यपालवीचे रंग आणि रूप (समीक्षा), साहित्य : स्वागत व समीक्षा (समीक्षा);

**वासुदेव मुलाटे यांना मिळालेले पुरस्कार:**

- **मराठी ग्रामीण कथा:** स्वरूप आणि विकास', ' विषवृक्षाच्या मुळ्या', 'मराठवाडयाची कथा' या ग्रंथांना महाराष्ट्र राज्य शासनाचे उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचे पुरस्कार.
- दोन वेळा कै. भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्काराने सन्मानित
- स्वातंत्र्य सैनिक मामासाहेब कलगड पुरस्कार
- मसाप चा रा. श्री. जोग पुरस्कार २०१८
- १९९४ साली पुण्यात झालेल्या पहिल्या पुणे विभागीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद
- जालना येथे २००२ साली झालेल्या १०व्या अण्णा भाऊ साठे राज्य साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

- आदिवासी साहित्य जागर आणि जतन अकादमी यांच्या वतीने २रे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन, चंद्रपूरला १७ नोव्हेंबर, इ.स. २०१२ला झाले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. वासुदेव मुलाटे होते.
- मराठवाडा साहित्य परिषदेच्या माजलगाव शाखेतर्फे पाचवे शिवार साहित्य संमेलन डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या अध्यक्षतेखाली २४ फेब्रुवारी रोजी साधोळा येथे

## ३.३ 'विषवृक्षाच्या मुळ्या'

'विषवृक्षाच्या मुळया' या शिर्षकातून एक उपरोधिक सूर जाणवतो. सहकार तत्वाच्या नावाखाली मंत्री सामान्य शेतकऱ्याला कसे गंडवतात, कर्जाच्या डोहात बुडवतात तरीही अज्ञानामुळे शेतकरी त्यत सहजगत्या ओढला जातो विष हे पटकन अंगात भिनत आणि या तर विषवृक्षाच्या मुळया आहेत म्हणजे त्या किती खोलवर रुतल्या असतील याची प्रचीती आपल्याला शिर्षकातून येते.

मुखपृष्ठही अनेक अंगांनी सूचक आहे. विषवृक्षाची मुळे काळया रंगात कृष्णकृत्याचे द्योतक आहे. तसेच या मुळया जमिनीत म्हणजेच समाजपुरुषाच्या मनात अगदी खोलवर तळापर्यंत पोहोचलेल्या दिसतात म्हणून तर मनातून जी कधीच जात नाही तिलाच 'जात' म्हणतात. या नानासाहेब बोऱ्यांच्या विधानाची आठवण येते. ही विषवृक्षाची मुळे असल्यामुळेच मुख्य वृक्ष हा निष्पर्णच नव्हे तर वाढ खुंटलेला चित्रित केलेला आहे. त्यामुळे मुखपृष्ठातील रंगसंगतीसुध्दा असेच मनाला उदासीनता आणणारे भाव अभिव्यक्त करतात. या विषवृक्षाच्या मुळयांची इतकी वारेमाप वाढ होत गेलेली दाखवली आहे की, त्यामुळे त्यामध्ये सापडलेली सामान्य माणसेही आकंठ बुडालेली दिसतात. इतके हे मुखपृष्ठ कादंबरीच्या शिर्षकाला पुरेपुर न्याय देणारे वाटते आणि म्हणूनच ते मनाला जास्त भावते.

### ३.३.१ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे समकालीन वास्तव:

ग्रामीण संस्कृतीतून आलेले लेखकाचे लहानपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले. शिक्षणाची जिद्द असल्याने वर्गाबाहेर राहून शिक्षणाची जिद्द पूर्ण केली. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले व शिक्षणक्षेत्रात नोकरी केली. चळवळीत काम करण्यासाठी व आपले स्वतंत्र विचार मांडता यावेत म्हणून प्रकाशन व्यवसाय सुरू करून साहित्याच्या चळवळीत व लेखनात सक्रीय झाले. त्यावेळचे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक वातावरण नवे होते. राजकीय दृष्टया स्वातंत्र्य मिळाले असले तरी ते सारे स्वातंत्र्य पुस्तकी होते. प्रत्यक्षात मात्र विविध पातळीवर समाज नागवला जात होता. ग्रामीण भागाचा विचार केला तर शेतीवर अवलंबून असणार समाज दयनीय जीवन जगत होता. शेतकरी सावकार, सहकारी सोसायट्या पतसंस्था, कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समित्या आशा अनेक स्तरावर शोषणाला बळी पडत होता. हे सारे वास्तव मुलाटे अनुभवत असल्याने त्यांच्या लेखनातून त्यांनी या सर्व प्रश्नांना वाचा फोडली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीबाबत ते लिहीतात, "ग्रामीण साहित्याची चळवळ ही एक साहित्यविषयक चळवळ आहे. ती जेवढी साहित्यविषयक चळवळ आहे तेवढीच सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळही आहे. विस्थापित ग्रामीण माणसांच्या भाव-भावना, त्यांची व्यथा-वेदना आणि समस्या यांना मुखर करणाऱ्या त्यावर उपाय शोधणाऱ्या साहित्यिकांची ही चळवळ आहे." (डॉ. वासुदेव मुलाटे,

ग्रामीण साहित्य: स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ ३७) एखाद्या लेखकाच्या लेखनातील अनुभवविश्व हे त्याच्या समकाळासह भूतकाळातीलही असू शकते. शिवाय तो ज्या काळात लिहीत असतो, त्या काळातील समाज, साहित्य व्यवहार त्याच्या जडणघडणीला कारणीभूत ठरत असतो. वासुदेव मुलाटे त्याला अपवाद नाहीत. कथा, कविता, दीर्घकथा, कादंबरी, एकांकिका, ललितगद्य आणि समीक्षा अशा साहित्य प्रकारांतून त्यांनी लेखन केले आहे. काही निवडक स्वरूपाचे ग्रंथही त्यांनी संपादित केले आहेत. त्यांच्या समकाळातील वेगळ्या जाणिवा व्यक्त करणारा एक गंभीर प्रकृतीचा लेखक म्हणून त्यांच्या साहित्याचा विचार करावा लागतो.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राचे समाजवास्तव कसे होते, कोणत्या सामाजिक चळवळी गतिमान झाल्या होत्या, साहित्य चळवळींचे स्वरूप काय होते, त्यातही नागर आणि ग्रामीण अशा दोन्हीही समाजाची स्थिती कशी होती आणि या वास्तवाला एक संवेदनशील, परिवर्तनशील मनाचा लेखक म्हणून वासुदेव मुलाटे साहित्यातून प्रतिक्रिया देत होते. ग्रामीण भागात जातीव्यवस्थाही प्रभावी होती. दलित, ग्रामीण, कष्टकरी समाज होरपळून निघत होता. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सामोरे जाण्याचे बळ उरले नव्हते आशा समाजाच्या वेदनांना वाचा फोडण्याचे काम मुलाटे यांनी आपल्या साहित्यातून केले. साहित्यातून व्यक्त होतांना तिथेही वर्गीय भेद त्यांना जाणवत होता. रंजनवादी साहित्यात वास्तव जीवनाचे चित्रण कुठेही दिसत नव्हते. त्यातून ग्रामीण जीवन व त्यांचे प्रश्न, अनुभव जाणिवा, समस्या याचे कोणतेही चित्रण येत नव्हते. ते चित्रण दाखवणारे साहित्य निर्माण करण्यासाठी चळवळ उभी रहावी लागली. "ग्रामीण साहित्य हे वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील माणसांच्या, गावातील व गावबाहेरील आसा सर्व माणसांच्या जाणीवा व्यक्त करणारे साहित्य आहे. अनागर भागातील खेड्यातील दलितांच्या जाणिवा प्रकट होत असतील तरी ते साहित्य ग्रामीण साहित्यच होय." (डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य: स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १९९४, पृष्ठ ३०) फुले-आंबेडकरी प्रेरणा सांगाव्या लागल्या. मुलाटे यांनी आपल्या लेखनाच्या प्रेरणा, विषय, जाणिवा याबद्दल अनेक ठिकाणी विस्तृत चर्चा केली आहे.

### ३.३.२ वासुदेव मुलाटे यांच्या कादंबरीलेखनाच्या प्रेरणा:

वासुदेव मुलाटे यांच्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणांचा विचार करताना निरक्षण नोंदवितांना सामाजिक वास्तव मांडण्याचा त्यांचा उद्देश समोर येतो. साहित्य हे समाजाचा आरसा असतो; त्यातून समाजाचे प्रश्न मांडले जावेत हेच अपेक्षित असते. कादंबरी सारखा व्यापक अवकाश असलेला साहित्यप्रकार मुलाटे वळले त्यामागची ही प्रमुख प्रेरणा आहे. प्रत्यक्ष जीवनात आलेले अनुभव कादंबरीसारख्या साहित्यप्रकारातून मांडणे त्यांना योग्य वाटले. समकालीन वास्तव हे दुष्काळ, गरीबी, भांडवलशाही, राजकारण यांनी माणसांना भरडऊन टाकणारे होते. त्यातून येणारे दाहक अनुभव मांडण्यासाठी त्यांनी कादंबरी हा साहित्यप्रकार निवडला.

'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीत ते आपल्या लेखनाच्या प्रेरणांबाबत सांगतांना म्हणतात, "प्रत्येक ललित साहित्यकृती ही व्यापक अर्थाने लेखकाच्या आत्मकथनाचाच एक भाग असतो. कारण लेखक एक व्यक्ती म्हणून जीवन जगत असताना विविध प्रकारचे

जीवनानुभव घेत असतो, ते घेत असताना भोवतीचं जग, संवेदनशील मनाने न्याहाळीत असतो आयणी असं भोवतीचं जग, समकालीन प्रसंग आणि वातावरण त्याच्या अंतर्गाभ्यात कुठंतरी तो साठवीत असतो. हे साठवलेलं विश्व लेखन करताना कुठं तरी नेणीवेतून आपसूकपणे प्रकट होतं. मी जेव्हा माझ्या 'विषवृक्षाच्या मुळया' या बहुचर्चित आणि बहुपुरस्कारित कादंबरीचा विचार करू लागतो; तेव्हा असंच काही घडलं असावं असं मला वाटतं. समग्र सहकार क्षेत्राचं दर्शन घडविणारी आजही ती एकमेव कादंबरी आहे. साधारणत: १९८३-८४ च्या सुमारास तिचे लेखन करीत होतो, तेव्हाही सहकार क्षेत्रावर आपल्याला अशी एक कादंबरी लिहायची आहे, या भावनेने किंवा उद्देशाने मी लिहीत नव्हतो किंवा तिची सुरूवातीला असा काही हेतू मनात ठेवून केलेली नव्हती. अमुक एक प्रकारची कादंबरी अनुक पद्धतीची रचना करून लिहायची, तिचा प्रारंभ असा असेल, मध्य असा असेल आणि शेवट ही ठरवून असा करायचं असा काही आराखडा माझ्यासमोर नव्हता. जे बघितलं, जे अनुभवलं ते सामाजिक जीवनाच्या परिवर्तनाशी निगडीत आहे आणि यादृष्टीने एक समकालीन वास्तव आपण आपल्यासह कुठेतरी मांडत जाऊयात, या विचारातून कादंबरीलेखनाचा प्रारंभ केला." (डॉ. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य:चिंतन आणि चर्चा; स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., डिसेंबर, २००२, पृ. २५५) याप्रकारे त्यांनी आपल्या कादंबरीलेखना मागील प्रेरणा स्पष्ट केल्या आहेत. ग्रामीण कादंबरी अनेक लेखकांनी महत्त्वाचे विषय मांडले. पण समकालीन साहित्यात सहकार क्षेत्रावर निर्माण झालेली एकमेव कादंबरी म्हणून 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

'साहित्याचा अवकाश' या ग्रंथात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी या कादंबरीबाबत म्हटले आहे, "ग्रामीण भागात आज जे परिवर्तन झालेले आहे ते सहकार चळवळीमुळे, यात काही शंका नाही. ही सहकार चळवळ ग्रामीणांच्या जीवनात कसे दु:ख निर्माण करते, यांचा वेध वासुदेव मुलाटे यांनी आपल्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीमधून घेतला आहे. सहकार चळवळीचे अंतरंग प्रकट करणारी ही एकमेव कादंबरी आहे." (डॉ. नागनाथ कोत्तापल्ले; साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, प्र. आ., २००३, पृ. २१६) सभोवताली जे जे अनुभवलं ते मांडण्याचा पर्यटन या कादंबरीने केलेला दिसतो. सहकार क्षेत्रातून निर्माण झालेले अनेक प्रश्न लेखकाने मांडले. सामान्य माणसाची, शेतकऱ्यांची होणारी गळचेपी त्यांना व्यक्त करायची होती. 'सहकार' चळवळ ही सामन्यांचा उद्धार व्हावा या हेतूने सुरू झाली असली तरी त्यातील अव्यवस्थेमुळे सामान्य जनांचे शोषण झाले. राजकारणी हस्तक्षेपामुळे ते भ्रष्टाचाराचे केंद्र बनले. संवेदनशील लेखक नेहमी समाजातील प्रश्न नेमकेपणाने टीपण्याचा प्रयत्न करीत असतो. हे प्रश्न मांडण्यासाठी तो एक विशिष्ट साहित्यप्रकार निवडतो मुलांटे यांनी कादंबरीसारखा मोठा पट आसलेला साहित्यप्रकार निवडला. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या या लेखकाला सहकार खेतरातील वास्तव समाजासमोर परखडपणे मांडायचे आहे. व या क्षेत्रात होणारी पिळवणूक, भ्रष्टाचार याला आळा घालून बदल घडवायचा आहे. ग्रामीण जीवनातून आलेला तरूण स्वत: मार्ग काढत आशावादी राहतो. हा सकारात्मक विचार त्यांनी या कादंबरीतून पेरला आहे.

### ३.३.३ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे कथानक:

विश्वनाथ तरटे हा तरुण ग्रामीण भागातील शिक्षकाची नोकरी सोडून शहरात जिल्हा सहकारी बँक मध्ये नोकरीसाठी येतो तो शहरी जीवनाबाबत स्वप्न उराशी घेऊनच! डबघाईला आलेली बँक, त्यातील आपमतलबी संचालकांचा गोतावळा, प्रशासनात भाग घेऊ नये या आटीवर नेमलेला कर्मचारी वर्ग यात सामील होण्यासाठी आलेल्या विश्वनाथची परतूरच्या शाखेत बँक इन्स्पेक्टर असणाऱ्या भोसल्यांची ओळख होते. त्यांच्याकडून विश्वनाथला बँक बद्दल बरीच माहिती मिळते. तेथील राजकारण आणि संचालक मंडळाचे हितसंबंध याची त्याला पूर्ण कल्पना येते. शैक्षणिक क्षेत्र अधिक चांगलं असे मत व्यक्त करत भोसले नायकाच्या मनात आधीच मनात शंका निर्माण करून जातो. परंतु, "प्रामाणिकपणे झटून काम करायचं नम्रतेने, सेवाभावाने वागायचं. सर्वांशी मिळून-मिसळून, अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळून राहून काम करायचं.. शिकून घेण्याची, समजून घेण्याची आपली वृत्ती आहे, हे तरी इथल्या लोकांच्या लक्षात आलं पाहिजे. एकदा कामाचं स्वरूप लक्षात आलं की मग कामचूकारपणा करायचा नाही." असे तो मनाशी ठरवतो. काही दिवस काम केल्यानंतर चेअरमन साहेबांच्या गावी सेलू शाखेत होणारी बदली, तिथे जोगळेकरांच्या बहिणीशी होणारी मैत्री व जातिभेदामुळे या मैत्रीला होणार विरोध आणि त्यातून कळमनुरीला होणारी बदली असा घटनाक्रम समाजातील जातीव्यवस्थेची पाळेमुळे कशी खोलवर रूजली आहेत यांचा प्रत्यय देतो. सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराची इथे नायकाला माहिती होत जाते. सहकार क्षेत्र जिथे जनसामान्यांसाठी काम व्हायला पाहिजे तिथेच गोरगरिबांची होणारी पिळवणूक, बँकेतील देशपांडे, दंडे आणि बँकेसमोरील व्यापारी लिंगप्पा यांच्यातील व्यवहारातून गरिबांची चाललेली पिळवणूक त्याच्या लक्षात येते. बँकेतील चपराशी विरप्पा हा या जनतेचा प्रतिनिधी म्हणून समोर येतो तोच सर्व वास्तव नायकाला सांगतो. "ग्रामीण माणसांची होणारी पिळवणूक, सहकार क्षेत्रात माजलेला भ्रष्टाचार आणि सावकार आणि कर्मचाऱ्यांचे लगेबांधे, कर्जाच्या खाईत डूबणारा सामान्य या सर्वांचे चित्रण मुलाटे वास्तवदर्शी व प्रभावीपणे कादंबरीत मांडतात." (डाॅ. संजय शिंदे; वासुदेव मुलाटे: साहित्य आणि समीक्षा) बँक इन्स्पेक्टरचा चार्ज घेतल्यावर या सावकारी पाशाविरुद्ध तो कायद्याचा बडगा दाखवतो. समाज रक्षणासाठी निर्माण झालेले पोलिस खात्यातील काही व्यक्तीचे बेपर्वा वागणे त्याला खटकते. ग्रामीण माणसांची होणारी पिळवणूक व त्यांचे वास्तव चित्र मुलाटे या कादंबरीतून रेखाटतात. "विश्वनाथ तरटे ही व्यक्तिरेखा चित्रित करताना लेखकाला आत्मभान जागृत असणारा, माणुसकी जपणारा, गरिबांच्या हिताचा निर्णय घेणार, भ्रष्टाचाराच्या विरोधी असणार सदबुद्धीने विचार करणारा, ग्रामीण भागांची संपूर्ण पार्श्वभूमी असलेला जिद्दी, मेहनती व स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणारा, आहे त्या गोष्टीत समाधान न मानणारा आणि नवीन गोष्टी शिकण्याची ईर्षा बाळगणारा अभ्यासू असा एक तरूण जो यशस्वी भारताचे स्वप्न साकारू पाहणारा आहे चित्रित करावयाचा आहे." (डॉ. संजय शिंदे; वासुदेव मुलाटे : साहित्य आणि समीक्षा)

कळमनूर मधून जालन्याच्या भू-विकास बँकेत नोकरी, व नवीन संसार सांभाळत तो पुढील वाटचाल करीत राहतो. एकंदर सर्वत्र सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचार लक्षात आल्यावर "विषवृक्षाच्या मुळ्या' तोडता येणार नाहीत, तरीही मी त्यांच्यावर घाव घालीन, जमलंच तर हे जंगलच मी पेटवून टाकीन." असे तो म्हणतो. काही वर्षे उलटल्यावर हा संवेदनशील

स्वभावाचा माणूस सहकार खाते सोडण्याचा निर्णय घेतो. सहकार क्षेत्रातील एक संपूर्ण पटच 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीच्या रूपाने लेखक आपल्यासमोर मांडतो.

### ३.३.४ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा आशय:

महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वसामान्य जनतेचे जीवन सुकर व्हावे; त्यांच्या जीवनात आर्थिक सुधारणा व्हावी यासाठी पर्यटन केले गेले. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे सहकारातून शेती सुधारणा करणे व शेतकरी समृद्ध व्हावा म्हणून पर्यटन करणे हे मुख्य उद्दीष्ट होते. राजकीय व्यवस्था याचे व्यवस्थापन करीत असल्यामुळे राजकारणी, शासकीय व प्रशासकीय कर्मचारी ही यंत्रणा कार्यरत होती. लाभधारक शेतकरी नेहमी खालच्या स्तरावर राहीला. राजकीय विकेंद्रीकरण झालेले दिसून येते. यात सहकारी बँक, सोसायटी, पतसंस्था, ग्रामपंचायती, यांचे पैशाचे राजकारण सुरू झाले व त्यात सामान्य शेतकरी पिचला जाऊ लागला होता. त्यातच सावकारी व्यवस्थाही आपली पोळी भाजून घेत होती. शेतकरी व छोटे व्यापारी सावकारांच्या पासहात अडकायला लागले. या सर्व भ्रष्टाचारामुळे एक आदर्श यंत्रणा कमकुवत झाली.

हा सहकार संस्था चळवळीच्या पराभवाचा इतिहास वासुदेव मुलाटे यांनी विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतून मयक्ष्डला आहे. विश्वनाथची कथा ही सर्व सामान्य शेतकरी अथवा ग्रामीण संस्कृतीतून आलेल्या प्रत्येक व्यक्तीची कथा आहे. विश्वनाथने अत्यंत जवळून सर्वसामान्यांचे नाडलेपण बघीतले आहे. हेच सारे वास्तव जनतेसमोर आणण्याच्या उद्देशाने ही कादंबरी लिहीली आहे. हाच कादंबरीचा आशय आहे. विश्वनाथ सहकार क्षेत्रात नोकरी करत असतो. वेगवेगळ्या गांवांमधून बदली होत असतांना तो शेतकरी मजूरांचे दु:ख पाहत असतो. व त्यांच्या कथा सर्वांसमोर याव्यात असे त्याला सतत वाटत असते. सहकार क्षेत्रात काम करीत असतांना अधिकारी, कर्मचारी, गावातील सत्ताकरणी यांच्या भ्रष्टाचाराचे वेगवेगळे स्वरूप त्याला दिसून येत असते. ही भ्रष्टाचाराची साखळी तोडण्याचा तो प्रयत्न करतो. 'सहकार' नावाखाली सर्वसामान्यांना गुलामगिरीकडे नेऊ पाहणाऱ्या गुन्हेगारी संस्कृतीचे चित्रण लेखकाने या कादंबरीतून केलेले आहे. प्रबोधन आणि रंजनाचे कार्य करणाऱ्या कादंबरी साहित्यप्रकारला पारंपारिकतेच्या पलीकडे नेऊन समाजाचे व जगण्याचे वास्तव दाखवण्याचे कार्य करण्यासाठी लेखकाने पर्यटन केले. आहे. या अतिसंवेदनशील जगाचे वास्तव दाखवणे हाच या कादंबरीचा आशय व प्रमुख उद्देश आहे.

या कादंबरीचा विषय हा एकपेडी नाही त्याला विविध स्तर आहेत. सहकार खात्यातील भ्रष्टाचार, शेतकरी सर्वसामान्य जनतेचे शोषणाला कारणीभूत असलेली व्यवस्था, आणि नायकाच्या आयुष्याची होणारी फरफट या तीन स्तरावर कादंबरीचा आशय व्यक्त होतो. भ्रष्टाचाराने केवळ माणूस नांगवला जात नाही तर या व्यवस्थेची त्याला सवय लागते. सर्व स्तरावर मग ते अधिकारी, कर्मचारी असो व सावकार, जमीनदार, अथवा कष्टकरी शेतकरी सगळेच यात गुंतत जातात. हा आशय अतिशय स्पष्टपणे लेखकाने या कादंबरीतून मांडला आहे.

### ३.३.५ 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा नायक - विश्वनाथ तरटे:

ग्रामीण साहित्यातील सुरुवातीच्या कादंबरीत नायक सोशीक वृत्तीचे दिसतात परंतु १९६० नंतरच्या साहित्यातून व्यवस्थेला नकार देणारे, व्यवस्था नाकारणारे, असे नायक पुढे येतात. 'विषवृक्षाच्या मुळ्या' मधील विश्वनाथही व्यवस्था नाकरणारा आहे; परंतु व्यवस्था बदलण्याचा मार्ग त्याला आजूनही सापडत नाही. निराशेचे सूर त्याच्या बोलण्यातून जाणवत राहतात. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले साहित्य असल्याने प्रतिगामी व्यवस्थेविरुद्ध व बंडखोरीकडे जाणारे ग्रामीण साहित्यातील नायकचे विश्वनाथ हे प्रातिनिधिक रूप आहे.

या कादंबरीचा नायक संवेदनशील आहे. प्रामाणिक आहे. आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी लागणारे सर्व कष्ट करण्याची त्यांची तयारी आहे. अत्यक्षत विपरीत परिस्थितीतही मर्यादा सांभाळणारा, कर्तृत्वाने पुढे जाणारा, कोणत्याही प्रतिगामी परंपरेत न आडकणारा असा विज्ञानवादी विचारांचा आहे. कुटुंबवत्सल असल्याने घरातील सर्व माणसांना जोडून ठेवण्याचा प्रयत्न करतो. पण असे करताना आई, भाऊ, पत्नी, मित्र यांच्यात गुंतत नाही. वडिलांचा करारी बाण हा त्याच्या जगण्याचा आदर्श आहे.

समाजात वावरताना विश्वनाथ कसं आहे हे लोखंडे या पात्राच्या संवादातून उलगडत जाते. त्याने आयुष्याची काही ध्येये ठरविली आहेत. त्यासाठी तो पर्यटन करीत राहतो. माणसांचे स्वार्थीपणा त्याला आवडत नाही. बराचसा एकटा राहणारा विश्वनाथ कोणावर राग मात्र काढतांना दिसत नाही. आपली ध्येय मिळविण्यासाठी अपार कष्ट घेताना दिसतो. आयुष्याची घडी बसवण्यासाठी तो सतत प्रयत्न करत असतो. प्रामाणिक माणसाला त्याच्या कष्टाचे फळ मिळावे असे त्याला वाटते. राजकीय, शासकीय व्यवस्था यांच्याशी तो लढू शकत नाही. समाजातील विदारक वास्तव विश्वनाथच्या रूपाने लेखक कादंबरीतून मांडतात.

### ३.३.६ 'विषवृक्षाच्या मुळया' या कादंबरीची भाषा व शैली:

'विषवृक्षाच्या मुळया' ही ग्रामीण कादंबरी असल्यामुळे संवादातून ग्रामीण भाषा येते. परभणी, जालना, बोड येथील खास मराठवाडी बोली येथे वापरलेली आहे. आशयाला पूरक अशीच भाषा वासुदेव मुलाटे यांनी कादंबरीत वापरलेली आहे. ग्रामीण संस्कृती व शहरी वातावरण या दोन्ही चे चित्रण करताना कादंबरीची भाषा वेगवेगळी जाणवली तरी एकरूप होताना दिसते.

"देशसेवा, नेतृत्व, पुढारीपण, गरिबांचं कल्याण या नावाखाली काय चाललंय हे? उद्दामपणे दमदाटी करणारे ललासाहेब, बँकेतला लाचार होऊन वागणार स्टाफ यांच्याविषयीच इथं? आपण असे कसे आडकतो आहोत पुन्हा पुन्हा या चक्रव्यूहात. भू-विकास बँक, सहकारी बँक, सहकार खाते, सहकार, सहकार! यातून बाहेर पडलं पाहिजे. नकोच हे क्षेत्र. आपल्याला नाही मानवणारी ही नोकरी. संधी मिळाली की सुटायचं इथून." यातून नायकांची तगमग व्यक्त होते. शहरी भागात सहकार क्षेत्रात नायक नोकरी करत असल्यामुळेच शहरी भाषेचा वापरही इथे दिसतो. कादंबरीच्या भाषेतून कादंबरीचा विषय व पात्रांची जगण्याची पद्धती व्यक्त होते, भाषा कुठेही आलंकारिक अथवा काव्यात्म आणि भावनिक होत नाही;

ती सहज आणि सरळ असे तिचे स्वरुप आहे. यामुळे वाचकाच्या मनांची पकड घेते. निनेदन तृतीय पुरुषी आहे. उपरोधाची त्याला धार आहे. भाषाशैली नागरी असली तरी काही ठिकाणी ती ग्रामीण ढंगानं गेलेली जाणवते. ती अलंकारिक असल्याने ती मनाला अधिक भावते. जसे- “बरं मी निघू का दादा?”, विश्वनाथ घडयाळाकडे बघत म्हणाला “वा! साहेब वा! कमाल केलीत तुमी बी अवो आमी बोलावून घेतलं तुमाला ते कहयासाठी?”, “कशासाठी?” “अहो जेवणासाठी”. एरंडे “म्हंजी बगा आपला जीव ह्येंच्यापाशी आन् यांचा जीव...” “बायकोपाशी”. एरंडेनं त्यांच वाक्य पूर्ण केलं. या भाषाशैलीतून त्यांच्या मनावरील पारंपारिक विचारसरणीचा पगडा दिसून येतो.

कथानकाशिवाय इतर भाष्य येत नाही. पाल्हाळीकपणाला वावच मिळत नाही. कोणत्याही पत्राला योग्य वाटेल अशीच भाषा वापरली असल्यामुळे सहज सोपी होते. हे या कादंबरीच्या यशस्वी होण्यामागचे एक महत्त्वाचे कारण आहे.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- ‘विषवृक्षाच्या मुळ्या’ या कादंबरीतील घटना प्रसंग तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------

## ३.४ समारोप

वासुदेव मुलाटे यांची ‘विषवृक्षाच्या मुळ्या’ ही कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीच्या प्रवासात मैलाचा दगड ठरते. ग्रामीण साहित्य हे फुले-आंबेडकरी विचारधारेवर अवलंबिलेले आहे. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विज्ञानवादी दृष्टिकोन प्रतिगामी समाजव्यवस्थेला नकार देत, सर्व भेदाभेदांपलिकडे जाणारा आहे. ग्रामीण समाजाचे प्रश्न जे बाजूला सारले गेले. त्या प्रश्नांना ग्रामीण साहित्याने वाचा फोडण्याचे काम केले आहे. वासुदेव मुलाटे हे केवळ साहित्यिक म्हणूनच प्रसिद्ध नाहीत तर ग्रामीण चळवळ उभारण्याचे मोठे कार्यही त्यांनी केले आहे. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण समाजातील व्यथा वेदनांना वाचा फोडली. प्रतिगामी व्यवस्थेला नकार, विरोध आणि विद्रोह या त्रिसूत्रीचा वापर मुलाटे यांच्या कादंबरीतून प्रकर्षाने दिसून येतो. कादंबरी चे सर्व घटक कथानक, पात्र, वातावरण, संवाद, निवेदनशैली यांचा आपण विचार केला. सरळ सोपी भाषा वाचकांच्या मनाची पकड घेते. सहकार क्षेत्रातील प्रश्नांवर बेतलेली ही पहिली कादंबरी आहे.

## ३.५ नमुना प्रश्न

१. वासुदेव मुलाटे यांच्या ‘विषवृक्षाच्या मुळ्या’ या ग्रामीण कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ‘विषवृक्षाच्या मुळ्या’ या कादंबरीचे कथानक स्पष्ट करा.

३. 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचा आशयबंध तपासा.

४. भाषा व शैली च्या अनुषंगाने 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीची चर्चा करा.

५. 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतील संवेदनशील नायक विश्वनाथ. (टीप लिहा.)

६. 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे समकालीन वास्तव. (टीप लिहा.)

७. फुले-आंबेडकरी साहित्य म्हणून विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे महत्त्व स्पष्ट करा.

## ३.६ संदर्भ


- वासुदेव मुलाटे ; विषवृक्षाच्या मुळ्या; स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद
- चिंतामणी सुधाकर कांबळे; वासुदेव मुलाटे यांची कथा : रूप व स्वरूप
- डॉ. संजय शिंदे; वासुदेव मुलाटे : साहित्य आणि समीक्षा
- सं. डॉ. रामकिशन दहिफळे; परिवर्तनवादी साहित्य : संकल्पना व स्वरूप - वासुदेव मुलाटे गौरव ग्रंथ, स्वरूप प्रकाशन, संभाजी नगर
- अर्जुन व्हटकर; वासुदेव मुलाटे व्यक्ती आणि वाङ्‌मय
- सं. डॉ. शंकर विभूते, प्रा. श्रावण गिरी; शब्दांची नाव घेऊन निघालेला माणूस
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले; साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन
- वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि दिशा
- वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य चर्चा आणि चिंतन


*****

# ४

# दीर्घ कविता : आरपार लयीत प्राणांतिक - प्रज्ञा दया पवार

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ फुले-आंबेडकरवादी साहित्य
    ४.२.१ फुले-आंबेडकरी साहित्याची संकल्पना व वैशिष्ट्ये
४.३ प्रज्ञा दया पवार यांची लेखनवैशिष्ट्ये
४.४ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधून व्यक्त झालेले विठाबाईचे चरित्र
४.५ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील आविष्करण / अभिव्यक्ती पद्धती
४.६ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील वर्ण, जात, वर्ग वास्तव
४.७ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील लिंग भेदाचे वास्तव
४.८ 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेतील फुले-आंबेडकरवाद
४.९ समारोप
४.१० नमुना प्रश्न
४.११ संदर्भ

## ४.० उद्दिष्टे

- फुले-आंबेडकरी साहित्याचे स्वरुप समजावून घेणे.
- कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेचे स्वरूप समजून घेणे.
- 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेचे स्वरूप अभ्यासणे.
- विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांचे चरित्र दीर्घ कवितेतून समजावून घेणे.
- प्रज्ञा दया पवार यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना

'फुले-आंबेडकरी साहित्य' चे स्वरुप घटक १ व २ मधून आपण अभ्यासले आहेच. या साहित्यप्रवाहाचे स्वरुप समजावून घेऊन कविता या साहित्यप्रकारतील 'आरपार लयीत प्राणांतिक' या प्रज्ञा दया पवार यांनी लिहिलेल्या दीर्घकवितेतील फुले-आंबेडकरी विचारांचा वेध घेऊ या. विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर या कलावंतिणीच्या आयुष्याच्या व तिच्या जगण्याचा पट मांडतांना तिचं दु:ख व वेदना, तिचा विद्रोह या साऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे. त्यापूर्वी फुले-आंबेडकरी साहित्याचे स्वरुप जाणून घेऊ या.

## ४.२ फुले-आंबेडकरवादी साहित्य

१९९० नंतर वर्ण, जात, वर्ग, लिंगभाव अधिष्ठित शोषकव्यवस्था अंतासाठीचे तत्वज्ञान म्हणून फुले आंबेडकर विचारप्रवाहाचा उदय झाला. बुद्धाच्या प्रबोधन पर्णपरेशी कृतीशील चळवळीची विचारधारा जोडण्याचे कर्य फुले-आंबेडकरांनी केले. भारतीय समाज, साहित्य आणि संस्कृती संदर्भात जागतिकीकरणाने निर्माण झालेल्या वास्तवात फुले-आंबेडकरी विचारप्रणालीचे महत्त्व लक्षात घ्यावे लागेल. वेदना, विद्रोह, नकार, नवनिर्मितीची जाणीव घेऊन येणारे हे साहित्य मानवाची दु:खमुक्ती चे ध्येय घेऊन लिहीले गेले. 'फुले-आंबेडकरी साहित्य' चे प्रयोजन शोषित घटकांचा आवाज समाजासमोर व्यक्त करणे हे या साहित्याचे प्रयोजन आहे. मानवतेला प्राधान्य देणारे हे साहित्य आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, विश्वबंधुता या मानवी मूल्यांची पुनर्रचना करू पाहणारे हे साहित्य आहे. परिवर्तनाचे नवे भान आलेल्या समाजाचे प्रतिबिंब दाखवणारे नवे प्रवाह साहित्यात दिसू लागले. 'ज्या साहित्यामागील प्रेरणा फुले-आंबेडकरांची आहे. ते साहित्य फुले-आंबेडकरी साहित्य होय.' या विचारातून साहित्यनिर्मिती होऊ लागली.

### ४.२.१ फुले-आंबेडकरी साहित्याची संकल्पना व वैशिष्ट्ये:

'फुले-आंबेडकरी साहित्य' हा फुले-आंबेडकरी चळवळीतून आलेला विचार आहे. सर्व भेदाभेदांविरुद्ध उभारलेल्या लढयातून निर्माण झालेले हे साहित्य आहे. वर्ण, जात, लिंग भेदाच्या विरोधात ठामपणे उभे राहणारी ही विचारधारा आहे. शूद्रातिशूद्र म्हणून हिणवल्या गेलेल्या समाजातील सर्व घटकांच्या पुनरुत्थायचे काम या चळवळीने केले. दलित हा शब्द जातदर्शक असल्याने तो नाकारला व जातीअंताचा लढा देत प्रेरणा दिली. हे फुले-आंबेडकरी साहित्य म्हणजेच मानवतावादी साहित्याचा जाहीरनामा आहे असा विचार मांडला गेला. मानवी हक्क, मानवी स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय ही जोतिरव फुले यांची त्रिसुत्री विचारप्रणाली होती. या विचारांची प्रेरणा घेऊनच सर्व विषमतेविरुद्ध सामाजिक क्रांती झाली. शोषक- शोषित असा संबंध असणाऱ्या प्रत्येक व्यवस्थेला शह दिला गेला मग ती सरंजामशाही असो, भांडवलशाही अथवा जातीव्यवस्था या साऱ्यांना उखडून टाकून स्वस्थ समाज निर्माण करण्याचा प्रयत्न चळवळीतून सुरू झाला. हा लढा मानवी स्वातंत्र्याकडे आणि समटेकडे नेणार लढा आहे. समाजातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड यावर हल्ला चढवत उपेक्षित, वंचित घटकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम या चळवळीने केले. समाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक सर्वच प्रकारे जागृती व्हावी म्हणून प्रयत्न करणारी ही चळवळ आहे. मानवाची प्रतिष्ठा हाच विचार या प्रणालीचा पाया आहे. समाजाच्या पुनर्रचनेसाठी लिहिले गेलेले हे साहित्य आहे.

१९५६ च्या धम्मक्रांतीनंतर फुले-आंबेडकर यांच्या कृतिशील चळवळीमुळे मराठी साहित्यात नवीन प्रवाह निर्माण झाला व १९९०-९१ नंतर या लेखनाला वेग आला. राजा ढाले भूमिका मांडतात, "ज्या साहित्यामागील प्रेरणा फुले-आंबेडकर आहेत त्या साहित्याला 'फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य' म्हणावे." माणसाची मने घडवणे हे साहित्याचे उद्दीष्ट असले पाहिजे. "समाज बदलायचा असेल तर प्रथम समाजाचं पारंपरिक मंन बदललं पाहिजे आणि त्यासाठी संहित्याहून प्रभावी माध्यम आपल्याकडे दुसरं कुठलंही नाही." हे राजा ढाले यांचे विचार साहित्यप्रवाहाला दिशा देणारे ठरले. माणसाचे मन बदलले कई त्यांचे विचार

बदलतात आणि विचारप्रक्रिया बदलली की कृती बदलते. म्हणूनच मनाचे परिवर्तन आवश्यक आहे असे त्यांनी मांडले आहे. एकूणच अस्तित्वहीन ठरवल्या गेलेल्या माणसांची अस्मिता जागी करणे, त्यांना जागृत करून मानवतावादी सुसंपन्न विश्वाची पुनर्रचना करणे हेच फुले-आंबेडकरी साहित्याचे प्रयोजन आहे.

**प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी फुले-आंबेडकरी साहित्याचे निकष मांडले आहेत:**

"१) स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि सेक्युलरिझम

२) दारिद्र्याचे आणि अंधश्रद्धेचे समर्थन वा उदात्तीकरण नाही.

३) 'माणूस' म्हणून असलेली नैसर्गिक व मानवीय प्रतिष्ठा राखणे.

४) व या प्रतिष्ठेचे अवमूल्यन करणारी 'दैवी' आणि 'नियती' संकल्पना नाकारणे."

या साहित्याने प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, नीती, मानवता याला महत्त्व दिले. फुले- आंबेडकर यांच्या विचारातून निर्माण झालले साहित्य हे मानवाला महत्त्व देणारे साहित्य आहे.

## ४.३ प्रज्ञा दया पवार यांची लेखनवैशिष्ट्ये

एकूणच मराठी साहित्यात बहुजन स्त्रिया जेव्हा लिहायला लागल्या तेव्हा त्यांच्या लेखनातून स्त्रीचं एक वेगळंच जगणं समाजाला दिसलं. हे वास्तव अत्यंत भीषण होतं. या कवयित्रींची भाषा अत्यंत धारधार होती कारण ती त्यांच्या शोषणातून आलेली होती. या शोषणाला वाचा फोडण्याच्या उद्देशानं बहुजन कविताही येऊ लागल्या. त्यांचा सूर हा चळवळीचा होता. याचबरोबर स्त्रीवादी साहित्यातही बहुजन स्त्रियांचं लेखन प्रामुख्याने पुढे येत होतं. प्रज्ञा पवार यांची कविता या साऱ्या बहुजन स्त्रीवादी कवितांच्या एकंदरीत लेखनशैलीला नवीन वळण देणारी ठरली. त्यांच्या कवितांतून केवळ बहुजन स्त्रीचा विचार नव्हता तर साऱ्या शोषित गटांचा मग ते भारतीय असो वा पाश्चात्य, स्त्री असो वा पुरुष या साऱ्यांचा आवाज म्हणून ही कविता पुढे आली. माणसाला माणसासारखं जगता यावं व सर्व माणसांना एकाच समतेच्या पातळीवर जगता यावं यासाठीचा तिचा हा लढा आहे. तिने आपल्या कवितांतून जसे कष्टकरी, कामगार, बहुजन समाजाचे चित्रण केले आहे. तसेच स्त्रिया, जातिभेदाचे बळी ठरलेला सारा समाज यांचेही चित्रण केले आहे. "चांगलं लिहिण्यासाठी कवी-लेखकांना खूप बघावं लागतं, खूप अनुभवावं लागतं. कम्फर्ट-झोनच्या पलीकडे जाण्याची तयारी ठेवावी लागते, त्यासाठी प्रसंगी पडेल ती किंमत चुकवावी लागते. जे नियत आहे, ते म्हणजे आपलं शरीर, आपली लैंगिक ओळख, जात-धर्म, वर्ग, आपलं भौगोलिक स्थान, हे सगळं सगळं तर चिकटून आलेलं असतंच आपल्याला. यात राहूनही आपण लिहू शकतो, नाही असं नाही. पण चांगल्या कवितेसाठी या नियतत्वापलीकडे जाणं अत्यंत आवश्यक असतं." (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०,२०१३) साहित्यिकाचे साहित्य समजून घेताना त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व, त्याचा भोवताल, ज्या वातावरणाचा त्याच्या जडणघडणीत प्रभाव आहे अशी व्यक्ती, घटना व सामाजिक परिस्थिती याचा विचार करावा लागतो. कारण त्याचा ठसा त्या त्या व्यक्तीवर उमटलेला असतो व त्याचे पडसाद लेखनातून उमटत असतात.

तत्कालीन दलित चळवळींचा तसेच स्त्रीवादी चळवळींच्या पार्श्वभूमीचा कवयित्रीच्या एकंदर व्यक्तिमत्त्वावर व साहित्यावर प्रभाव आहे. प्रज्ञा दया पवार या प्रत्यक्ष चळवळीतील कार्यकर्ती असल्याने त्यांचे सर्व लेखन हे समाजातील उपेक्षित गटाचे प्रश्न मांडणारे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे आहे. माणसाच्या जगण्याला महत्त्व देणारे हे लेखन भेदाभेदानविरुद्ध आवाज उठवते. स्त्री गटाला करावा लागणारा संघर्ष दुहेरी पातळीवरील आहे, जातीच्या उतरंडीमुळे समाजातील नगण्य स्थान त्यांतून होणारी पिळवणूक व लिंगभेदामुळे घरातल्या पुरुषाच्या हातून होणारे शोषण या साऱ्यांचे दाहक अनुभव स्त्री घेत असते. प्रज्ञा यांच्या कविता ह्या केवळ स्त्रीच्या अनुभवांना व्यक्त करणाऱ्या नाहीत तर त्या एकूणच शोषित गटाची बाजू मांडणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देण्याऱ्या आहेत. ही एका कार्यकर्तीची कविता आहे. चळवळीतील कार्यकर्ती असल्याने समाजातील असमानतेमुळे येणारी अस्वस्थता टिपणं हा या कवितेचा स्थायिभाव म्हणता येईल. स्वतःच्या कविता लेखनाबद्दल प्रज्ञा म्हणतात, “माझी कविता अस्वस्थतेतून येते, पण म्हणजे जरा काही खुट्ट झालं आणि कविता झाली असं होत नाही. ती अस्वस्थता खोलवर आत मुरावी लागते. पण एक मात्र खरं, कविता लिहून झाल्यावर ती अस्वस्थता काहीशी कमी होते. तात्पुरते का होईना, पण शांतता मिळाल्याचं जाणवतं. त्यामुळेच आयुष्यात कितीही वेळा नैराश्याचे, कडेलोटाचे क्षण आलेले असले तरी कवितेचा हात धरून पुन्हापुन्हा उठून उभं राहणं हे माझ्याबाबतीत घडलेलं आहे.” (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) स्त्रीचे विविध पातळीवरचे शोषण हा या कवितेचा विषय राहिलेला आहे.

शोषक व शोषित हा भेदच नाहीसा करण्याचा प्रयत्न या लेखनातून जाणवतो. या साऱ्या लेखनाचा उद्देशच माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करण्यासाठीची तळमळ व्यक्त करण्याचा आहे. प्रज्ञा म्हणतात, “माझ्या कवितेचा विषय जरी बव्हंशी स्त्रीशी, चेहरा हरवलेल्या-चेहरा शोधणाऱ्या, त्यासाठी झुंजणाऱ्या स्त्रीशी जोडलेला असता तरी असं मला वाटत नाही की मी बाईची कविता लिहिते. स्त्री हे विषम व्यवस्थेचं एक प्रतिरूप म्हणून माझ्या कवितेत येतं. ते अँकरेज असतं असं म्हणता येईल. बाईच्या अनुषंगाने येणाऱ्या तिच्या जगण्याचा, स्त्री-पुरूष नातेसंबंधांचा व एकूण मानवी नातेसंबंधांचा उभा-आडवा पट पाहत असताना त्यातली मानुषता मात्र हरवलेली, ठायी ठायी विरूप झालेली दिसते. या विरूपतेमध्ये लिंगभेदजन्य विषमतेबरोबरच जात-वर्गवास्तव, त्याबरोबरच जागतिकीकरणातून येणारं कंगालीकरण, बाजारशरणता आणि व्यक्तीशिवायची बाकीची सर्व मानवी एककं दुय्यम ठरवत जाणं या बाबी कळीची भूमिका बजावत असतात. या भूमिकांचा शोध घेणं, अर्थनिर्णयन करणं आणि त्यांच्या विरोधात हस्तक्षेप करणं हे कवितेचं काम आहे असं मी मानते. या अर्थानं कविता ही एक कृती करणं आहे, असं मला वाटतं....माणसाचा अस्सलपणा आणि व्यवस्थेतला रचितपणा यांच्यातील परस्परसंबंधाचा शोध मी सगळ्याच लेखनातून घेत आले आहे. माझ्या कवितेची मूळ प्रेरणा म्हणायचीच झाली तर ती ही आहे- माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेणं.” (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) ही कृती करत असताना प्रामुख्याने डोळ्यासमोर आहे तो समाजातील शोषित गट. त्यातही दुहेरी स्तरावरील शोषण झालेली स्त्री. जिचं माणूसपण शतकानुशतके परंपरेने नाकारलं. तिला पशूहूनही हीन दर्जाचं जगणं जगायला भाग पाडलं अशी स्त्री. असा माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेणं हा या कवितेचा गाभा म्हणता येईल. यासाठी त्याने

संस्कृतीची पानं उलटून भूतकाळात मागे जात व्यवस्था समजून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. “हे असं मागे जाणं, आणखी बाजूला सारणं, संस्कृतीचा पोटसंस्कृतीशी अन्वय लावणं, केंद्र आणि परिघाच्या भौमितिक तत्त्वांना समष्टीच्या उजेडात पाहणं, हा प्रवास जारी आहे. तो थोर आहे तसाच जीवघेणा. सुंदर तसाच रक्तबंबाळ करणारा. त्याहूनही अधिक तो बाईचं बाईपण म्हणजेच माणूसपण नेमकं असतं तरी कशात, हे लख्खपणे सांगणारा आहे.” हे बाईचं माणूसपण मांडणारं साहित्य आहे. प्रज्ञा यांची कविता केवळ स्त्रीवादी न ठरता मानवतावादी ठरते कारण स्त्रीचा केवळ स्त्री म्हणूनच नाही तर माणूस म्हणून विचार इथे केलेला दिसतो. फुले - आंबेडकरवादी विचार या लेखनाचा मुळाशी आहे.” (मानवतावादी स्त्रीकविता- डॉ. विजया एस. जी.) प्रज्ञा यांची लेखणी सतत माणसाच्या माणुसपणाचा शोध घेत असते.

आजूबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंगातून, स्वतःच्या आयुष्यातील अनुभवांतून येणारी अस्वस्थता या कवितेत दिसते. ‘आरपार लयीत प्राणांतिक’ मधील विठा हा अगदी तिच्या रोजच्या जीवनातील अनुभव नसला तरी सहसंवेदनेने त्या जाणून घेतात व तिचं सारं आयुष्य दीर्घ कवितेतून उभं करतात. असे अनेक अनुभव मांडतांना त्यांची लेखणी धारधार होताना दिसते. “कवी-लेखकाचं, त्याच्या-तिच्या स्वतःच्या निर्मितीप्रक्रियेशी असलेलं नातं नेमकं उलगडून सांगता येणं अवघडच आहे. ते एकआयामी, एकरेषीय तर नाहीच, पण कुठलंच अंतिम अथवा ठाम विधानही त्याबाबत संभवत नाही. हे नातं विलक्षण गुंतागुंतीचं, प्रसंगी अनेक अंतर्विरोधांना पोटात वागवत असल्यानं त्याची एकास एक अशी उत्तरं देणं धाडसाचंच ठरू शकतं. तरीही मी हे धाडस करू पाहते, कारण अंतर्बाह्य माणूस असल्याचा शिक्का मी कपाळावर वागवते! माणूस लिहिता असो वा न लिहिता, ही गुंतागुंत वागवतच जगत असतो.” (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) असं माणूस असणं आणि माणूसपणाचा शिक्का कपाळावर वागवणं यातूनच प्रज्ञा व त्यांचे लेखन मानवतावादी ठरते. प्रत्येक कविता ही समाजातील शोषित गटाचा हुंकार म्हणून येते. स्व चे व समाजातील इतर स्त्रियांचे अनुभव यांचे सार मांडत कविता प्रगल्भ होत जाते.

## ४.४ ‘आरपार लयीत प्राणांतिक’ मधून व्यक्त झालेले विठाबाईचे चरित्र

विठाबाई भाऊ मांग नारायणगांवकर या कलावंतिणीचे आयुष्य, त्याची दाहकता टिपत प्रज्ञा दया पवार यांनी लोकवाङ्मय गृह ने २००९ मध्ये प्रकाशित केलेल्या आरपार लयीत प्राणांतिक मध्ये या दीर्घकवितेतून आत्यंत प्रवाहीपणे मांडले आहे.

‘इथं कुणीच नाही विमुक्त

नि तुझं तर घुंगराच्या वेदनेशीच सख्खं नातं

नऊ महिने नऊ दिवस

थेट चामडीच्या पिशवितून आणलीस

कातीव सुरांची आग काळजात

नि थिरकणारी बेदरकार वीज पावलात”(आ.ल.प्रा.,पृ.२७)

विठाबाईचे आयुष्य घुंगरांच्या वेदनेशी जोडले गेले आहे. वयाच्या ७ वर्षापासून पोटाची आग विझवण्यासाठी' विठाबाई ही एक दारुण भीषण कथा आहे- जातीय, लैंगिक, सांस्कृतिक वंचनेची, शोषणाची आणि आयुष्याच्या शेवटी बेहाल स्थितीत, अन्नाला मोताद होऊन स्वतच्या परवशतेची! आणि तरीही परंपरेच्या भीषण दडपणांना झुगारून आपलं बाईमाणूसपण कलेतून सिद्ध करू पाहणाऱ्या या कलावतीमध्ये एक कहाणी लपली आहे एका जबर जिद्दीची, इर्षेची, अंगाराची, सामर्थ्याची." (डॉ. माया पंडित, प्रस्तावना, आरपार लयीत प्राणांतिक, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०१०, पृ.२१)

तमाशा कलावंतीण स्त्री च्या आयुष्यातील वास्तव अनुभव सहवेदनेने उभं करतांना प्रज्ञा यांची लेखणी प्रभावी होत जाते. विठाबाईचं जगणं हे केवळं भोगणं असलं तरी ती ताठ कणा ठेऊन रगीनं आणि धगीनं जगली हे  वास्तव या दीर्घ कवितेतून व्यक्त होतं. 'तुमच्या भोवतालातील काही गोष्टी तुम्हाला खोल भिडतात, आतून हलवून जातात, अस्वस्थ करतात, त्या गोष्टींना दिलेली तातडीची प्रतिक्रिया म्हणजे कविता असते. जेव्हा तुम्हाला काही छळतं, बेचैन करतं, डसतं तिथे कविता सुचते, असं मला वाटतं... कवितेचं प्रवाहीपणाशी आंतरिक नातं असतं. आपल्याला आलेल्या स्थूल, जड, ढोबळ अनुभवांचे कवितेत रूपांतर या प्रवाहीकरणातून, परिवर्तनशीलतेतून साक्षात होत असतं. स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाण्याची कृती कवितेतून घडते." (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) म्हणूनच कवयित्रीला विठामायची वेदना अस्वस्थ करते. संवेदनाहीन समाजाने दिलेल्या दुःखाचा आलेख या कवितेत ती मांडते.

'विठामाय,

मी नाही बघू शकत तुझ्याकडे

ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयातला

एखादा ॲंटिक पीस म्हणून

मी नाही बघू शकत तुझ्याकडे

सांस्कृतिक संचित टिकवून ठेवणारं

एखादं पॅकेज म्हणून"(आ.ल.प्रा., पृ.४७) असा प्रवास प्रत्येक लेखकाचा होत असतो. मनाची अस्वस्थता, व्यक्त होण्याची तळमळ या प्रक्रियेतून प्रत्येक लेखक जात असतो. कवयित्री प्रज्ञा दया  पवार यांना मुलाखत घेतांना विजया एस. जी. यांनी प्रश्न  विचारला, 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील या विठाबाईच्या जीवनसंघर्षाविषयी लिहावसं का वाटलं?' यावर उत्तर देतांना त्या बोलल्या की, "माझ्या पाळंमुळांचा शोध घेत आपली विद्रोही परंपरा कुठेकुठे दिसते. मागे भूतकाळात धागेदोरे दिसतात का? असा शोध मी घेत होते. माझे आजोबा तमाशात वाद्य वाजवायचे. त्यामुळे गावात तमाशा आला की आजोबांच्या घरीच ते लोक राहायचे. पण माझ्या वडिलांना ते कधीही जवळचे वाटले नाही. कारण त्या समाजातील बायकांचं शोषण होत होतं. एकीकडे लोककलेचा दर्जा द्यायचा आणि दुसरीकडे त्या तमाशात नाचणाऱ्या बाईकडे कशा नजरेनं बघितलं जातं, त्यांना ते जवळचं वाटलं नाही म्हणून माझ्या वडिलांनी ते नाकारलं. कारण त्यात स्त्री शोषणाची

परंपरा आहे. त्या काळात डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीसाठी पट्ठे बापूराव व पवळा हिवरगावकर यांनी जमा केलेले पैसे देऊ केले तेव्हा डॉ. आंबेडकरांनी ते नाकारलं. बाईला तमाशात नाचवून गोळा केलेला पैसा मी चळवळीसाठी सुद्धा वापरणार नाही. हे सारं बघत असतांना दादांनी घरामध्ये जी कला होती त्याच्याशी कुठलाही संबंध ठेवला नाही. व्यवस्थेने त्यांच्यावर हे सारं लादलेलं असताना त्या कलावंतांचा काय दोष आहे. समाजाच्या संपूर्ण जडणघडणीत कष्टकऱ्यांचा मोठा वाटा असतो. विठाबाईच्या आयुष्याचा आलेख बघितला तेव्हा ती नायिका म्हणून मला भावली. स्वतःच्या आयुष्यात प्रचंड प्रमाणात संघर्ष केला. धग आणि रग एकवटून ही कला जिवंत ठेवली. म्हणून त्यांना केंद्रस्थानी नेवून ठेवणं हिरॉइक वारसा असाही असतो याची जाणीव करून देण्यासाठी ही दीर्घकविता लिहिली." (डॉ. विजया एस. जी., मानवतावादी स्त्रीकविता, ब्रॉनॅटो पब्लिकेशन, मुंबई, ईबुक) मनाची अस्वस्थता, व्यक्त होण्याची तळमळ या प्रक्रियेतून प्रत्येक लेखक जात असतो. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय उतरंडीत कोठेही स्थान नसलेल्या कलावंतीण स्त्राr चे आयुष्य किती भयाण असते. सोशिकतेचा अंत बघणारे असते. याचा प्रत्यय या कवितेवरून वाचकाला येतो. विठाबाई ज्या वर्गाचं प्रतिनिधित्व करते ती समाजातला उपेक्षित घटक आहे. त्यातही तिचं स्त्राr असणं शोषणाची पातळी वाढवणारं आहे.' जन्मापासून आमाला 'खालचे' म्हणूनच शिकिवल्या गेलं. हिणवल्या गेलं. त्या काळी आमा म्हारा-मांगांच्या हातात डफडं, गळ्यात गाणं अन् पायात चाळ व्हते. दुसऱ्यासाठी वाजवायचं, गायचं, त्यांना रिझवायचं-नाचायचं अन् अख्खा जनम त्यांच्यासाठी नासवायचा. पण खरं सांगू? आज मला लई बरं वाटतं. मी लोकाम्होरं गायले. नाचले अन् त्यान्ला आनंद दिला. आमी दुःखात राह्यलो पण लोकांना सुख दिलं. स्वत दुःखात राहून दुसऱ्यांना सुख देणं ही पण एक कला हाय. टीचभर खळगी भरण्यासाठी आमी हातात डफडं-तणतुणं घेतलं आन् पायांत चाळ बांधले..." (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) अशा प्रकारे जीवन भाष्य करणारी विठाबाई व तिचं आयुष्य हा या कवितेचा विषय आहे. त्यात मानवतेचा संदेश देणारा आशय भरलेला आहे. भारतीय समाजातील उतरंडीत अत्यंत शेवटच्या स्तरावर असलेल्या देवदासी, तमासगीर अशा स्त्राrवर्गाच्या वाट्याला आलेलं दुःख व आयुष्यभराचे भोग, पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना करावा लागणारा संघर्ष हा या दीर्घकवितेतून कवयित्रीने समर्थपणे मांडला आहे. ही कविता समाजातील तळागाळातील वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'विठामाय'ची जीवनगाथा सांगते.

'विठाबाई!

ही शोकांतिका नाही फक्त तुझी

बामणाघरी लिवणं

कुणब्याघरी दानं

आन् आपल्याच बिरादरीच्या रक्तात वाहतंय गाणं.."(आ.ल.प्रा., पृ.२८)

मांग या अतिशूद्र जातीतून आली असल्याने उच्चवर्गीय व पुरुषप्रधान प्रस्थापित मूल्य संस्कृतीने नाकारलेल्या तमाशातील भोगदासी म्हणून हिणवली गेलेली व आपल्या कलेने

पायात घुंगरु बांधून प्रपंच चालवविणारी ही 'विठामाय' मराठी साहित्यातील विद्रोही लेखन परंपरेशी नाते सांगणारी आहे. या कवितेच्या निर्मितीविषयी स्वत कवयित्री सांगतात,'मला वाटतं, कविता आपली संबंध व्यवस्था घेऊन दृगोच्चर होत असते. त्यामुळे माझ्या कवितेत नुसतं व्यक्ती असणं, नुसतं स्त्री-पुरुष असणं एवढंच नाही, तर त्यांच्या नात्यातला उबदारपणा, तरलता, परस्परांबद्दलची प्रगाढ ओढ, नात्यांवरचा खोलवर विश्वास जसा दिसतो, तसंच राजकारण आहे, समाजकारण आहे. इतिहास आहे, त्यातली भौतिक द्वंद्वात्मकता आहे. मिथ्यकथांचा, रूपकांचा अन्वय लावणं, मिथकांना समकालात आणून ठेवणं, नविन मिथकं निर्माण करणं हे सगळंचं एकवटून कवितेत येत असतं. कवितेची अशी धारणा माझ्या मनात असल्याने कविता लिहिणं ही माझ्यासाठी सहजसोपी बाब राहत नाही. गमतीगमतीतच लिहिलंय असं घडत नाही. खरंतर माझ्या प्रत्येकच कवितेनं मला अस्वस्थ केलेलं आहे. तरीदेखील इथे मी थोर कलावंत विठाबाई भाऊ मांग नारायणगावकरांच्या जगण्यावर मी दीर्घ कविता लिहिली. ही कविता मी टप्प्याटप्प्यानं लिहीली. सुरुवातीला जो कवितेचा तुकडा मी लिहिला तेव्हा हा अंतिम असेल असं मला वाटत होतं, त्यामुळे तो 'उत्कट जीवघेण्या धगीवर' या माझ्या दुसऱ्या संग्रहात आला. पण त्यानंतरही विठाबाई माझ्या मनातून जाईना. ती दोन कारणांसाठी. विठाबाईचं काम हिणकस आहे, दलित स्त्रीच्या लैंगिकतेचा वापर करणारं आहे, भाकरी आणि लावणीमध्ये फारकत करता न येण्याजोगी विवशता त्याच्यामध्ये आहे, शोषणाचं प्रतीक आहे हे सगळं तर आहेच. पण तरीसुद्धा हे सगळं विठाबाई ज्या व्यवस्थेतून आलेली आहे त्या व्यवस्थेतून उद्भवतं. त्यात तिचा काय दोष? तिला लाज वाटावी असं यात काय आहे? तिचं शोषण होतं हे खरं असलं तरी ती अत्यंत टणकपणाने त्याचा सामना करते. ही लढाई ती सुखासुखी करते असं मी म्हणणार नाही, पण सगळी रग आणि धग घेऊन ती जगते, 'पोटासाठी नाचते मी, पर्वा कुणाची' असं परखडपणे म्हणणारी विठाबाई माझ्या कवितेची नायिका बनते." (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर ही मांग समाजातील भाऊ मांग आणि धर्मातील ख्रिस्ती समाजातील मॅट्रिकपर्यतचं शिक्षण झालेली शांताबाई याचं चौदावं अपत्य. नारायणगावात दवंडी देण्याचं काम करणारी तिची आजी ही जातीच्या उतरंडीची पाईक होती. पठ्ठे बापुरावांचा तमाशा हा भाऊ मांग याच्या आयुष्याला वळण देऊन गेला. त्याने घरातील व पत्नीच्या अंगावरील धन-संपत्ती विकून फड उभारला व तमाशाचे संस्कार लहानग्या विठाच्या मनावर झाले. १९६२ साली विठाबाई पहिल्यांदा बोर्डावर उभी राहिली. 'रक्तात न्हाली कुऱ्हाड' या वगानं ती प्रसिद्धीच्या झोतात आली. गाणं, नृत्य आणि अभिनय अशा तिनही कलांवर हुकुमत असणारी विठाबाईची प्रेक्षकांवर पकड होती. तल्लख बुद्धी, हजरजबाबी, व प्रेक्षकांवर चेटूक करणारी नजर यामुळे तिने अत्यंत हिकमतीने ही कला वृद्धिंगत केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळचळीत आपल्या शाहिरीनं झंझावात निर्माण करणारे शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, गव्हाणकर यांच्या प्रभावात लढाऊ विठाबाईने परिवर्तनाचा आशय वगांच्या माध्यमातून रसिकांपर्यंत नेला. "विठाबाईच्या बाबतीत बोलायचं झालं, तर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्यानंतर लोककलेची तन, मन, धन अर्पून सेवा करणारी हीच एकमेव कलावंतीण होय!" (योगिराज बागूल, तमाशा: विठाबाईच्या आयुष्याचा; राजहंस प्रकाशन, पहिली आवृत्ती, २००४, पृष्ठ दहा) भारत-चीन युद्धादरम्यान भारतीय सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी नेफा आघाडीवर विठाबाईचा तमाशा नेला. त्याबद्दल विठाबाई म्हणते,'... भारत-चीनच्या लढाईत जवानांची करमणूक करण्यासाठी मी

नेपा आघाडीवर गेले व्हते. तिथं आमच्या रक्ताचे जवान गारव्यात देशासाठी लढत व्हते. देशाच्या सीमा रक्षणासाठी आमच्या म्हारामांगाच्या जवाणांनी लढायचं, पण गावाच्या येशीतून मातर आमच्या नवरदेवाला जाऊ द्यायचे नाही, अशी ही आमच्या देशातल्या लोकांची रहारीत!...” (प्रज्ञा दया पवार, आरपार लयीत प्राणांतिक, लोकवाङ्मय गृह, मुंबई; द्वि. आ. २०१०, पृ.११) लोककलावंत म्हणून जगतांना केवळ पोटाची खळगी भरणे एवढंच उद्दीष्ट न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणिव ठेवून विठाबाई जगली. आलेले सारे कठीण प्रसांगांना आनंदाने सामोरे गेली. तिच्या या माणूसपणाच्या जगण्यामुळेच ती अभ्यासाचा विषय ठरली. स्वतचे दुःख विसरून दुसऱयाचे अश्रु पुसणारेच नेहमी संशोधनाचा विषय ठरतात. प्रज्ञा पवार लिहितात,

‘विठामाय

हे तुझे सन्मान

राष्ट्रपती पदकापासून संगीत नाटक अकादमीपर्यंत

हि तुझी आख्यायिका बहुचर्चित

सेमिनार संस्कृतीतली

या डॉक्युमेंटऱ्या तुझ्या, हे सिनेमे तुझ्यावरचे

ही थोर्थोर मंडळी विद्यापीठातली

डोकं खाजवत बसलेली

तमाशातल्या स्त्री-तत्त्वावर

शोधनिबंध वाचणारी

हे लावणी-महोत्सव

तुला सलाम करण्यासाठी....” (आ.ल.प्रा., पृ.५२)

आपल्या कलेच्या माध्यमातून समाजकार्य करणारी विठाबाई स्वतच्या आयुष्यात मात्र अनंत अडचणींच्या शृंखलेला सामोरी गेली. ‘तुझ्याशिवाय आता मला जगणं शक्यच नाही’ असं सांगत तिच्या ऐन तारुण्यात ‘मारुती विष्णू सावंत’ नावाच्या सधन पुरुषानं तिच्याशी लग्न केले आणि इथूनच तिच्या शोषणाचे नवे पर्व सुरू झाले. तिची सारी मिळकत लुबाडून त्यांच्या आठ मुलांना तिच्या पदरात टाकून मारुतीने तिला वाऱयावर सोडले.

‘विठामाय, अगं तुझं पासबुक घेतलं छिनून

त्या मारुती सावंतने

तुझी लवलवती फिगर घेतली छिनून

त्या मारुती सावंतने

तुझं अस्खलित माणूसपण घेतलं छिनून

त्या मारुती सावंतने

घेतलं छिनून

तुला

तुझ्याचपासून....” (आ.ल.प्रा., पृ. ४८)

या पुरुषी संस्कृतीचा ती बळी ठरायची पण तिची कलेवर असणारी निष्ठा आणि मनगटातील ताकद तिला बळ देऊन गेली. तिने स्वतचं कुटुंब कर्त्याची भूमिका घेऊन सांभाळलं. याच विठाला उतारकाळात मात्र औषोधोपचारासाठी वणवण करावी लागली. १९५०ते १९७० वीस वर्षे साम्राज्ञीपद भोगणारी विठा; सांगवीकर नावाच्या ढोलकी-फडात नाईटवर काम करुन आपला उदरनिर्वाह करत होती. प्रवरानगरला झालेल्या दलित नाट्यसंमेलनात अध्यक्षपदावर असतांना दिलेल्या प्रतिक्रियेतून स्व-भान, कला-भान आणि समष्टी-भान अधोरेखित करतांना ती म्हणाली, “...मला दिल्लीत राष्ट्रपतीपदक मिळालं, माझ्या बापाच्या तमाशाला पण राष्ट्रपतीपदक मिळालं व्हतं. भाऊ-बापूनं (मांग) आणि विठाबाईनं पुण्यातल्या नारायणगावाचं नाव जगात मोठं केलं. दिल्लीतल्या तक्तापर्यंत नेलं. महाराष्ट्र शासनानं महाराष्ट्र गौरव पुरस्कार आणि एक लाख रुपये दिले. पण खरं सांगू का? तेवढच खीणभर जगल्या-सारखं वाटले. अजून माझ्या अन् तमाशा कलावंतांच्या जीवनातल्या अधार गेला नाही.” (प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३) समाजातील अंतर्विरोधावर विठाबाईने मार्मिकपणे बोट ठेवले. या शब्दातून तिच्या मनात सतत सलत असणारी बोच व्यक्त झाली.

विठाबाई आपले सारे आयुष्य लढवय्यासारखी जगली. तिच्या कलेने तिने समाजाची व कुटुंबाची सेवा केली. आयुष्यात आलेली आव्हाने पचवली. मान-सन्मानाने भुलून न जाता सतत मातीशी आपले घट्ट नातं ठेवणारी विठाबाई आपल्या आविष्कारांसह प्रज्ञा पवार यांच्या कवितेतून अवतरते. कवयित्रीच्या जाणिवा अत्यंत प्रगल्भ असल्याने ती विठाबाईच्या साऱ्या वैशिषटयांसह तिला समर्थपणे कवितेतून उतरवते. विठाबाईला प्रत्यक्ष बघितल्यावर आपल्या कवितेत चितारलेली ‘विठामाय’ तिला हुबेहुब वाटते व कवयित्री म्हणते, “एका गोष्टींच मला नवल वाटलं की, तिला प्रत्यक्ष पाहण्या भेटण्या आधीपासूनच तिची जी प्रतिमा मी पाहिली होती, अनुभवली होती आणि ज्या थेटपणानं विठाबाई माझ्या कवितेतून साकारत होती. अगदी तश्शीच होती ती. तसूभरही फरक नाही. तीच लवलव, तीच आरपार छेदत जाणारी मेदक नजर, तोच अस्सलपणाचा पीळ.... तीच अस्खलित विकारांची, मन बाजिंद्या - मिठीदिठीची अदा. अभिजात वारुळं छिनभिन करणारा तोच रांगडा रासवट आविष्कार.” (प्रज्ञा दया पवार, आरपार लयीत प्राणांतिक, लोकवाङ्मय गृह, मुंबई; द्वि. आ. २०१०, पृ.१२) प्रज्ञा पवार यांनी आपल्याला उमगलेली विठाबाई अशा शब्दात व्यक्त केली. त्यांच्या या दीर्घ कवितेतून विठाबाई उलगडत जाते. एक स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले जगणं व त्याचे सारे बारकावे, सामाजिक वास्तवाचं भान, व अनंत अडचणींना तोंड देत समर्थपणे उभी राहीलेली विठा या कवितेतून वाचकांना भेटते. ती आपल्या जगण्याचा भाग असल्यासारखी वाटते. अदिम स्त्रीच्या अस्तित्वाला समर्थपणे

पेलणारी जगण्याचा गुंतागुंतीला अलगद सोडवण्यासाठी धडपडणारी, समाज वास्तवाची दाहकता अनुभवणारी विठा या कवितेतून सतत वाहत राहते. परंपरा, रुढी, जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता, पिळवणूक, या साऱ्यांचा जहरी अनुभव घेणारी विठा साऱ्या शोषणव्यवस्थेला नकार देते व स्वतंत्रपणे समर्थपणे उभी राहते. आरपार लयीत प्राणांतिक! 'स्त्री केंद्रित दृष्टिकोनातून सांस्कृतिक, नैतिक मूल्यांच्या पुनर्मांडणीची आग्रही मागणी करते. त्यासाठी ती प्रचलित, सामाजिक, नैतिक मुल्यांना आव्हान देते. तिच्या दृष्टीचा पैस मोठा आहे. म्हणूनच समकालीन, नागरी, ग्रामीण, भूतकालीन, दलित, ग्रामीण, मुस्लिम अशा सर्व स्त्रियांकडे ती एक निखळ स्त्राr म्हणून बघू शकते." (मानसी लाटकर; १९९० नंतरची मराठी स्त्रीवादी कविता; कविता-रती/मे-जून २०१०) इथे कवितेची वैश्विकता सिद्ध होते. या कवितेने स्त्री वर्गाचे शोषणाची कारणं मांडतांना सामाजिक परिस्थितीचा विचार केला आहे तसाच स्त्री  मानवर लादलेल्या परंपरांचाही विचार दिसतो. स्त्री  स्वत:च अनेक संकल्पनांना वागवत जगत असते. ती स्वतला समाजाच्या नजरेतूनच बघते. त्यात तमाशा कलावंतिणीसारख्या पठडीतून बाहेर पडलेल्या स्त्रियांनाही सुटका नाही. त्या जरी वर्तुळातलं जगणं जगत नसल्या तरीही त्यांच्या आयुष्यात आलेल्या पुरुषाला त्या 'पती'चा दर्जा देतात व शोषणाला सामोरे जाण्यासाठी तयार होतात. स्वत सतत कष्ट करून उभारलेलं साम्राज्य एका पुरुषाच्या हाती देऊन त्याच्या हातातलं खेळणं बनतात. हे सारे बारकावे टिपणारं साहित्य स्त्रिवादी असतं. यातून स्त्रिला तिच्या अस्तित्वाचं भान निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो तसा तो याही कवितेतून दिसतो आहे.

'अजून किती काळ

हा भुकेचा आदिम वग चालणार?

अजून किती काळ तुझी बुगडी

अश्शीच सांडत राहणार?

अजून किती काळ

तू आतड्यातल्या आणि आतड्यापल्याडच्या

जीवघेण्या येरझाऱ्या

घालत राहणार?

…

आरपार लयित प्राणांतिक

किती काळ

वंचनेचं गाणं

तू घेडत राहणार वलयांकित?" (आ.ल.प्रा., पृ.५३)

फुले-आंबेडकरी विचारांतून उभे राहिलेले स्त्रीवादी साहित्य स्त्रीला माणूस म्हणून उभं करायचा प्रयत्न करते. मानवतावादी दृष्टीकोनातून स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी कटीबद्ध असलेले हे साहित्य आहे. प्रज्ञा यांची कविता ही स्त्रीवादातून मानवतावादाकडे जाणारी आहे. 'ही कविता स्त्रीप्रश्नांची केवळ वरवर मांडणी करीत नाही. त्यामागे असणाऱ्या गुंतागुंतीच्या सामाजिक, राजकीय, जैविक कारणपरंपरेचा, प्रकृती-विकृतीचा शोध घेते. म्हणूनच खऱया अर्थाने मानवी जीवनाची साकल्याने समज असलेली अशी ही सशक्त स्त्राrवादी कविता आहे."(प्रा. पुष्पा भावे, अंतस्थ, प्रस्तावना, पृष्ठ अठरा) विठाबाईची शोकांतिका मांडतांना चौफेर विचार करत सारे कंगोरे तपासत ही कविता उतरली आहे. यात जसा विठाबाईच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास आहे तसाच तिची जैविक परंपरा, व स्त्री असण्याच्या साऱ्या  खुणा व त्यामुळे तिचे आयुष्य जे शोषणाचा पट उभा करते त्या साऱ्याची कारणमीमांसा करत ही कविता समर्थपणे उभी राहते.

## ४.५ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील आविष्करण / अभिव्यक्ती पद्धती

कवयित्री प्रज्ञा पवार यांच्या कवितेत साधी सरळ भाषा वापरलेली आहे. उपरोधिकता, रोकठोकपणा हे वैशिष्ट्य आहे. व्यक्तिचित्रणे जी आलेली आहेत त्यातून प्रज्ञा आपली स्वतंत्र दृष्टी मांडतात. त्या-त्या व्यक्तींविषयी, घटनांविषयी सरळसोट, निर्भिड विधाने हा त्यांच्या कवितेचा गुण म्हणायला हवा. त्यामुळे कविता क्लिष्ट न होता वाचकास समजण्यास साधी, सोपी वाटते. या कवितांतून गुंतागुंतीचा प्रतिमाव्यवहार आढळतो. "प्रज्ञा लोखंडे यांची कविता आत्मशोध, व्यक्तिशोध आणि स्वसमाजशोध अशा तिहेरी पेचाची कविता आहे. विशिष्ट जातिधर्मांच्या पलीकडे जाऊन शोषक-शोषित संबंधाचा विस्तृत आणि सर्वांगीण शोध घेणे, त्यासाठी एतद्देशीय स्त्रीप्रतिमा, व्यक्तिरेखा आणि मिथके ऐतिहासिक कालपटावर पाहून स्त्रियांच्या व्यथांना आणि त्या अनुषंगाने समाजजीवनातील पेचांना काव्यबद्ध करणे, ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत." २९ प्रज्ञा यांच्या अंतस्थ, उत्कट जीवघेण्या धगीवर, मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा, आरपार लयीत प्राणांतिक या कवितासंग्रहात आलेल्या प्रतिमा पाहिल्यास याची प्रचिती येते. फुले-आंबेडकरी साहित्य स्त्रीलेखनात समाजातिल विषमतेविषयीची चीड संताप, आपल्या शोषणाचा, घुसमटीचा आक्रोश, विद्रोह, आणि स्वतंत्र माणूस म्हणून उभी राहण्यासाठीचा स्त्रीचा प्रयत्न हे सारे विशेष स्पष्टपणे व्यक्त होतात.

आपल्या विचारांची शिदोरी देतांना खास करून स्त्रीवर्गाला जो शोषित गट आहे त्यांना समजण्यास सोपी तसेच आपली मानवतावादी विचारसरणी त्यांच्या रुजवणारी, त्यांना या गुलामगिरीविरुद्ध विद्रोह करायला ताकद मिळवून देणारी, स्व-अस्तित्वाबद्दल भान निर्माण करणारी आणि एकंदरितच माणूस म्हणून जगण्यास प्रेरणा देणारी अशीच ही अभिव्यक्ती पद्धती आहे.

## ४.६ 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील वर्ण, जात, वर्ग वास्तव

"विठाबाई !

ही शोकांतिका नाही फक्त तुझी

बामणाघरी लिवणं

कुणब्याघरी दाणं

आन आपल्याच बिरादरीच्या रक्तात वाहतय गाणं..”

या शब्दातून कवयित्री संपूर्ण समाजातील जातीची उतरंड एका दृष्टीक्षेपात व्यक्त करते. जातवास्तव जन्मापासून माणसाला चिकटलेलं असतं. जन्माप्रमाणे जात ठरते आणि जातीनुसार काम. वर्णव्यवस्थेचे जातव्यवस्थेत जेव्हापासून रूपांतर झाले तेव्हापासून समाजाची चार भागात विभागणी झाली. गुणानुसार असणारी वर्ग जन्मानुसार जात रूपात परिवर्तीत झाला. याची कारणे इतिहासात सापडतात. कलावंतीण म्हणून जन्माला आलेली विठाला वयाच्या अवघ्या ७ व्या वर्षीच शिक्षण सोडून पारंपारिक व्यवसाय स्वीकारावा लागतो. ही जात वास्तव व वर्ण वास्तव वर्ग वास्तवात रूपांतरित होताना दिसतन.

“जातचरित्र वर्गचरित्र स्त्रीचरित्र

ही नाहीये चटकन वाचून संपण्यासारखी

गोष्ट

हा नाहीये योगायोग निव्वळ आपघातचा

समष्टी घडत जाते उतरंडीच्या असीम विषम अनुभूतीने

आणि

बाई लहरते झेंड्यासारखी

अख्ख आयुष्य सरहद्दीशी ईमान राखून”

जातीची उतरंड तिला सन्मानाचे आयुष्य जगू देत नाहीत तिला प्रत्येक स्तरावर लढा द्यावा लागतो. दलित स्त्रीचा लढा हा तीन स्तरावर असतो. फुले-आंबेडकरी विचारांचा वारसा घेऊन निघालेल्या स्त्रीया लिंगभेद, जातभेद याला न जुमानता आपला लढा सुरू ठेवत असतात. हा लढा आही पुरूशीसत्तेशी व त्यातून निर्मान झालेल्या जात व्यवस्थेतील उतरंडीशी.

## ४.७ ‘आरपार लयीत प्राणांतिक’ मधील लिंग भेदाचे वास्तव

लिंग - भेदाचं वास्तव शब्दातून उर्तते तेव्हा शब्द अधिकच धारदार होत जातात. समाजाचा अर्धा भाग असलेला स्तरीगटाला अनेक हजार वर्षापासून शोषण सहन करावे लागले आहे. आजही जरी वरवर पाहता समानता आली असे भासत असले त्री घराघरात स्त्रीची अवस्था गुलामाप्रमाणेच आहे. स्वातंत्र्य विचारांचे, निर्णय घेण्याचे, आर्थिक, सामाजिक समान दर्जा मिळण्याचे अजूनही पूर्णत: मिळालेले नाही. ही सारे वास्तव विठाबाईच्या जीवनपटातून कवयित्री मांडते आहे. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले दु:ख व वेदना यांचा टाहो या दीर्घकवितेतून फोडलेलला दिसतो.

"जमिनीइतकं साधन आणि सोपं

तुला राहू दिलं नाही त्यांनी

वस्तूजातामध्ये रूपांतर होत गेलं तुझं

सभ्य सांस्कृतिक आपरिहार्यतेनं

छिनलं तुला

तुझ्याचपासून

पायात चाळ बांधून

यावं लागलं तुला

पुरुषी अरेरावीच्या गचपनात

तूही नाचलीस

रुद्र अद्भुत

प्रतिरूपांची मोहमाया

पिंजऱ्यातच होतीस तू

तरी दिसली नाहीस कधी

गुलामासारखी

असहाय सुंदर

तू गात राहिलीस

तमाम स्त्री- पुरुषांच्या

जैविक दलदलीचं गाणं

मनस्वी

मनमुक्त!"

या ओळी वाचकाला आंतर्मुख करतात. नर-मादी यापलीकडे न बघणाऱ्या समाजाला रिझवण्यासाठी या जैविक दलदलीत विठाबाई रोज गाणं आणि अदाकारी सादर करते. ती रसिकला मायबाप मानते पण समोर बसलेला पुरुषवर्ग तिच्याकडे केवळ मादी म्हणून पहात असतो. तरीही पायात चाळ बांधून ती पुरुषी अरेरवीच्या गचपानंत नाचत राहते. आपल्या कळेल सर्वस्व मानत ती कला सादर करत राहते. तिचं वस्तूजातात झालेलं रूपांतर तिला समजत नाही.

"बाई म्हणजे

निव्वळ लैंगिक अवयवांचा कंटेनर

मांसल मांसल

उत्तान उत्तान

चाळवणारी

ढळवणारी

ढळणारी

चळणारी" स्त्रीविषयी असा विचार करणाऱ्या पुरुषाबाबत विठाबाईला ती सांगते,

"एखादा तरी माई का लाल

कधी वाचू शकेल का

तुझ्या प्राची कुशीतला

न आदिम आनंदी गर्भाषयातला

नित्यनूतन ओलसर अंधार"..

## ४.८ 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेतील फुले-आंबेडकरवाद

**१. माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेणारी कविता:**

प्रत्येक कवीची स्वतःची अशी एक भूमिका असते. ही भूमिका कोणत्याही धर्माची, पक्षाची अथवा सामाजिक संघटनेची नसते तर या कोणत्याही चौकटीत न बसणाऱ्या विशिष्ट व्यक्तीची, माणसाची असते. कवीचं एक व्यक्ती म्हणून त्याच्या साहित्याच्या निर्मितिप्रक्रियेशी नातं असतं. ते अत्यंत गुंतागुंतीचं असलं तरीही आपली जीवनविषयक भूमिका घेऊन जसेच्या तसे साहित्यात अवतरणारे कवी, लेखक यांच्या साहित्यातून ते अलगद उलगडत जातं. प्रज्ञा या प्रथमतः एक कार्यकर्ती आहेत व तेच त्यांच्या साहित्यातूनही अवतरत असतं. माणसाचा अस्सलपणा आणि व्यवस्थेतला रचितपणा यांच्यातील परस्परसंबंधाचा शोध प्रज्ञा यांनी या कवितांतून घतलेला आहे. माणसाच्या अस्सलपणाचा शोध घेणं ही या कवितेची मूळ प्रेरणा आहे.

**२. जीवनाविषयीची मानवतावादी दृष्टी:**

कवी कुसुमाग्रजांचे शुभेच्छापत्र आणि प्रा. भालचंद्र पाटील यांची प्रस्तावना प्रज्ञा यांच्या अंतस्थ या कवितासंग्रहाला मिळणे हीच त्यांच्या नवदृष्टीची पावती म्हणता येते. दलित कवींची कविता ही तेच ते विशिष्ट अनुभव व्यक्त करणारी व एक विशिष्ट पद्धतीची शब्दकळा वापरणारी होती त्याला नवे परीमाण देणारी प्रज्ञा यांची कविता दलितत्वापलीकडील

अनुभव कवितेत मांडणारी अशी आहे. दलित कवींच्या तिसऱ्या पिढीचं प्रतिनिधित्व करणारी कविता आहे. नकार आणि विद्रोह यांचा ढोबळपणा फोडण्यात मिळालेले यश त्यांची कविता अधोरेखित करते. हेही कवितेचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणून लक्षात येते. सांकेतिकतेनं भाषेच्या, प्रतिमांच्या, विचारांच्या संकेतांच्या पलीकडे पाऊल टाकण्याची शक्ती प्रज्ञा यांच्या निर्मितीचं वेगळेपण दाखवणारी आहे. त्यांच्या कवितेतील जग हे केवळ दलित अनुभवांपुरतं मर्यादित नसून विस्तारलेलं आहे. त्यांची जीवनाविषयीची समजूत हे त्यांच्या कवितेचं मोठं बळ आहे.

### ३. आत्मशोध, व्यक्तिशोध आणि स्वसमाजशोध या तिहेरी पेचाची कविता:

या कवितेने सर्व शोषित गटांच्या दुःखाला, वेदनेला वाचा फोडली आहे. विशेषतः स्त्रीच्या त्रिस्तरीय दुःखाचा आलेख प्रज्ञाची कविता मांडते. स्त्रीवादी जाणीव झाली असल्यामुळे प्रत्येक स्त्रीने गुलामी नाकारणं आणि स्वतः स्वतंत्र उभं राहणे कवयित्रीला महत्त्वाचे वाटते. प्रज्ञा यांचे लेखन शोषणाला विरोध करणारे, स्व-अस्मिता जपणारे व स्त्री म्हणूनच नव्हे तर माणूस म्हणून स्वतंत्र उभे राहण्याचा प्रयत्न करणारे आहे. स्वतःच्या अस्तित्वाची एकही खूण सापडत नाही असे हे निबिड अरण्य ज्यात अनेक भेदाभेदांच्या संकल्पनांचं रान माजलं आहे; जिथे माणसाला कोणतेही मूल्य नाही, त्याच्या असण्याला महत्त्व नाही. सतत अनामिक भीतीने या व्यवस्थेवर आपली सत्ता गाजवली आहे. अशा प्रचंड मोठ्या हुकूमशाहीत कवयित्री ‘स्व’ चा शोध घेते. हा शोध तिच्यातील ‘अंतस्थ’ चा आहे. प्रज्ञा यांची कविता आत्मशोध, व्यक्तिशोध आणि स्वसमाजशोध या तिहेरी पेचाची आहे. यातील आत्मशोध घेताना प्रज्ञा गुलामगिरीला नकार देतात, त्याविरुद्ध विद्रोह करतात. हा संयत विद्रोह स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर आळवताना दिसतो.

### ४. चळवळीतील कार्यकर्ती म्हणून उपायात्मक पावले उचलण्याची क्षमता:

स्त्री-पुरुष या एकमेकांना पूरक असणाऱ्या मानवांनी रूढी, परंपरेच्या अधीन राहून जेव्हापासून स्वतःविषयीच्या विविध संकल्पनांच्या चौकटीत बसवले तेव्हापासून त्यांच्यातील समानता दूर होऊन शोषक-शोषित अशी विभागणी झालेली दिसते याचेच पर्यवसन त्यांच्या एकाकी जगण्यात झाले. प्रज्ञा यांच्या कवितेतून स्त्री वर्गाच्या एकाकीपणाचे दुःख प्रातिनिधिक स्वरूपात दिसते. स्त्रियांचे प्रश्न मांडतांना तिचं माणूसपण प्रज्ञा सतत आपल्या कवितेतून रेखाटते. तिचा जगण्याचा हक्क, स्वतःच्या आयुष्यावरचा हक्क ती अधोरेखित करतात स्त्रीवादी जाणिवेतून निर्माण होणारे हे साहित्य मानवतावादी होत जाते. मनुवादी परंपरेने घातलेलं कुंपण शतकानुशतके भारतीय समाजाला उद्ध्वस्त करत राहिले. ही परिस्थिती बदलली पाहिजे याचे सामाजिक भान प्रज्ञाच्या कवितेतून येते. चाकोरीबद्ध, सांकेतिक अशी दलित स्त्रीची प्रतिमा प्रज्ञा मोडीत काढतात. स्त्रीला स्वतंत्र स्थान प्राप्त व्हावं म्हणून त्या सतत प्रयत्नशील असताना दिसतात. स्त्रीवादी जाणिवेतून स्त्रीमुक्तीकडे जाणारा, मानवमुक्तीकडे जाणारा विचार प्रज्ञा या कवितेतून समर्थपणे मांडतात. चळवळीतील कार्यकर्ती असल्याने केवळ लिहून त्यांच्या भावनांचा निचरा होत नाही तर त्यावर उपायात्मक पावले उचलण्याची क्षमता त्यांच्यात आहे, तसे त्या करतात.

**५. व्यक्तिशः आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब:**

या कवितासंग्रहांतून प्रज्ञा व्यक्तिशः आलेल्या अनुभवांतून व्यक्त होताना दिसतात. त्यांचं जगणं हे काहीसं व्यवस्थेच्या टाकाऊ कल्पनांना नकार देणारं स्त्रीवादी भूमिकेतून सतत लढणारं आणि अंतिमतः मानवतावादाची कास धरणारं आहे. या लढ्यात त्यांना अनेक पडझडीचे अनुभव आले असतील त्याचे प्रतिबिंब या कवितांतून पडलेले दिसते. प्रज्ञा या स्त्रीवादी कवयित्री आहेत त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा स्त्रीवाद हा स्त्रीला स्वतंत्रपणे माणूस म्हणून उभा करू पाहतो.म्हणूनच हा स्त्रीवाद अंतिमतः मानवतावादाकडे जाणारा आहे असे म्हणता येते.

**६. स्त्रीवादी जाणिवेतून स्त्रीमुक्तीकडे जाणारा, मानवमुक्तीकडे जाणारा विचार:**

प्रज्ञा असा विचार या कवितेतून समर्थपणे मांडतात. स्त्रीत्व, त्याचे विविध स्तर, स्त्री-पुरुष नातेसंबंध, या नातेसंबंधावरील सामाजिक परिस्थितीचे परिणाम, व्यक्तिमूल्याचा शोध, समाजपरिवर्तनाची ओढ या कवितांतून विषय बनून येतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या चतुःसूत्रीचा जागर प्रज्ञा यांची कविता करते. स्त्री म्हणून स्वतःला व इतर स्त्रियांना आलेले अनुभव त्या समर्थपणे रेखाटतात. सहसंवेदना हा या कवितेचा प्राण आहे. स्त्रीचे स्वातंत्र्य व माणूस म्हणून तिला असलेले मूल्य याचा शोध प्रज्ञा घेतात. तसेच याहीपुढे जाऊन स्त्रीवादी कार्यकर्ती म्हणून त्या समर्थपणे उभ्या राहतात. स्वतःबरोबर इतर स्त्रियांनाही स्वतंत्र करू इच्छितात व त्यासाठी प्रयत्नशील असतात. अदिम स्त्रीच्या अस्तित्वाला समर्थपणे पेलणारी जगण्याच्या गुंतागुंतीला अलगद सोडवण्यासाठी धडपडणारी, समाजवास्तवाची दाहकता अनुभवणारी स्त्री त्यांच्या कवितेचा विषय बनते. परंपरा, रूढी, जातिभेद, धर्मभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता, पिळवणूक, या साऱ्यांचा जहरी अनुभव घेणारी स्त्री साऱ्या शोषणव्यवस्थेला नकार देते व स्वतंत्रपणे, समर्थपणे उभी राहते.

**७. समृद्ध आंबेडकरी जाणिवेची कविता:**

जातिविहीन दुःखमुक्त माणूस उभारण्याचे प्रयत्न या कवितेतून समर्थपणे केलेले दिसतात. जात, धर्म, पंथ, भाषेची बंधने मानवी जीवनाचा उत्कर्ष व्हावा, माणुसकीची प्रतिष्ठापना व्हावी यासाठी ही कविता धडपड करताना दिसते. संशोधनातून पुढे आलेल्या या मुद्द्यांचा विचार करता ही कविता संपूर्णतः मानवतावादी कविता आहे असे ठामपणे मला वाटते.

गुलामगिरीला नकार, संयत विद्रोह, स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर, स्त्री-पुरूष नात्याचा नव्याने शोध,पुरुषसत्ताक परंपरेतील प्रतिमा प्रतीकांना नकार, संदर्भ उलटे करून तपासून पाहण्याची वृत्ती,स्त्रीवर्गाच्या दुःखाचे प्रातिनिधिक स्वरूप, स्त्रीवादी विचारसरणीतून स्त्रीकडे बघण्याची दृष्टी, एका चाकोरीबद्ध, सांकेतिक अशा दलित स्त्री-प्रतिमेला कवितेतून शह, मूल्यभान राखणारी कविता, माणसाशी असलेली सहसंवेदना, व्यक्तिशः आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब, स्त्रीवादी जाणिवेतून स्त्रीमुक्तीकडे जाणारा, मानवमुक्तीकडे जाणारा विचार, चळवळीतील कार्यकर्ती म्हणून उपायात्मक पावले उचलण्याची क्षमता, समृद्ध आंबेडकरी जाणिवेची कविता, जातिविहीन दुःखमुक्त माणूस उभारण्याचे प्रयत्न अशी आशयाच्या दृष्टीने वैशिष्ट्ये प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेत प्रकर्षाने जाणवतात. अभिव्यक्तीच्या अंगानेही प्रज्ञा पवार यांच्या कवितेत प्रतीकं,मिथकं यांचा फार वापर नसला

तरी उद्देशिका म्हणता येतील अशा काही कविता येतात. पुरुषप्रधान संस्कृतीने रचलेल्या स्त्रीविषयक प्रतीकांना प्रज्ञाची कविता विरचित करते. प्रतिमांचा वापर कवितेच्या आशयाच्या अनुषंगाने होतो. स्वतःची नविन भाषाशैली. वाचकांच्या मानाचा ठाव घेणारी भाषा, नवीन प्रतिमा, प्रतीके व मिथकांचा सीमित वापर, साधी सरळ पण निर्भीड विषयाला हात घालणारी भाषा ही या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. त्यात कोणताही असंबद्धपणा अथवा क्लिष्टता नसून वाचकाच्या मनाचा ठाव घेणारी आहे. प्रज्ञा यांची कविता पुरुषरचित मिथ्यकथांना विरचित करत स्त्रीवादाला बळकट करते. बाई म्हणून स्त्रीवर लादलेले अनेक नियम झुगारून उपरोधिकपणे त्यांना जाब विचारत मानवतावाद बळकट करू पाहते.

**'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेची वैशिष्ट्ये:**

प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेची वैशिष्ट्ये साररूपाने मांडल्यास या कवितेची जातकुळी समजते. माणसाच्या अस्सलपणाचा शोध; जीवनाविषयीची मानवतावादी दृष्टी; आत्मशोध, व्यक्तिशोध आणि स्वसमाजशोध या तिहेरी पेचाची कविता; चळवळीतील कार्यकर्ती म्हणून उपायात्मक पावले उचलण्याची क्षमता; व्यक्तिशः आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब; स्त्रीवादी जाणीवेतून स्त्रीमुक्तीकडे जाणारा प्रवास; मानवमुक्तीकडे जाणारा विचार मांडण्याची क्षमता; समृद्ध आंबेडकरी जाणिवेची कविता ही वैशिष्ट्ये कवितेतून प्रामुख्याने जाणवतात. यासाठी कवयित्रीने आपली खास शैली बाळगली आहे त्यानुसार, तिने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक भिन्नतेसह स्त्रीत्वाचा वेध घेतला आहे. या कवितेने महानगरीय, दलित आणि स्त्रीवादी यातील भेद पुसून टाकले आहेत. संपूर्ण स्त्रीजातीचे दुःख व्यक्त करू पाहते. या अर्थाने ती वैश्विक आहे. अंतिमतः मानवतावादाकडेच घेऊन जाणारी आहे. प्रज्ञा या चळवळीतील कार्यकर्ती असल्याने समाजातील असमानतेमुळे येणारी अस्वस्थता टिपणं हा त्यांच्या कवितेचा स्थायिभाव म्हणता येईल. कविता कोठेही प्रचारकी होत नाही. स्वातंत्र्याची, जगण्याची धडपड आहे. या कविता स्त्री-पुरुष नातेसंबंधांचा शोध घेतात. स्त्री असण्याचा प्रवास, स्त्री-पुरूष नातेसंबंध, जातीयवादावरील उपरोधिक भाष्य, रोखठोकपणा, दैववादावर प्रहार, बुद्धिवादाची कास ही या कवितेची वैशिष्ट्ये आहेत.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न- 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील लिंग भेदाचे वास्तव चित्रण स्पष्ट करा.

--------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

## ४.९ समारोप

फुले-आंबेडकरी साहित्य हे समाजातील उपेक्षित वंचित घटकांचे हृदगत आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. १९९० नंतर वर्ण, जात, वर्ग, लिंगभाव अधिष्ठित शोषकव्यवस्था अंतासाठीचे तत्वज्ञान म्हणून फुले आंबेडकर विचारप्रवाहाचा उदय झाला. शोषित घटकांचा

आवाज समाजासमोर आणणे हे या साहित्याचे प्रयोजन आहे. वेदना, विद्रोह, नकार, नवनिर्मितीची जाणीव घेऊन येणारे हे साहित्य मानवाची दु:खमुक्ती चे ध्येय घेऊन लिहीले गेले. मानवतेला प्राधान्य देणारे हे साहित्य आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, विश्वबंधुता या मानवी मूल्यांची पुनर्रचना करू पाहणारे हे साहित्य आहे. फुले-आंबेडकरी साहित्य म्हणजेच मानवतावादी साहित्याचा जाहीरनामा आहे असा विचार मांडला गेला. मानवी हक्क, मानवी स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय ही जोतिरव फुले यांची त्रिसुत्री विचारप्रणाली होती. या विचारांची प्रेरणा घेऊनच सर्व विषमतेविरुद्ध सामाजिक क्रांती झाली. समाजातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड यावर हल्ला चढवत उपेक्षित, वंचित घटकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम या चळवळीने केले. समाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, नैतिक सर्वच प्रकारे जागृती व्हावी म्हणून प्रयत्न करणारी ही विचारधारा आहे.

फुले-आंबेडकरी विचारधारेतून निर्माण झालेले साहित्य 'फुले-आंबेडकरी साहित्य' म्हणून ओळखले जाते. माणसाची नैसर्गिक प्रतिष्ठा राखणे हे या साहित्याचे कार्य आहे. स्त्रीवादी साहित्य स्त्रीचा माणूस म्हणून विचार करते. तिच्या व्यथा, वेदना, समाजातून तिला दिलेले दुय्यम स्थान यांचा विरोध करणारे व या व्यवस्थेला नकार देत विद्रोह करणारे हे साहित्य आहे. स्त्रीदशक जाहीर झाले आणे तेव्हापासून मराठीत स्त्रीवादी लेखन जास्त प्रमाणात होऊ लागले. आधीच्या लेखिकांचे लेखनापेक्षा हे अत्यंत धारदार, स्व-अस्मिता जपणारे असे हे साहित्य समृद्ध होत गेले.

प्रज्ञा दया पवार यांचा 'आरपार लयीत प्राणांतिक' हा कवितासंग्रह अभ्यासतान त्यातील फुले-आंबेडकरी विचारधारा प्रखरपणे जाणवते. शोषक व शोषित हा भेदच नाहीसा करण्याचा प्रयत्न या लेखनातून जाणवतो. या साऱ्या लेखनाचा उद्देशच माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करण्यासाठीची तळमळ व्यक्त करण्याचा आहे. 'बाईच्या अनुषंगाने येणाऱ्या तिच्या जगण्याचा, स्त्री-पुरूष नातेसंबंधांचा व एकूण मानवी नातेसंबंधांचा उभा-आडवा पट पाहत असताना त्यातली मानुषता मात्र हरवलेली, ठायी ठायी विरूप झालेली दिसते. या विरूपतेमध्ये लिंगभेदजन्य विषमतेबरोबरच जात-वर्गवास्तव, त्याबरोबरच जागतिकीकरणातून येणारं कंगालीकरण, बाजारशरणता आणि व्यक्तीशिवायची बाकीची सर्व मानवी एककं दुय्यम ठरवत जाणं या बाबी कळीची भूमिका बजावत असतात. या भूमिकांचा शोध घेणं, अर्थनिर्णयन करणं आणि त्यांच्या विरोधात हस्तक्षेप करणं हे कवितेचं काम आहे असं मी मानते.' असे त्या म्हणतात. विठाबाई भाऊ मांग नारायणगांवकर या कलावंत स्त्रीच्या आयुष्यात आलेला भोगवटा आणि पुरुषप्रधान संस्कृतीटुन्न तिच्या वाट्याला आलेलं जगणं आणि भोगणं या दीर्घ कवितेतून कवयित्री आपल्यासमोर आणते. तमाशा कलावंतीण स्त्री च्या आयुष्यातील वास्तव अनुभव सहवेदनेने उभं करतांना प्रज्ञा यांची लेखणी प्रभावी होत जाते. विठाबाईचं जगणं हे केवळं भोगणं असलं तरी ती ताठ कणा ठेऊन रगीनं आणि धगीनं जगली हे वास्तव या दीर्घ कवितेतून व्यक्त होतं. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय उतरंडीत कोठेही स्थान नसलेल्या कलावंतीण स्त्राr चे आयुष्य किती भयाण असते. सोशिकतेचा अंत बघणारे असते. याचा प्रत्यय या कवितेवरून वाचकाला येतो. विठाबाई ज्या वर्गाचं प्रतिनिधित्व करते ती समाजातला उपेक्षित घटक आहे. त्यातही तिचं स्त्री असणं शोषणाची पातळी वाढवणारं आहे. ही कविता समाजातील तळागाळातील वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'विठामाय'ची जीवनगाथा सांगते. विठाबाई आपले सारे आयुष्य लढवय्यासारखी जगली. तिच्या कलेने तिने समाजाची व कुटुंबाची

सेवा केली. आयुष्यात आलेली आव्हाने पचवली. मान-सन्मानाने भुलून न जाता सतत मातीशी आपले घट्ट नातं ठेवणारी विठाबाई आपल्या आविष्कारांसह प्रज्ञा पवार यांच्या कवितेतून अवतरते. कवयित्रीच्या जाणिवा अत्यंत प्रगल्भ असल्याने ती विठाबाईच्या साऱ्या वैशिषटयांसह तिला समर्थपणे कवितेतून उतरवते. विठाबाईला प्रत्यक्ष बघितल्यावर आपल्या कवितेत चितारलेली 'विठामाय' तिला हुबेहुब वाटते. विठाबाईची शोकांतिका मांडतांना चौफेर विचार करत सारे कंगोरे तपासत ही कविता उतरली आहे. यात जसा विठाबाईच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास आहे तसाच तिची जैविक परंपरा, व स्त्री असण्याच्या साऱ्या  खुणा व त्यामुळे तिचे आयुष्य जे शोषणाचा पट उभा करते त्या साऱ्याची कारणमीमांसा करत ही कविता समर्थपणे उभी राहते. फुले-आंबेडकरी साहित्य स्त्रीलेखनात समाजातिल विषमतेविषयीची चीड संताप, आपल्या शोषणाचा, घुसमटीचा आक्रोश, विद्रोह, आणि स्वतंत्र माणूस म्हणून उभी राहण्यासाठीचा स्त्रीचा प्रयत्न हे सारे विशेष स्पष्टपणे व्यक्त होतात. वर्ण, वर्ग, जात, आणि लिंगभेदाचे वास्तव या कवितेतून परखडपणे उतरते.

माणसाच्या अस्सलपणाची शोध घेणारी ही कविता जीवनाविषयीची मानवतावादी दृष्टी निर्माण करते. आत्मशोध, व्यक्तिशोध आणि स्वसमाजशोध या तिहेरी पेचाची कविता आहे. या दीर्घ कवितेतून स्त्रीवादी जाणिवेतून स्त्रीमुक्तीकडे जाणारा, मानवमुक्तीकडे जाणारा विचार संथपणे मांडलेला आहे. तिने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक भिन्नतेसह स्त्रीत्वाचा वेध घेतला आहे. या कवितेने महानगरीय, दलित आणि स्त्रीवादी यातील भेद पुसून टाकले आहेत. स्त्री असण्याचा प्रवास, स्त्री-पुरूष नातेसंबंध, जातीयवादावरील उपरोधिक भाष्य, रोखठोकपणा, दैववादावर प्रहार, बुद्धिवादाची कास ही या कवितेची वैशिष्ट्ये आहेत.

## ४.१० नमुना प्रश्न

१. कवयित्री प्रज्ञा दया पवार  यांच्या 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेचे फुले-आंबेडकरी  स्वरूप स्पष्ट करा.

२. विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांचे चरित्र 'आरपार लयीत प्राणांतिक' दीर्घ कवितेतून स्पष्ट करा.

३. 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेच्या आधारे कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

४. 'आरपार लयीत प्राणांतिक' या दीर्घ कवितेच्या आधारे कवयित्री प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेतील फुले-आंबेडकरवाद स्पष्ट करा.

५. टीपा लिहा.

   अ) आरपार लयीत प्राणांतिक मधील वर्ण, जात, वर्ग वास्तव

   ब) 'आरपार लयीत प्राणांतिक' मधील आविष्करण / अभिव्यक्ती पद्धती

## ४.११ संदर्भ


- कसबे, रावसाहेब;आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे
- पानतावणे, गंगाधर; पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे
- पाटील, शरद; मार्क्स-फुले-आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे
- गायकवाड, सुधाकर; माणूस त्याचा समाज आणि बदल :डॉ. आंबेडकरांचे सिद्धांतन, सृजन प्रकाशन, मुंबई
- शेरे, नीळकंठ;आंबेडकरवाद, सुविद्या प्रकाशन, पुणे
- प्रज्ञा दया पवार, आरपार लयीत प्राणांतिक, लोकवाङ्मय गृह, मुंबई; द्वि. आ. २०१०
- मानसी लाटकर; १९९० नंतरची मराठी स्त्रीवादी कविता; कविता-रती/मे-जून २०१०
- प्रज्ञा दया पवार, प्रेरणा समग्राशी डोळा भिडवण्याची, चतुरंग मैफल, जुलै २०, २०१३
- राजा ढाले; अध्यक्षीय भाषण, "एकविसावा अस्मितदर्श साहित्यिक मेळावा", पुणे १९९५
- कांबळे गौतमीपुत्र; 'फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य', 'दलित साहित्याच्या नामांतराचा वाद', संपा-धम्मपाल रत्नाकर, सुगावा प्रकाशन पुणे १९९७
- फडके भालचंद्र; 'दलित साहित्य: वेदना व विद्रोह' श्री विद्या प्रकाशन, पुणे
- योगिराज बागूल; तमाशा: विठाबाईच्या आयुष्याचा; राजहंस प्रकाशन, पुणे
- विजया एस. जी.; मानवतावादी स्त्रीकविता; ब्रोनॅटो पब्लिकेशन, मुंबई (ईबुक) https://www.amazon.in/Manavtavadi-Strikavita-Marathi-Dr-Vijaya-ebook/dp/B09QD298W7


*****